# आधुनिक युगातील

# एस्तेर वाढवणे

## ग्लोबल अडवान्स ह्यांची नेतृत्वाची प्रशिक्षण हस्तपुस्तिका

स्त्रियांसाठी



**कोनी पार्कर**

**आधुनिक युगातील एस्तेर वाढवणे**
**ग्लोबल अडवान्स ह्यांची नेतृत्वाची**

**प्रशिक्षण हस्तलिखित प्रत**

**स्त्रियांसाठी**

ग्लोबल अडवान्स व्यतिरिक्त कोणालाही हे पुस्तक पुन्हा विकण्याची परवानगी नाही. प्रशिक्षण देण्यासाठी वयक्तिक धडे पुन्हा निर्माण करण्याची परवानगी दिली जाते, ही सर्व वितरणे निशुल्क दिली जावी.

ह्याची नोंद झाली तर, सर्व शास्त्रवचनातील उद्‌गार हे इंग्लिश स्तंदार्द पवित्र शास्त्राच्या आवृतीतून घेतले आहेत.
Copyright © 2001 by Crossway Bibles, a publishing ministry of Good News Publishers.

*© कोनी एम. पार्कर*

## अनुक्रमणिका

**प्रस्तावना** ........................................................ ३

**परिचय**.................................................................४

**मी कोण आहे**

१. ख्रिस्तामध्ये माझी ओळख ................................ ७

२. आत्म्यामध्ये चालत राहणे... ............................ १९

३. माझ्या आयुष्याचा नकाशा तयार करणे ........... २८

४. माझा भूतकाळ हाताळणे... ................................३८

**माझे नातेसंबंध**

५. देवाबरोबर माझे नातेसंबंध जोपासणे ................ ५०

६. सेवकाचे नेतृत्व .............................................. ७०

७. मुल्ये, प्राधान्ये, समतोल .................................. ८१

८. संधान, व्यक्तिमत्वे, नातेसंबंध .........................९२

**माझे नेतृत्व**

९. देवाने जिकडे तुम्हाला ठेवले त्या ठिकाणी पुढारीपण करणे ......................................................................१०६

१०. सांघिक कार्य - नेतृत्वाची गुरुकिल्ली ...............११६

११. अनुसरण करण्यास पाचारण .......................... १२८

१२. चिंतन कारण, उत्सव साजरा करणे, कामगिरीवर मार्गस्थ करणे.........................................................१४१

**ग्रंथसूची** ......................................................**१४७**

**प्रस्तावना**

प्रिय मित्रांनो,

एका महान उद्देशासाठी तुम्हास पाचारण झालेले आहे!

हे साहित्य तुम्हाला ग्लोबल अडवांस ह्यांच्याकडून मिळाले आहे जेणेकरून तुमचा विश्वास उभारून इतरांना ख्रिस्ताच्या करिता प्रभावित करू शकाल.

अनेक लोक जे हे पुस्तक वापरतात ते अशा संस्कृतीत राहतात जिकडे स्त्रियांना अत्यंत वाईट रीतीने वागवले जाते. आमची इच्छा आहे की तुम्ही हे जाणून घ्यावे की देव तुम्हाबद्दल खूप उच्च विचार करतो. तुमची निर्मिती त्याच्या प्रतीरुपात झालेली आहे. त्याचे तुमच्यावर प्रेम आहे आणि काहीतरी फरक करून आणण्यासाठी तुमच्या आयुष्याचा त्याने वापर करावा अशी त्याची इच्छा आहे.

एस्तेरप्रमाणे, तुम्हाला देखील अशा समयासाठी पाचारण करण्यात आलेले आहे. त्याच्या हेतूसाठी इतरांना तुम्ही प्रभावित करावे अशी त्याची इच्छा आहे.

आमची प्रार्थना आहे की तुम्हाला उत्तेजन मिळेल आणि चांगल्यासाठी इतर स्त्रियांना तुम्ही प्रभावित करण्यासाठी सज्ज व्हाल. तुमचे कुटुंब, तुमचा समाज, तुमचे राष्ट्र, आणि जग ह्यासाठी देवाची जी योजना आहे त्यामध्ये तुम्ही महत्वाचे आहात!

कृतज्ञतापूर्वक सेवेस सुपूर्त,

जोनाथन शिबले, अध्यक्ष- ग्लोबल डवांस

व्हाईटने डाहरटे, समन्वयक- द एस्तेर इनिशिएटीव

## परिचय

*१८ तेव्हा येशू जवळ येऊन त्यांच्याशी बोलताना म्हणाला, “स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे.  १९तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा; त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या; २०जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे.” (मत्तय २८:१८-२०)*

येशूच्या त्याच्या शिष्यांना दिलेल्या ह्या सूचना, पृथ्वीवर असताना शेवटल्या सूचना, ह्या पुस्तिकेच्या अगदी केंद्रीयस्थानी आहेत. तुमच्या लक्षात हे आले का की त्याने त्याच्या गोंधळात पडलेल्या अनुयायांना त्यांनी इतर लोकांना तारणाप्रत घेऊन येऊन त्यांना स्वर्गात एक घर देण्याचे अभिवचन दिले एवढेच महत्वाचे नव्हते? त्यांना  “सर्व राष्ट्रांमध्ये जाऊन शिष्य बनवण्यास सांगण्यात आले, .......त्याने जी काही आज्ञा दिली आहे त्याचे पालन करण्याची शिकवण दिली,” अधिक मोठे आवाहन!  “शिष्य बनवणे” ह्यामध्ये आपण आपली आयुष्ये खुली करून कोणताही पूर्वग्रह मनात न ठेवता इतरांना दिशा दाखवून त्यांच्यावर प्रेम करणे आवश्यक आहे, त्यांना जीवात्म्यांचा तारणारा, विश्वाचा निर्माता ह्यासोबत दैनंदिन आज्ञाधारक वयक्तिक नातेसंबंध प्रस्थापित करण्याचे उत्तेजन देतात.

ही पुस्तिका तुमच्यासाठी लिहिणे हा माझा अत्यानंद आणि सौभाग्य आहे, आणि त्यात माझा वयक्तिक नेतृत्वाचा प्रवास मी तुमच्यासमोर

मांडत आहे. ह्यातील काही धडे मी निरीक्षण करून शिकले आणि अनेक कार्यक्षम पुढार्यांकडून मिळालेल्या सूचनांवरून ज्यांना मी ह्या प्रवासात भेटलो, त्यातील काहींबद्दल मी पुस्तकात वाचले किंवा कार्यशाळा अथवा परिषदा ह्यामध्ये त्यांचे ऐकले आणि ज्याविषयी उपदेश ऐकले आणि "पुढे जात राहणे," ह्याचे अवलंबन केले आणि त्यातील काही माझे यश आणि अपयश ह्यातून मी स्वतःहून शिकले. मी मुक्तपणे हे कबूल करतो की ही तत्वे तर मुलभूत असून त्या विषयाच्या गाभ्याला देखील झाकून टाकत नाहीत, पण मी तुम्हाला अतिरिक्त साहित्य संदर्भ म्हणून "पुढील अभ्यासासाठी " देत आहे जर एखादा विषय तुम्हाला गोंधळात टाकणारा वाटेल अथवा तुमच्या परिस्थितीशी अधिक जास्त अनुरूप भासेल.

मी हे धडे विशेषकरून त्या लोकांसाठी लिहिलेले आहेत ज्यांना स्त्रियांसाठी पवित्र शास्त्रीय प्रशिक्षण रुपी नेतृत्वपर साहित्ये तयार करण्याची इच्छा आहे. ह्यातील उदाहरणे आणि अनुभव हे एका स्त्रीच्या दृष्टीकोनातून आहेत. तुम्ही जर एक नेतृत्व करणारी ख्रिस्ती स्त्री आहात जे देवाच्या राज्यासाठी पुढाऱ्यांची पुढील पिढी विकसित करण्याचे समर्पित आहात, मी तुम्हाला ह्या बारा नेतृत्व- प्रशिक्षण सत्रांसाठी हे धडे एक मार्गदर्शक म्हणून वापरावे ह्याचे उत्तेजन देतो. तुम्ही जर एखादी स्त्री आहात जिने आपल्या नेतृत्वाच्या प्रवासाची सुरुवात केली आहे, तुमच्या मतासारखे जे इतर लोक आहेत त्यांचा प्रार्थनापूर्वक शोध घ्या आणि एकत्र येऊन एक देवभिरू मार्गदर्शक नियुक्त करा ज्या तुमच्यासोबत त्यांचे सुज्ञान आणि अनुभव वाटून घेतील. माझी प्रामाणिक आशा आहे की तुम्ही ह्या धड्यांचा अभ्यास

“समाजात असताना करा,” त्यात प्रत्येक व्यक्ती त्या साधनाचे वाचन आणि मनन प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन पद्धतीने भेट घेण्यापूर्वी आधीच करतील आणि त्यात विचार, अनुभव, सुज्ञान आणि अनुभव सांगून एकमेकांना उत्तेजन देतील.

नेतृत्व करणे हा एक विनम्र करून टाकणारा अनुभव आहे. तुम्ही स्वतःबद्दल एक “नैसर्गिक पुढारी म्हणून,” जर विचार केला नाही, तर तुम्ही चांगल्या संपर्कात आहात; मोशे, गीदोन किंवा दावीद ह्यांनी देखील केला नाही, पण देवाने त्यांना हजारोंचे नेतृत्व करण्यासाठी निवडले.

सुवार्ता ही आहे की देव आपणास असे शिष्य बनवण्यास सांगत नाही जे आपले अनुसरण करतील, तर असे शिष्य बनवणे जे मार्गदर्शन करून येशूचे अनुसरण करतील, जो “सदैव आपल्यासोबत आहे,” आणि जो “स्वर्ग आणि पृथ्वीवरील सर्व अधिकार बाळगतो!”

त्याचे सुज्ञान आणि सान्निध्य ह्यांनी आपल्या प्रत्येकाला मार्गदर्शन करावे, जसे आपण त्याचे अनुसरण करण्याचा शोध घेतो !



## धडा १: ख्रिस्तामध्ये माझी ओळख

नेतृत्वाच्या नियमातील पहिला नियम म्हणजे तुम्ही कोण आहात व कोठे जात आहात हे सिद्ध करणे. त्याशिवाय, तुम्ही आणि जे सर्व तुमचे अनुसरण करतात हे कोणत्याही ध्येयाशिवाय, काहीही हातात न पडता फिरत राहण्यासाठी भटकंती करण्यास पात्र ठरतात. ख्रिस्ती ह्या नात्याने ख्रिस्तामध्ये आपली ओळख ही स्पष्ट आहे. शास्त्रवचनातील शेकडो वचने देव आपण कोण आहोत ह्याविषयी जे काही म्हणतो त्याचे वर्णन करतात. आपण पृथ्वीचे मीठ आहोत, जगाचा प्रकाश आहोत, ख्रिस्ताचे राजदूत आहोत,त्याचे शरीर, त्याचे राजकीय याजकगण, एक पवित्र राष्ट्र आहोत. पण मी कोण आहे असे

देव म्हणतो? तो मला कसे पाहतो? मला ठाऊक आहे की मी "नव्याने जन्मल्यावाचून" (योहान ३:३). ह्याने माझी ओळख बदलते का?जर बदलते, तर कशी किंवा, कशी बदलत नाही? पौल ह्या प्रश्नांची उत्तरे इफिसकरास पत्रात

अत्यंत जबरदस्त रीतीने संबोधतो, जे "संतांना .....ख्रिस्त येशुशी जे विश्वासू आहेत" त्यांना लिहिण्यात आले आहे. संतगण ... त्यात आमचा समावेश आहे !!

१. मी आशीर्वादित आहे: "आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो. त्याने स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे" (इफिसकरास पत्र १:३). "आशीर्वादित" हा शब्द म्हणजे ग्रीक शब्द "*युलोजियो*" ("युलोजी" ह्याचा विचार करा) ज्याचा अर्थ "कोणाबद्दल चांगले बोलणे" असा आहे. मी आशीर्वाद देतो ("देवाविषयी चांगले बोलणे") ज्याने आशीर्वाद दिला ("माझ्याविषयी चांगले बोलला"). किती अद्भुत आहे की देव ज्याने शून्यात असलेल्या जगामध्ये शब्द बोलण्याच्या द्वारे सामर्थ्यशाली रीतीने जग आणि विश्वाला अस्तित्वात आणले, त्याने अगदी सर्जनशील रीतीने "प्रत्येक अध्यात्मिक आशीर्वाद " माझ्या जीवनात ख्रिस्तामध्ये बोलून दाखवला? जेव्हा मी निराश होतो अथवा दुखी होतो आणि जेव्हा मला वाटते की देण्यासाठी माझ्याकडे काहीही नाही, तो माझ्याविषयी चांगले बोलला, स्तुती केली, आणि प्रत्येक अध्यात्मिक आशीर्वाद देऊन मला आशीर्वादित केले. जुन्या करारात, वडील आपल्या मुलांवर आशीर्वाद घोषित करत असे. याकोब मिसर देशात त्याच्या नातवंडांना आशीर्वाद देण्याची गोष्ट आठवा,

दाविदाचा शलमोनावरील आशीर्वाद? आशीर्वादात सर्जनशील सामर्थ्य आहे, आणि देव, आपला पिता, ह्याने त्याचे सर्जनशील आशीर्वाद आपल्यावर ओतले आहेत, आणि त्यातून आपल्याप्रत प्रत्येक अध्यात्मिक आशीर्वाद येतात. ह्याचा अर्थ काय हे ह्यावर विचार करा!!

२. माझी निवड झाली आहे: “त्याचप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे, म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले.” (इफिसकरास पत्र १:४ अ). देवाने स्वतः माझी निवड केली आहे. कोणीही काहीही बोलले अथवा विचार केलेला असो, मी काही एक अपघात नाही, एक नंतर केलेला विचार अथवा चूक नाही. मी मुलगा नाही म्हणून जरी माझ्या आई वडिलांनी दुख केले असले तरीही, देवाने मी स्त्री म्हणून माझी निवड केली, त्याच्या हृदयातील एक मनपसंत स्त्री. आणि हा काही एक शेवटच्या क्षणाचा, घाईने घेण्यात आलेला निर्णय नव्हता. तूच माझे अंतर्याम निर्माण केलेस; तूच माझ्या आईच्या उदरी माझी घडण केलीस. (स्तोत्रसहिता १३९:१३). “निवडलेला” ह्यासाठी ग्रीक शब्द म्हणजे “*एकलेगोमाई*” ज्याचा अर्थ, “स्वतःसाठी, निवड्लेल्याची पसंत करणे.” त्याने माझी निवड करून त्याच्या स्वतःचा असा शिक्कामोर्तब केला. बाजारात असताना जेव्हा आपण फळे निवडतो, आपण उत्तम ते निवडतो, सर्वोत्तम, शुद्ध, ते जे काही आहेत त्यासाठी नाही, तर आपल्याला त्यांच्यात काय क्षमता दिसते त्यासाठी आणि आपल्या मनात तेव्हा एक विशेष हेतू अथवा उद्देश असतो. तरी ज्ञान्यांस लाजवावे म्हणून देवाने जगातील जे मूर्खपणाचे ते निवडले, आणि जे बलवान ते लाजवावे म्हणून देवाने जगातील जे दुर्बळ ते निवडले (१ कर. १:२७). म्हणून ख्रिस्ताच्या सामर्थ्याची छाया माझ्यावर राहावी

म्हणून मी विशेषेकरून आपल्या अशक्तपणाची प्रौढी फार आनंदाने मिरवीन. (२ करिंथकरास पत्र १२:९).

३. माझ्यावर प्रेम करण्यात आले आहे: “देवाच्या अनुग्रहामुळे मी तुमच्याविषयी देवाची उपकारस्तुती सर्वदा करतो ” (इफिसकरास पत्र १:४ब, ५). शास्त्रवचनातील शेकडो वचने देवाचे त्याच्या प्रत्येक लेकरांवरील खोल आणि न संपणाऱ्या प्रेमाचे वर्णन करतात, पण कोणतेही रोमकरास पत्र ८:३८,३९ आणि रोमकरास पत्र ५:७,८ ह्यात दिलेल्या वचनांपेक्षा अधिक शक्तिशाली रीतीने वर्णन करत नाही:

*३८ कारण माझी खातरी आहे की, मरण, जीवन, देवदूत, अधिपती, वर्तमानकाळच्या गोष्टी, भविष्यकाळच्या गोष्टी, बले,*
*३९ उंची, खोली, किंवा दुसरी कोणतीही सृष्ट वस्तू, ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये देवाची आपल्यावरील जी प्रीती आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करायला समर्थ होणार नाही.*

*७नीतिमान मनुष्यासाठी कोणी मरणारा विरळा; चांगल्या मनुष्यासाठी मरण्यास कदाचित कोणी धाडस करील;*

*८परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे*

टिपा

*प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला.*

आपल्यातील काही लोकांनी एका पृथ्वीवरील पित्याचे असीम आणि अमर्यादित प्रेम कधीच जाणले नसेल आणि देवाचे प्रेम म्हणजे एक अशक्य असणारे स्वप्न असे भासेल, आणि तरीही खोलवर स्थित आपल्या आत्म्यात त्याची ओढ आपणास जाणवते --- एक प्रेम जे बलवान, अमर्यादित, कनवाळू, दयाळू, उदार, क्षमा करणारे आणि सौम्य आहे. तो ते आणि अधिक देऊ करतो. आपल्यातील काहींनी खोलवर भावनिक जखमा सहन केल्या असतील आणि विचारात असतील, “देवाचे जर माझ्यावर प्रेम असेल आणि तो इतका शक्तिशाली आहे, तर त्याने का घडू देण्याची परवानगी दिली?” आपल्या वेदनांच्या मध्ये तो आहे हे आपण समजावे अशी त्याची इच्छा आहे, तो तिकडे होता, आणि आपल्यासोबत त्याचे हृदय देखील आक्रोश करत होते. आपल्या वेद्नेमध्ये तो होता, हे आपण जाणून घ्यावे अशी त्याची इच्छा आहे, आणि त्याचे हृदय देखील आपल्यासोबत रडत होते. त्याच्याकडे धाव घेऊन त्याचे प्रेम व आरोग्यदायी सामर्थ्य आपण स्वीकारावे म्हणून तो आपले स्वागत करतो.माझ्यासारखे, इतरांनी देखील एका दयाळू आणि कृपाळू पित्याचे प्रेम माझ्यासारखे ओळखले असते.  एका सुज्ञ आणि क्षमा करणाऱ्या स्वर्गीय पित्यावर मी विश्वास ठेवणे सोपे होते. माझ्या वडिलांना जे माझ्यासाठी आदर्श होते त्याप्रमाणे त्यांचे चित्र डोळ्यासमोर आणले. पण मी जेव्हा आठवणीने बेजार झालो तेव्हा ज्यावेळी देव माझ्याशी बोलला तो दिवस मी विसरणार नाही, “मला तुझा बाप बनायचा आहे.” असे भासले की माझ्या डोळ्यांवरून खपल्या पडल्या, आणि ताबडतोब तो माझा सहाय्यदाता आणि आश्रय व सत्य ह्यांचे स्रोत बनला.

मी कधीच मागे वळून पाहिले नाही. देव पिता तुमच्यावर अमर्यादित प्रेम करतो हे जाणून घेण्यास जर तुमची काकुळतीची इच्छा असेल, तर ते सत्य त्याने तुमच्या हृदयास प्रगट करावे अशी मागणी त्याला करा, मग तुम्ही जीवन जगत असताना त्याचा शोध अनपेक्षित ठिकाणात करत राहा.

४. मला दत्तक घेण्यात आहे आले: “त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरता प्रेमाने पूर्वीच नेमले होते.” (इफिसकरास पत्र १:५). देवाने माझी निवड केली, आशीर्वाद दिला आणि प्रेम केले, एवढेच नाही, तर त्याने मला त्याच्या कुटुंबात दत्तक घेतले आहे आणि मला एक वतन दिले आहे (योहान १:१२; इफिसकरास पत्र १:११; गलतीकरास पत्र ४:६,६)! देवाच्या कुटुंबाचा एक भाग होणे हे किती अद्भुत सौभाग्य आहे, जगभरातील माझे बंधू भगिनी ह्यांची भेट घेणे किती चांगले आहे. आपण सारखी भाषा बोलत नसू, अथवा समान संस्कृतीमधील नसू, पण आपला एक पिता, एक तारणारा, आणि एक आत्मा आहे आणि तो आपणास एकमेकांवर प्रेम करण्यास व काळजी घेण्यास एकत्र करतो..

५. मला स्वीकारण्यात आले आहे: “त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून हे झाले. ही कृपा त्याने आपल्यावर त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे.” (इफिसकरास पत्र १:६ (एनकेजेवी). “स्वीकृत” हा शब्द ग्रीक शब्द “*चारितू*” ज्याचा अर्थ म्हणजे “संतोषकारक दिसलेला, किंवा त्यात आनंद मानलेला.” नवीन करारात वापरण्यात आलेला समय म्हणजे नवीन करारात लुक १:२८ मध्ये आहे जेव्हा देवदूत मरीयेला नमन करून म्हणतो “हे कृपा पावलेल्या स्त्रीये.” प्रियजणांमध्ये देव मला संतोषजनक असे पाहतो.

तो माझ्यात आनंद मानतो. तो माझा स्वीकार करतो. मी कृपा पावलेली आहे असे तो म्हणतो. स्त्रियांना कुटुंब आणि मित्र ह्यांच्यासोबत वेळ घालवायला आवडते. एकमेकांची गोष्ट ऐकण्यास व आपली गोष्ट इतरांना सांगण्यास आवडते. स्त्रिया म्हणून नातेसंबंध आपल्यासाठी महत्वाचे असतात; ते आपल्याला ताजेतवाने करतात उर्जा देतात आणि आपल्या आत्म्यांना उत्तेजन देतात- जोपर्यंत

ते करत नाहीत. नकार हा आपल्यासाठी दुप्पट अवघड असतो; त्याच्या

जखमा खोलवर जातात. राजांचा राजा आपल्यावर प्रेम करतो आणि आपण आहोत तसा स्वीकार करतो हे जाणून घेणे किती अद्‌भुत आहे. तो आपल्याला कदापि सोडणार नाही किंवा लपून बसणार नाही. त्याच्या सिंहासनाकाडे आपण धीटपणे येण्याची तो मागणी करतो. (इब्री ४:१६). जेव्हा मी प्रार्थना करते, माझ्यासमोर एक सुंदर सुवर्ण खोली असते जिकडे देव सिंहासनारूढ आहे आणि त्याला उंचावण्यात येते. मी त्या दरवाज्याकडे जात असताना त्याचा चेहरा आनंदाने भरतो आणि त्याच्या सान्निध्यात एक पश्चातापी व्यक्ती जी कृपा मिळण्याची याचना करते असे केवळ बघत नाही, पण तो आपले बाहू पसरतो जेणेकरून मी पित्याकडे जावे आणि त्याचे उबदार आलिंगन मिळवून घ्यावे. माझा “स्वीकार,” झाला आहे, मी “कृपा प्राप्त आहे ” आणि “त्याचा संतोष मला लाभला आहे.”

६. माझा उद्‌धार झाला आहे: “त्याच्या रक्ताच्या द्‌वारे खंडणी भरून मिळवलेली मुक्ती, आपल्याला मिळाली आहे. ” (इफिसकरास पत्र १:७अ).

उद्‌धारासाठी ग्रीक शब्द म्हणजे “*आपोलायट्रोसिस*.” त्या मूळ शब्द

ज्याचा अर्थ आहे “सैल” किंवा “खुला” ह्याचे वर्णन तुरुंगात असलेल्या लोकांना मुक्त करण्यास, ज्या गोष्टी बंद आहेत त्या उघडण्यास, आणि भिंती नष्ट करण्यास केले गेले आहे. रुथच्या पुस्तकात, असा उद्धार किंवा विमोचन ह्याचे वर्णन करण्यात आले आहे. रुथच्या काळात, जेव्हा एखादे कुटुंब वाईट अवस्थेत होते, “कुटुंबाची व्यवस्था पाहणारा सर्वात जवळचा जवाबदार नातेवाईक [तिच्या बाबतीत बवाज]... ह्याने कुटुंबातील लोकांची जीवने अथवा वस्तू जे बंदिवानात आहे त्यांना सोडवणे गरजेचे आहे” (कित्तेल, १९६४, पृ. ३३०). ऋतू बदलल्यावर, आम्हास पापास बंदिवान म्हणून विकण्यात आले; आपण पापाचे गुलाम बनलो (१ करिंथकरास पत्र १५:२२; रोमकरास पत्र ६:१६-२२). आणि पापापासून मुक्त होऊन तुम्ही नीतिमत्त्वाचे गुलाम झालात, म्हणून देवाची स्तुती असो. आम्हाला ज्या तुरुंगाच्या भिंतीनी घेरले होते त्या त्याने नष्ट केल्या, आणि त्याच्या कुटुंबात पुनर्स्थापित केले (रोमकरास पत्र ६:१८). रुथची गोष्ट ही आपली गोष्ट आहे. येशू, आपला बवाज, ह्याने आपली सुटका करून घेण्यासाठी किमत मोजली आहे, आपला उद्धारक- स्वकीय, आणि हे स्वर्गीय पित्याशी आपले नाते जोडण्यात यावे म्हणून केले आहे.

७. माझी क्षमा झाली आहे: “त्याच्या कृपेच्या समृद्धीप्रमाणे त्या प्रियकराच्या ठायी, त्याच्या रक्ताच्या द्वारे खंडणी भरून मिळवलेली मुक्ती” (इफिसकरास पत्र  १:७ब). माझ्या भूतकाळाची क्षमा झाली आहे! ते सर्व काही!! देवाच्या दृष्टीने मी पवित्र आणि नीतिमान बनले. “तशी त्याने मला तारणाची वस्त्रे नेसवली आहेत; मला नीतिमत्तेच्या झग्याने आच्छादले आहे.” (यशया ६१:१०).

टिपा

मला “आणि सत्यापासून निर्माण होणारे नीतिमत्त्व व पवित्रता ह्यांनी युक्त असा देवसदृश निर्माण केलेला नवा मनुष्य धारण करावा.” (इफिसकरास पत्र ४:२४). “अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला आणि ते त्याला नीतिमत्त्व असे गणण्यात आले.” (रोमकरास पत्र ४:३). दाविदासोबत मी देखील असे म्हणू शकतो, “ज्याच्या अपराधाची क्षमा झाली आहे ज्याच्या पापावर पांघरूण घातले आहे, तो धन्य! ज्याच्या हिशेबी परमेश्वर अनीतीचा दोष लावत नाही व ज्याच्या मनात कपट नाही, तो मनुष्य धन्य!” (स्तोत्रसहिता ३२:१,२). “उल्लंघन” हा इब्री शब्द आहे “*पेसा*” ज्याचा अर्थ “बंडखोरीचे पाप,” (“मला ठाऊक होते की ते चुकीचे आहे आणि तरीही ते करण्याचे मी ठरवले”). त्या पापांची क्षमा देखील देव करतो. दाविदाने त्याचा अनुभव घेतला; त्याला ते ठाऊक होते. देव देखील माझ्या सर्व इतर “पापांची क्षमा करतो” (“*चाता*”) जे माझ्याकडून झाले आणि ते माझ्या हृदयाचे “अधर्म” किंवा वंचित राहणे (“*अवोन*”) माझ्या पापांसाठी जी शिक्षा आहे ती येशूच्या रक्ताने मोजलेली आहे आणि मला ती खात्री आहे की “जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील.” (१ योहान १:९). क्षमा कमवून घेण्यासाठी मी काहीच करू शकत नाही. “कारण कृपेनेच विश्वासाच्या

द्वारे तुमचे तारण झालेले आहे आणि हे तुमच्या हातून झाले असे नाही, तर हे देवाचे दान आहे; कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही. (इफिसकरास पत्र २:८, ९).

८. आणि ख्रिस्त येशूच्या ठायी त्याच्याचबरोबर उठवले व त्याच्याचबरोबर बसवले" (इफिसकरास पत्र २:६). मुख्य याजकाच्या समोर त्याची परीक्षा होत असताना, येशूने ही साक्ष दिली "तथापि ह्यापुढे 'मनुष्याचा पुत्र' सर्वसमर्थ 'देवाच्या उजवीकडे बसेल." (लूक २२:६९). येशू कोठे जात आहे हे त्याला ठाऊक होते आणि त्याने आपणास सोबत नेले आहे. त्याचे अवलंबन काय आहे? ख्रिस्तामध्ये शत्रूवर आपणास अधिकार मिळाला आहे. आता येशूच्या नावाने तो अधिकार आचरणात आणण्याची जवाबदारी आपल्यावर आहे.

९. मला पाचारण मिळाले आहे: "म्हणजे त्यामुळे तुमचे अंतश्चक्षू प्रकाशित होऊन त्याच्या पाचारणामुळे निर्माण होणारी आशा कोणती, 'पवित्र जनांमध्ये त्याने दिलेल्या 'वतनाच्या' वैभवाची समृद्धी केवढी" (इफिसकरास पत्र १:१८). आशेने जीवन जगण्यास त्याने मला पाचारण केले आहे!!

**पाठांतर करा:**

**१ योहान ३:२** प्रियजनहो, आपण आता देवाची मुले आहोत; आणि पुढे आपण काय होऊ हे अजून प्रकट झालेले नाही; तरी तो प्रकट होईल तेव्हा आपण त्याच्यासारखे होऊ हे आपल्याला माहीत आहे, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल.

**इफिसकरास पत्र १: ३-६**[3] आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो. त्याने स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे;

[४] त्याचप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे, म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले.
[५] त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरता प्रेमाने पूर्वीच नेमले होते.
[६] त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून हे झाले. ही कृपा त्याने आपल्यावर त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे.

**महत्वाचे सत्य:**

मी आशीर्वादित आहे. माझी निवड झाली आहे, माझ्यावर प्रेम करण्यात आले आहे. मला दत्तक घेण्यात आले आहे. माझा स्वीकार झाला आहे. माझा उद्धार झाला आहे. माझी क्षमा झाली आहे. स्वर्गीय स्थानात मी त्याच्यासोबत सिंहासनारूढ आहे. मला पाचारण मिळाले आहे.

**तुमचा प्रतिसाद:**

१. ह्या यादीतून तीन सत्य निवडा जे आता तुमच्यासाठी सर्वात अर्थपूर्ण आहे. तुम्ही स्वतःबद्दल काय विचार करता ह्या सत्याविषयी कशी तुमची खोलवर स्थित जाणीव आहे, देवाबद्दल जसा तुम्ही विचार करता, आणि आयुष्यात कोणत्या व्यक्तीबद्दल तुम्ही सर्वाधिक प्रेम करता?

अ. ____________________

ब. ____________________

क. ____________________

१. ह्यापैकी विश्वास ठेवण्यास कोणते सत्य तुमच्यासाठी सर्वात अवघड आहे? स्वतःबद्दल हे सत्य तुम्ही स्वीकारणे ह्यासाठी कोणता मार्ग तुम्ही अवलंबणार? ते इतके सोपे असेल जसे रोज प्रार्थना करणे की देवाने तुमच्या हृदयात ते सत्य प्रगट करून त्याची खात्री पटवून द्यावी, किंवा एक ध्येयनिहाय पवित्र शास्त्रीय अभ्यास करणे ह्याचा निर्णय घेणे ज्याविषयी देवाचे वचन काय सांगते, किंवा इतर कोणता मार्ग जो स्वतः देव तुमच्या हृदयात व्यक्तीशः घालतो.

२. स्वीकारण्यास ह्यापैकी कोणते सत्य सर्वात सोपे आहे, आणि ती बाब आहे असा विचार तुम्ही का करता? असा समय होता का जेव्हा एखादे शास्त्रभागातील वचन, किंवा पवित्र शास्त्राभ्यास, किंवा देवाकडून प्रगटीकरण, किंवा इतर काहीतरी ह्याने ते सत्य तुमच्या हृदयाला खात्रीने पटवून सांगितले?

**अधिक अभ्यासासाठी:**

वेन जेकबसेन ह्यांचे तो माझ्यावर प्रेम करतो (जेकबसेन, २०००)
बेथ मूर ह्यांचे देवावर विश्वास ठेवणे (मूर, २००४)
स्माली आणि त्रेंत ह्यांचे तो आशीर्वाद (स्माली & त्रेंत, १९८६)



## धडा २: आत्म्यामध्ये चालत राहणे

### मी स्वतः नव्याने: शरीर, जीवात्मा, आणि आत्मा

देवाने आपल्या प्रत्येकाला तीन विशिष्ट, पण एक संघटीत भागांमध्ये निर्माण केले आहे - आत्मा, जीवात्मा आणि शरीर (१ थेसलोनीकरास पत्र ५:२३). जीवात्मा म्हणजे आपले मन, इच्छा आणि संवेदना असा जर आपण विचार केला, आणि आपला आत्मा म्हणजे अस्तित्वाच्या अगदी केंद्रीय स्थानी असणारा, अशा सोप्या रीतीने आपण त्याचे चित्रीकरण करू शकतो:




मी जेव्हा ख्रिस्ती बनले, तेव्हा माझा आत्मा नवीन बनला (२ करिंथकरास पत्र ५:१७). माझे शरीर तसेच राहिले, वजन काही कमी जास्त झाले नाही, किंवा केसांचा रंग देखील बदलला नाही, आणि माझा जीवात्मा (मन, इच्छा आणि संवेदना) ते देखील आवश्यक रीतीने बदलले नाही.

ख्रिस्ती होण्यापूर्वी जर मी एखादी चांगली गणित तज्ञ नव्हते, तर नंतर देखील फार काही चांगले नव्हते. ख्रिस्ती होण्यापूर्वी जर मी स्वतःवर उत्तम नियंत्रण ठेवणारी होते, तर नंतर देखील तशीच चांगली इच्छा धरणारी होते.

आणि ख्रिस्ती होण्यापूर्वी जर भावनिक छळाला मी सामोरी गेले तर, हे स्वाभाविक आहे की त्याचे भावनिक पडसाद हे नंतर दिसून येतील. मग काय नवीन झाले? माझा आत्मा!! तारण झाल्यावर देवाने माझ्यामध्ये एक संधान साधण्यासाठी उपकरण रोवून ठेवले- माझ्या आत्म्यात. रोमकरास पत्र ८:१४ म्हणते की देवाचे लेकरू म्हणून, देवाच्या आत्म्याने मला चालवले पाहिजे. ते कसे काय होते? त्याचा आत्मा माझ्या आत्म्याशी बोलत राहतो, अनेकदा एका लहान, मंद वाणीमध्ये (१ राजे १९:११,१२). देव मला जे काही करायला सांगत आहे, ते करण्यास जरी माझ्या आत्म्याने ऐकावे असे असले तरीही, माझे मन, संवेदना आणि शरीर कोणत्याही प्रकारे संघर्ष न करता त्यांची नियंत्रण ठेवण्याची स्थाने सोडून देत नाहीत.

**माझ्या मनाचे नूतनीकरण**

तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या, (रोमकरास पत्र १२:२) देवाचे वचन वाचून व त्यावर मनन करून, आणि त्याचे चारित्र्य आणि उद्देश प्रार्थनापूर्वक समजून घेण्यास. प्रियजनहो, तुम्ही तर आपल्या परमपवित्र विश्वासावर स्वतःची रचना करा; पवित्र आत्म्याने प्रार्थना करा (यहूदा २०). माझा आत्मा जितके अधिक बलवान होत जातो, तितकेच अधिक माझ्या जीवात्म्यावर तो प्रभुत्व मिळवत जातो (मन, इच्छा आणि संवेदना) आणि माझे शरीर. जे वचन मी तुम्हांला सांगितले त्यामुळे तुम्ही आता शुद्ध झालाच आहात. (योहान १५:३).

पण चांगली बातमी आणि तशीच वाईट बातमी म्हणजे मी माझ्या मनामध्ये जे काही भरते त्याने त्याचे नूतनीकरण होत राहते. त्यात जर मी देवाचे विचार आणि देवाचे वचन भले, तर देवाच्याप्रती त्याचे नूतनीकरण होत राहते. जर त्यात मी केरकचरा, नको असणारे टी.व्ही. वरील कार्यक्रम, संगीत, चित्रपट, नियतकालिके, संभाषणे, आणि इतर नकारार्थी गोष्टी ह्याने जर भरले तर, माझ्या मनाचे नूतनीकरण ही एक मंद आणि लांबलचक प्रक्रिया होऊन बसेल.

माझ्या मनात जे काही चालत असते त्यावर नियंत्रण ठेवण्यासोबत, माझ्या आत्म्याने माझ्या विचारांवर नियंत्रण ठेऊ देण्याची मी स्वतःला परवानगी देणे आवश्यक आहे. फिलीप्पेकरास पत्र ४:८ "बंधूंनो, शेवटी इतके सांगतो की, जे काही सत्य, जे काही आदर णीय, जे काही न्याय्य, जे काही शुद्ध, जे काही प्रशंसनीय, जे काही श्रवणीय, जो काही सद्गुण, जी काही स्तुती, त्यांचे मनन करा." कारण तो आपल्या मनात घास मोजणाऱ्यासारखा आहे, तो तुला "खा, पी" म्हणतो, पण त्याचे मन तुझ्यावर नाही. (नितीसुत्रे २३:७, केजेवी). खालच्या दिशेचा वेढा हा अटळ आहे.

टिपा

ह्या क्षेत्रात एक तरुण माता व दोन लहान लेकरे घेऊन ह्या नात्याने मी संघर्ष केला. कोणत्याही प्रकारे जाणीव ठेऊन विचार न केल्याने, त्यांची लंगोटे बदलण्यात आणि नाक पुसून काढण्यात, माझ्या जीवनात लोक आणि परिस्थिती ह्याविषयी मी नकारार्थी बोलू लागले. किती पटकन माझी विचारसरणी ही खाली सरकत होती ह्यावर माझा विश्वास बसेना. एके दिवशी मी स्वतःला जेव्हा एका उताराच्या खोलवर स्थळी अडकलेले पाहिले आणि समोर त्या टेकडीवर चढायचे होते, मी स्वतः अशी प्रार्थना करत असताना मला आठवते, “प्रभू, जेव्हा मी त्या टेकडीवर असताना ह्या नकारार्थी विचारसर्नीची केवळ मला जाणीव करून दिली, तर खाली घसरण्याची प्रक्रिया थांबवणे माझ्यासाठी खूप सोपे जाईल.”

त्या प्रार्थनेने मी दिवसाची सुरुवात करत असे, आणि माझ्या आत्म्यामध्ये क्षणभराची ती जाणीव देण्यास देव विश्वासू असे. “तिकडे जाऊ नको.” त्या वेळी मला कळले की मी जर शास्त्रवचन बोलू लागले, किंवा आराधना गीत गाऊ लागले, किंवा स्तुतीची गीते जर लावली ज्यामुळे जे काही “शुद्ध, आणि सुंदर” असे आहे त्याप्रती माझा आत्मा उंचावला जातो.

टिपा

जेव्हा आपण अशा प्रकारे नकारात्मक विचार करताना स्वतःला पाहतो आपल्याला दोषी मानून घेण्याची काहीच गरज नाही, पण पश्चाताप मात्र करणे आवश्यक आहे. नकारार्थी विचार करणे एक पाप आहे कारण देवाच्या वचनाच्या विरुद्ध ते आहे (फिलीप्पेकरास पत्र ४:८). नकारात्मक विचार करत असताना प्रत्येक वेळी पवित्र आत्म्याला तुम्हास टोचणी लावण्यास सांगा (योहान १६:७,८). तुमच्या मनाचे युद्ध स्वतःहून जिंकण्याचा प्रयत्न करू नका. तो तुमचे सहाय्य करण्यास आहे. त्याला मदत करण्यास सांगा, आणि पुढे जात राहा.

फिलीप्पेकरास पत्र १:६ “ज्याने तुमच्या ठायी चांगले काम आरंभले तो ते येशू ख्रिस्ताच्या दिवसापर्यंत सिद्धीस नेईल हा मला भरवसा आहे, हे आत्मसात करण्यास सुरुवात करा.

**माझी इच्छा आणि संवेदना ह्यांना स्वाधीन करणे**

माझे मन नवीन होणे आवश्यक होते इतकेच नाही, तर माझ्या इच्छेला देखील देवाच्या आत्म्याच्या अधीन असणे हे शिकवणे गरजेचे होते. अशा प्रकारे पौल म्हणतो, “मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो;

आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वत:ला माझ्याकरता दिले." (गलतीकरास पत्र २:२०). प्रतिदिनी माझी इच्छा ही "क्रुसावर खिळली गेली पाहिजे," जेणेकरून देवाचे मार्ग निवडण्याची मी सुरुवात करू शकेन. माझ्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्याला प्रभू बनवण्याची ही बाब आहे, त्यात माझ्या विचारसरणीचा समावेश आहे. जो देवाचा आत्मा माझ्यामध्ये आता वस्ती करतो त्याच्याशी माझ्या संवेदना देखील समरूप झाल्या पाहिजे. नंतरच्या अध्यायात, भूतकाळातील आपल्या ज्या भावनिक जखमा आहेत त्यातून कसे बरे व्हायचे हे आपण शिकणार आहोत, पण आता त्या साध्या प्रश्नाकडे आपण बघू या को प्रत्येक नवीन ख्रिस्ती विचारत असतो. मला ठाऊक आहे की मी नेहमी "आनंद केला पाहिजे," (फिलीप्पेकरास पत्र ४:४; १ थेसलोनीकरास पत्र ५:१६), आणि ख्रिस्ती जे अशा पद्धतीने जगतात त्यांच्याविषयी मी वाचले आहे, पण तसे करण्यास मी कसे शिकले पाहिजे? इफिसकरास पत्र ५:२० ह्यात ते रहस्य आहे.

"आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने सर्व गोष्टींबद्दल सर्वदा देवपित्याची उपकारस्तुती करत जा." कोर्री टेन बूम ह्या तो गोष्ट सांगतात जेव्हा दुसऱ्या महा युद्धाच्या वेळी त्यांच्या छावणीत पिसवे झाले आणि त्यासाठी त्या देवाचे आभार मानत होत्या, कारण त्यांच्या बहिणीने आठवण करून दिली की ह्या पिस्वांमुळे पहारेकरी त्यांच्या छावणीपासून दूर राहत होते. जेव्हा खऱ्या कृतज्ञतेने जगण्यास मी शिकू शकते, आणि माझ्या जीवनाच्या सर्वात कठीण संघर्षासाठी देखील जेव्हा देवाचे मी आभार मानते, माझ्या आत्म्यात आनंद आणि शांती

ह्यांची मी मोकळीक करते. माझ्या परिस्थितीमध्ये देखील मी देवावर भरवसा ठेवते, हे जाणून घेऊन की सर्व गोष्टी हितासाठी करण्याचे त्याने अभिवचन दिले आहे, मला आता ते चांगले दिसत असो किंवा नाही (रोमकरास पत्र ८:२८). जेव्हा मी आशा केली त्यानुसार गोष्टी घडत नाहीत, आणि शक्य तेवढे मी सर्वकाही केलेले असते, मी विश्वास ठेऊ लागते की देवाची ह्यामध्ये चांगली योजना आहे आणि तो कोणत्या दिशेने कार्यरत आहे तिकडे मी बघत राहते. त्या परिस्थितीचे नियंत्रण जसे मी देवाच्या हातात देते आणि माझ्या योजनेत ती परिस्थिती बसवण्याचा जेव्हा प्रयत्न करत नाही, मी माझी इच्छा त्याच्या स्वाधीन करते.

मला आढळून येते की जितके अधिक मी माझ्या आत्म्यात आनंद आणि शांती ह्यांना भरू देण्याची परवानगी देते, तितकेच अधिक देवाच्या आत्म्याने मी भरून जाते आणि अत्यंत कठीण परिस्थिती मधून देखील चांगले कसे निष्पन्न होईल ह्याविषयी आशावादी बनते. हीच ती आशा आहे, इब्री ६:१९ आपणास सांगते, जी "ती आशा आपल्या जिवासाठी नांगर अशी असते." गोंधळमय, विचित्र आणि सदैव बदलणाऱ्या जगात, माझ्या जीवात्म्यासाठी मला एक नांगर आवश्यक आहे.

ह्यामुळे परमेश्वर तुमच्यावर प्रसन्न होण्यास विलंब लावील;
तुमच्यावर करुणा करावी म्हणून उच्च स्थानी आरूढ होईल.
परमेश्वर न्यायी देव आहे; जे त्याची वाट पाहतात ते सर्व धन्य. जे
त्याची अपेक्षा करून वाट पाहतात [त्याचा विजय, त्याची कृपामर्जी,

त्याची शांती, त्याचा आनंद, आणि त्याची अतुलनीय, न मोडता येणारी संगती ! (यशया ३०:१८)

**पाठांतर करा:**

- २ करिंथकरास पत्र ५:१७ - म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे.
- यहूदा २०- प्रियजनहो, तुम्ही तर आपल्या परमपवित्र विश्वासावर स्वतःची रचना करा; पवित्र आत्म्याने प्रार्थना करा,
- रोमकरास पत्र १२:२ - देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या.
- गलतीकरास पत्र ५:१६ - मी तर म्हणतो, आत्म्याच्या प्रेरणेने चाला, म्हणजे तुम्ही देहवासना पूर्ण करणारच नाही.

**महत्वाचे सत्य :**

आत्म्याने चालत राहणे म्हणजे रोज शरीराला ती शिस्त लावणे, मनाचे नूतनीकरण करणे, संवेदना बऱ्या होणे, आणि इच्छेला स्वाधीन करणे. ऐकण्यास हे आवाहनात्मक आणि कायद्याच्या स्वरूपाचे वाटते, पण प्रत्यक्षात ते सुटका करणारे, प्रकाश आणि जीवनदायी असते, कारण ते स्वतःच्या प्रयत्नाने सिद्ध होत नाही, तर आत्म्याच्या क्षणो- क्षणातील जीवनाला शरण जाण्याने प्राप्त होते.

**तुमचा प्रतिसाद:**

१. तुमच्या जीवनातील कोणती क्षेत्रे (शरीर, मन, इच्छा, संवेदना) ही तुम्हास पवित्र आत्म्याच्या नियंत्रणाच्या अधीन करण्यास सगळ्यात

जास्त आवाहनात्मक वाटते? का असे होते ह्यावर मनन करण्यास थोडा वेळ घालवा आणि आपले विचार ह्यात नमूद करा.

२. ह्या क्षेत्रात छोटासा विजय मिळवून घेण्यासाठी तुम्ही उद्या कोणते पाऊल उचलू शकता?

**अतिरिक्त अभ्यासाकरिता:**

क्लेन्सिंग स्ट्रीम मिनिस्ट्रीज द्वारे *शुद्धीकरणाचा परिसंवाद* (मिनिस्ट्रीज, १९९९)

जॉन माक्सवेल द्वारे *द विनिंग आटीट्युड* (माक्सवेल, १९९३)

जॉइस मायर द्वारे *बाटलफिल्ड ऑफ द माइंड* (मेयर, १९९५)



## धडा ३: माझ्या आयुष्याचा नकाशा तयार करणे

माझ्या सेवाकार्याच्या संपूर्ण वर्षांमध्ये, देवाच्या मुलींच्या आयुष्याच्या अनेक गोष्टी मी ऐकल्या आहेत. माझी तात्पर्ये कोणत्याही प्रकारे एका वैज्ञानिक अभ्यासाचे परिणाम नसल्याने, मी तीन सामान्य निरीक्षणे करू शकते:

१. अनेक स्त्रिया ह्या विधर्मी आई वडिलांच्या पोटी वाढवल्या गेल्या असल्या आणि क्वचितच ते चर्चला गेले असतले तरीही, ह्यातील बहुसंख्यक स्त्रियांनी , त्यांना आश्चर्य वाटेल इतके जाणून घेतले, की लहान लेकरे म्हणून देखील ते प्रार्थना करून देवावर विश्वास ठेवत होते.

२. अंदाजे सुमारे अर्धवट स्त्रिया ज्यांनी माझ्यासोबत त्यांच्या गोष्टी वाटून घेतल्या आणि सांगितल्या त्या लहान मूल असताना शाब्दिक किंवा लैंगिक छळास बळी पडल्या होत्या. त्यातील अनेकांनी कोणासोबत तो

टिपा

अनुभव वाटून घेतलेला नव्हता, पण एका " सुरक्षित" अशा रचनेत बोलण्यास त्यांना ते स्वतंत्र असे वाटत होते.

३. आपल्या आयुष्याच्या गोष्टींमधून जे धडे शिकण्यास मिळतात त्या ऐकून व त्यावर मनन करून त्यामध्ये सामर्थ्य, सुज्ञान, उत्तेजन आणि शक्ती आहे.

तुमच्या "अध्यात्मिक प्रवासावर" मार्गदर्शन करण्याच्या प्रक्रियेवर मनन करण्यास हा धडा सज्ज आहे. ह्याचा हेतू म्हणजे तुमच्या जीवनाच्या घटना आणि अनुभव ह्यावरील हे एक प्रार्थनापूर्वक चिंतन आहे जे तुम्ही कोण आहात आणि तुमच्या नेतृत्वाच्या प्रवासात पुढे देव कोणत्या कारणास्तव तुम्हाला पाचारण करत आहे ह्यासाठी एक ताजातवाना दृष्टीकोन तुम्हास मिळावा.

**माझा वारसा:**

"एक वंशावळ" तयार करा ज्यामध्ये कुटुंबातील सदस्यांची आणि नातेसंबंधांची नावे असतील ज्यांनी तुमच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पाडला आहे. तुम्हाला ज्या जन्माच्या अथवा मृत्युच्या तारखा नाहीत नाहीत त्यांचा समावेश करू नका. हे ध्येय एक वंशावळ तयार करण्यासाठी नव्हते, तर तुमच्या जीवनात कौटुंबिक प्रभावाची नोंद करण्यासाठी आहे. प्रत्येक

नावाच्या शेजारी त्यांचे तुमच्याशी काय नाते आहे आणि तुमच्या जीवनावर त्याचा कसा सकारात्मक प्रभाव पडतो ह्याची यादी तयार करा. ह्या ठिकाणी हे एक उदाहारण आहे:

मेरी आन मुंडे: आई

- इतरांची सेवा करण्याचा नमुना प्रस्तुत केला
- विनम्रता दाखवली, आणि प्रतिकूलतेवर कसा विजय मिळवायचा.

तुमचे असे वंशज असतील ज्यांना कधीच तुम्ही भेटला नसाल, पण त्यांनी असे काही निर्णय घेतले ज्याचा तुमच्या जीवनावर सकारात्मक परिणाम पडला असेल. कदाचित दुसऱ्या देशात स्थलांतर करण्याचा निर्णय त्यांनी घेतला असेल किंवा त्यांनी अशा धंद्याची सुरुवात केली असेल ज्यामुळे  कौटुंबिक जीवनाची दिशा बदलली.

देवाचे हे तुमच्या जीवनातील कार्य म्हणजे तुमचा वारसा आहे, जरी काही घटना तुमच्या जन्माच्या आधी घडल्या असतील.

**माझ्या जीवनाची गोष्ट:**

जन्मापासून आतापर्यंत तुमचे जीवन पाच- वर्षीय वाढीमध्ये जे विभागले गेले त्याचा विचार करा. कागदाच्या एका वेगळ्या तुकड्यावर अथवा वहीत, प्रत्येक पाच वर्षाच्या काळासाठी, तुमच्या जीवनात ज्या सर्वात महत्वाच्या गोष्टी घडल्या त्याची यादी तयार करा, ज्या लोकांनी तुमच्यावर प्रभाव पाडला आणि ज्या ठिकाणांचा तुम्हाला अनुभव आला. त्या का महत्वाच्या आहेत त्याबद्दल एक छोटे विधान लिहून काढा.

विशेषकरून ह्याबद्दल विचार करा:

१. त्रास- विशेषतः दुखदायक घटना, लोक, किंवा अनुभव
२. आनंद- मोठा आनंद आणि समाधान ह्याचे अनुभव
३. प्रभाव पाडणारे - ज्या लोकांनी तुम्हाला प्रेरित केले - निरीक्षक, आई वडील, जवळचे मित्र, शिक्षक, ज्या पुढाऱ्यांना तुम्ही भेटला किंवा ज्या लोकांविषयी तुम्ही वाचले
४. देव जो कार्यरत आहे- तुमच्या जीवनात "देवाचा हस्त" म्हणून गोष्टी होत्या ज्यावर तुमचा विश्वास आहे

उदाहरणार्थ: 0 ते ५ वर्षे :

लोक:

१. आई
२. वडील
३. बहिण (बहिणी)
४. भाऊ

ठिकाणे:

१. घर
२. आजोळ
३. चर्च


घटना:

१. भाऊ किंवा बहिणीचा जन्म
२. शाळेची सुरुवात करणे
३. कौटुंबिक हालचाल

करण्यासाठी आवडती गोष्ट:

१. घरामध्ये माझ्या आईला मदत करणे
२. पाहुण्यांचे आदरातिथ्य करणे
३. वर्गात माझ्या शिक्षकांना मदत करणे

तुमच्या जीवनाच्या प्रत्येक पाच- वर्षीय वाढीव काळासाठी ते करा: वय ६-१०, वय ११-१५ इत्य.




१. ती माहिती घेऊन तुमच्या आयुष्याच्या गोष्टीतील प्रसंगामधील "चढ आणि उतार" ह्यांचे वर्णन करण्यासाठी खालील ओळीचा वापर करा. आवश्यक असेल तर ही ओळ थोडी लांब करा. तुमच्या मूल्यमापनात तुमच्या विचारांवर सर्वाधिक प्रभाव पाडणाऱ्या घटना/व्यक्ती/स्थान ह्याचे वर्णन करण्यासाठी एखादा शब्द घाला. असा तक्ता तयार करण्यासाठी, १ ते १२ मध्ये एखादी संख्या त्याला द्या प्रत्येक वयोगटासाठी आणि त्या वयातील तुमची भावनिक, अध्यात्मिक आणि परिस्थितीनुरूप दशा ह्यासाठी ती तयार करा.
२. प्रत्येक काळातील "चढ आणि उतार" ह्यांचे वर्णन करण्यासाठी वेगळ्या रंगत एखादी ओळ ही त्यात घाला.
३. एक ३री ओळ वेगळ्या रंगाची अथवा रचनेची त्यात घाला आणि त्यामधून तुमच्या आयुष्यातील "चढ आणि उतार" ह्याचे वर्णन करा

(तुमचे देवासोबत चालणे).

**माझे पाचारण, वरदान आणि आवेश**

तुमच्या जीवनाचा वारसा आणि गोष्टी ह्यावर जसे तुम्ही मनन करता, त्यातील तीन “गोष्टी” अथवा घटना आणि परिस्थिती ह्यांची निवड करा जेव्हा तुम्हाला सर्वात परिपूर्ण आणि उत्साही असे वाटले, अशा वेळी जेव्हा तुम्हाला वाटले की देवाची जिथे इच्छा आहे तिकडेच तुम्ही आहात, आणि ज्यासाठी तुमची निर्मिती झाली आहे तेच करत आहात. ती एखादी विशिष्ट घटना असू शकते, किंवा कोणतेतरी कार्य करण्याचा तो समय असू शकतो ज्यासाठी तुम्हाला ते आवाहन मिळाले असेल, आणि तरीही यशस्वी रीतीने तुम्ही ते सिद्ध केले आहे. खाली दिलेल्या जागेचा वापर त्या प्रत्येक “गोष्टीचे” संक्षिप्त वर्णन करण्यासाठी करा जेणेकरून तुम्हाला त्याची आठवण होईल. तुम्ही ते लिहत असताना, पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा:

हे करण्याची सुरुवात मी कशी केली?

अ. मी काय केले?

ब. मी ते कसे पूर्ण केले?

क. मी ते चांगले केले हे कसे ओळखू शकतो?

ड. त्याविषयी सर्वात जास्त मला काय आवडले?

गोष्ट १:

गोष्ट २:

गोष्ट ३:

ह्या क्षणाला तुम्ही आपली गोष्ट एखाद्या विश्वस्त मित्रासोबत वाटून घ्या, आणि तुमच्या स्मरणात येईल तसे त्यात रंग भर, तुम्ही काय केले व ते कसे केले ह्याचे वर्णन करत, का केले ह्याचे वर्णन नाही. तुम्ही स्वतः ते करत असताना पहा आणि तो अनुभव इतका तृप्त करणारा का वाटला ह्याचे वर्णन करा. तुमच्या मित्राचे अथवा मैत्रिणीचे काम म्हणजे ते ऐकणे आणि तुम्ही ज्या कृती करता त्या लिहून काढणे आणि ते का इतके समाधानी वाटले, आणि त्यात तुम्ही किथे होता आणि कोणासोबत होता ह्याविषयी लिहून काढा.
त्या गोष्टीतील सामन्य बघण्यास तुम्ही आणि तुमचे मित्र एकत्र बसून कार्य करू शकता.

**सारांश:**

जेव्हा तुम्ही एकटे असता, तुमच्या गोष्टी, तुमचा वारसा आणि तुमचे भूतकाळातील अनुभव ह्याविषयी प्रार्थनापूर्वक चिंतन करा, आणि तुम्ही स्वतःबद्दल काय शिकला आणि ह्या सरावातून देवाचे तुमच्यासाठी असणारे पाचारण आणि उद्देश ह्याविषयी काय समजून घेतले हे पहा. आता तुम्ही कशाबद्दल आवेशी आहात? त्या क्षेत्रात

सेवाकार्य करण्यासाठी कोणते वरदान/ अनुभव सहाय्यक ठरले आहेत? काही वरदाने त्यातील सुप्त रूपाचे असतील आणि अनेक अनुभव असतील ज्याचा अर्थ तुम्हाला अजुनही समजला नाही, पण कसेतरी करून तुम्ही विश्वास ठेवा की “गोष्ट अपूर्ण आहे”, आणि त्यातून देवाचा हेतू अजूनही प्रगट व्हायचा आहे.

माझ्यासाठी व्यक्तीशः, हा सराव करत असताना, मला कळले की मला “स्त्रिया आणि उद्योग” ह्यात रस होता. काही काळातच, मी स्त्रियांच्या सेवाकार्यातून मुख्य म्हणून सेवानिवृत्त झाले आणि वयाच्या ६५ व्या वर्षी एका संस्थेत मास्टर ऑफ बिजिनेस आडमिनीस्त्रेशन हे हाती घेतले ज्यामध्ये धर्मशास्त्र आणि उद्योग ह्यावर भर देण्यात आले होते. तुमचा अनुभव तुम्हाला आयुष्यात कमी नाटकीय बदलासमोर घेऊन येऊ शकतो, पण देवाने तुमच्या जीवनात हस्तक्षेप करण्याच्या क्षमतेला कमी लेखू नका आणि त्याने तुमच्या मार्गांना दिशा दाखववावी हे कमी समजू नका!

**पाठांतर करा:**

**स्तोत्रसहिता १३९:१३-१६** [१३] तूच माझे अंतर्याम निर्माण केलेस; तूच माझ्या आईच्या उदरी माझी घडण केलीस. [१४] भयप्रद व अद्भुत रीतीने माझी घडण झाली आहे, म्हणून मी तुझे उपकारस्मरण करतो; तुझी कृत्ये अद्भुत आहेत हे माझा जीव पूर्णपणे जाणून आहे. [१५] मी गुप्त स्थळी निर्माण होत असता आणि पृथ्वीच्या अधोभागी विलक्षण प्रकारे माझी घडण होत असता माझी आकृती तुला गुप्त नव्हती. [१६] मी गर्भात पिंडरूपाने असताना तुझ्या नेत्रांनी मला पाहिले, आणि माझा एकही दिवस उगवण्यापूर्वी ते सर्व तुझ्या वहीत नमूद करून ठेवले

होते.

◐ स्तोत्रसहिता ३७: २३-२४ (एनएलटी) [२३] परमेश्वर मनुष्याची गती स्थिर करतो, आणि त्याचा मार्ग त्याला प्रिय आहे. [२४] तो पडला तरी सपशेल पडणार नाही; कारण परमेश्वर त्याला हात देऊन सावरील.

**महत्वाचे सत्य:**

तुमच्या मातेच्या उदारापासून देव तुमच्यासोबत होता, त्रासाच्या आणि आनंदाच्या समायात, तुम्हाला त्याच्या सान्निध्याची जाणीव असो किंवा नाही; त्याच्या प्रेमापासून तुम्हाला काहीच विभक्त करू शकत नाही.

**तुमचा प्रतिसाद:**

१. देवाने तुम्हाला कोणती वरदाने दिली असा तुमचा अंदाज आहे, पण अजूनही ते सुप्त अवस्थेत आहेत, आणि तरीही त्याच्या राज्याच्या हेतूसाठी त्यांचा विकास होत आहे?

२. आता किंवा पुढील ५ वर्षात तुम्ही कोणते पाऊल घेऊ शकता ते वरदान "ओळखण्यासाठी", त्याला वर घेऊन येण्यास जिकडे त्याचा विकास होऊ शकतो?

**अतिरिक्त अभ्यासासाठी:**

*वाट इज यॉउर गिफटेडनेस?* (हेन्द्रीक्स, २०१३) तुमचे *डिस्कवरिंग यॉउर गिफटेडनेस* (बॉक,२०१५)

टोम राथ ह्यांचे *स्ट्रेन्थस फाईंडर २.०* (राथ,२०१४)

पीटर वागनेर द्वारे *यॉउर स्पिरिच्युअल गिफ्ट्स* (वागनेर, १९९४)

डॉन & केटी फॉरच्यून ह्यांचे *डिस्कवर यॉउर गौड गीवन गिफ्टस* (फॉरच्यून & फॉरच्यून, १९८७)

*फ्री स्पिरीच्युअल गिफ्ट्स अनालिसिस* (गिल्बर्ट, २०१५)



## धडा ४: माझा भूतकाळ हाताळणे

तुमचा वारसा तसेच तुमच्या वयक्तिक जीवनाच्या प्रवासाबद्दल जसा तुम्ही विचार करता आणि वेळ घालवता, त्या व्यक्ती, ठिकाणे तुमच्या आयुष्याला, नात्यांना आणि सेवेला आज कसे प्रभावित करण्याचा प्रयत्न करतात ह्याचा विचार करा. तुमच्यात इतरांनी ते सुज्ञान, दुरुदृष्टी आणि आशीर्वाद ओतले आणि आता तुमच्यातून ते इतरांच्या प्रती वाहत आहे आणि इतरांना कसे आशीर्वादित करतील ह्याचा विचार करा. हे नकारात्मक अनुभव आणि दुखसहन ह्यांनी तुमच्या नात्यांवर कसा प्रभाव पाडला? कदाचित त्यापैकी काहींनी तुम्हाला अधिक कनवाळू आणि काळजीवाहक सल्लागार आणि मित्र बनवले असेल (२ तीमथी २:२). नंतरच्या लोकांनी आणि अनुभवांनी तुम्हाला "चांगले" किंवा "कटू" बनवू शकतात. ज्या गोष्टी सकारात्मक आहेत त्यांना किती जास्त करू शकता आणि तुमच्या भूतकाळातील नकारात्मक गोष्टींचा प्रभाव कमी कसा करू शकता ह्याचा विचार करा.

**यशावर चिंतन करणे**

तुमच्या जीवनाच्या "आनंदावर" विचार करण्यासाठी क्षणभर वेळ घालवा, अशा समयासाठी जेव्हा तुम्हाला वाटले की ज्या कारणासाठी देवाने तुम्हास निर्माण केले तेच तुम्ही करत आहात आणि त्यात देवाच्या आशीर्वादाचा हात तुम्ही बघितला. तुम्ही काय विचार करत आहात? तुम्ही जे काही सिद्ध करू शकला त्याच्यात अभिमानाची भावना होती का? त्या ठिकाणी परत येण्याचा जाणीवपूर्वक विचार होता का? दुखाची अथवा भीतीची भावना की कदाचित तुमचे "गौरवाचे दिवस" संपतील आणि ह्या ठिकाणाहून सर्वकाही ढलतीला लागेल? आपल्या यशामधून कोणते धडे आपण घेऊ शकतो? अनेक माझ्या मनात येतात. तुमच्या अधिक जवळ असणारे लोक देव तुम्हाला प्रगट करू शकतो, पण ह्या ठिकाणी काही आहेत ज्यांनी मला शिकवले.

जेव्हा मी खूप कष्ट केले आणि मग दिसून येणारे यश मला लाभले, तेव्हा थोड्या गर्वाने भरून जाणे हे सहज आहे. कदाचित इतरांच्या आधी मी त्या यशाने फुगून न जाण्यास हुशार होतो, पण माझ्या हृदयात स्वतःचे अभिनंदन करणारी भावना होती का? गर्व हा पुढार्यासाठी एक घातकी खड्डा आहे. नबूखदनेजर राजापेक्षा दुसरे कोणीही तो धडा जबरदस्तीने शिकवत नाही, ज्याला यशाची ती भावना मिळाल्यावर, एक दृष्टांत मिळतो, आणि मग त्याचा खोलवर अपमान होतो. त्याच्या इशाऱ्याकडे लक्ष द्या आणि ऐका: "जे अभिमानाने चालतात त्यांना त्याला नीचावस्थेत लोटता येते." (दानियेल ४:३०-३७).

अनेक प्रसंग असतात जेव्हा आपल्याला "देवाच्या कार्याची" जाणीव लगेच होते आपल्या यशाकडे बघून- अचानक एक संधी जी चमत्कारिक रीतीने मिळते (किंवा बंद होते), आत्म्याची एक शांत, मंद

वाणी जी आपल्याला एक कठीण पण अनपेक्षित सुज्ञ निर्णयाकडे वळवते, एक " दैवी निवड" जी एका सामान्य संभाषणात दिसून येते. पण जेव्हा आपण खूप काळ काबाडकष्ट करून ते ध्येय गाठतो, आणि आपल्यासाभोवतीलोक असतात जे यशासाठी आपले अभिनंदन करत असतात, ज्याने आपणास पाहण्यास डोळे दिले, ऐकण्यास कान दिले आणि विचार करण्यास मेंदू दिला, शिकण्यास संधी दिल्या, आणि प्रेमळ आई वडील दिले ज्यांनी बाल अवस्थेपासून आपले पोषण केले हे सर्वकाही देणाऱ्याचा आपल्याला विसर पडतो. आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनी यशस्वी झालो असा वोचार करणे सोपे आहे, आणि मग आपली कृतज्ञता त्याच्याप्रती आपण व्यक्त करू शकत नाही, आणि ज्यांनी ह्या आपल्या प्रवासात आपली मदत केली त्यांच्याप्रती देखील ती व्यक्त करू शकत नाही. तुमच्या "आनंदावर" जसे तुम्ही चिंतन करता, देवाच्या प्रती तुमची कृतज्ञता प्रदर्शित करा. तुम्ही जर तसे केले नसेल, एक आभारप्रदर्शन करणारी टीप लिहून काढा किंवा एखादा इ-मेल लिहा त्या लोकांना ज्यांनी तुमच्या जीवनावर तो प्रभाव पाडला आहे.

जर तुम्हाला ते दुख अथवा भय वाटत

टिपा

आहे की  “सर्वोत्तम हे घडून गेले,” स्तोत्र १३९:१६ म्हणते देवाने त्याच्या पुस्तकात लिहीले आहे, “माझा एकही दिवस उगवण्यापूर्वी ते सर्व तुझ्या वहीत नमूद करून ठेवले होते.” जोपर्यंत तुमच्या शरीरात श्वास आहे, देवाच्या राज्याचा विस्तार होण्यामध्ये तुमच्यासाठी त्याने काम राखून ठेवले आहे. प्रश्न आहे की भूतकाळातून तुम्ही आपले डोळे काढून भविष्यासाठी जो काही दृष्टांत आहे त्याकडे लक्ष देता का. ए. आर. बरनार्द , त्यांच्या सुप्रसिद्ध उपदेश  “तुमचा दृष्टांत तुमचे भवितव्य आहे” इशारा देतात, “दृष्टांताच्या शिवाय मनुष्य म्हणजे भविष्याच्या शिवाय असणारा मनुष्य आहे आणि असा मनुष्य नेहमी त्याच्या भूतकाळाकडे वळतो.” येशूच्या मृत्युनंतर पेत्राने इतर शिष्यांना परत मासेमारी कडे नेले, नामी देखील तिच्या पतीच्या व मुलांच्या मृत्युनंतर इस्राएलला परतली, आणि देवाने थांबवले नसते तर आदाम देखील परत एदेन बागेत परतला असता. तुम्ही जर स्वतःला भूतकाळात रमत असणारा म्हणून बघत असाल, विचारण्यासाठी उत्तम प्रश्न म्हणजे देवाने जे भविष्य तुमच्यासाठी आखून ठेवले आहे त्यासाठी तो दृष्टांत तुम्ही गमावून बसला आहात का (यिर्मया २९:११).

टिपा

**भावनिक जखमा बऱ्या होणे**

आपण प्रत्येकाने आपल्या जीवनात असे ऋतू अनुभवले जेव्हा आपले विश्व अनपेक्षितपणे आपल्याभोवती कोलमडून पडले असे वाटते. उदाहरणार्थ, अचानकपणे एखाद्या प्रिय व्यक्तीचा मृत्यू, एक आर्थिक फटका, एका तरुणाची बंडखोरी, एका मित्राचा विश्वासघात, एक मोडलेले नातेसंबंध, किंवा मागील अध्यायात ज्याची नोंद तुम्ही "कठीण समय" म्हणून केलेली होती. त्या समयामध्ये जो भावनिक आघात आपण सर्वजण सहन करतो तो अनेक वर्षे खोलवर आपल्या आत्म्यात राहू शकतो, जेव्हा सर्वात कमी आपण त्याची अपेक्षा करतो तेव्हा दुखदायक रीतीने तो आपल्यात पुन्हा उभारून येतो, आणि त्यातून राग, भय, नकार, त्याग, मानसिक छळ, भीती, लज्जा, किंवा इतर भावनांचा अचानक उद्रेक होतो ज्यांचा परिणाम आपल्या निर्णयांवर आणि वर्तमानातील नात्यांवर होतो. प्रश्न आहे की, तारण प्राप्त करून घेताना जर आपल्याला भावनिक आरोग्य लगेच मिळाले नाही, तर ते कसे मिळते? ते शक्य होते का?

मला तुम्हाला हे खात्रीने सांगू द्या, येशू हा आरोग्यदाता आहे, केवळ शारीरिक वेदनेपासून नाही, तर भावनिक त्रासापासून देखील. भग्न हृदयांना दुरुस्त करणारा तो आहे. ताबडतोब चमत्कारिक रीतीने तो त्या सर्व जखमा बऱ्या करेन, किंवा विशिष्ट रीतीने त्याचे हृदयांना बरे करणे हे कांद्याचे साल अलगद काढण्यासारखे असेल, एकावेळी एकाच पापुद्रा, जसा प्रत्येक त्याच्या प्रेमळ स्पर्शाप्रती समर्पित असतो. माझ्या अनुभवातून, शारीरिक आणि भावनिक जखमा ह्यात समांतरे आहेत आणि

प्रत्येकाला लागणारे जे आरोग्य हे त्यात देखील साम्य आहे. वरवर

आलेल्या ओरखड्याला कमी लक्ष, काळजी आणि वेळ लागतात त्या पोटाच्या शस्त्रक्रियेच्या जखमेतून बरे होण्याला लागतात त्यापेक्षा. आधीच्या बाबतीत जलद रीतीने तपासणी करणे, मलम लावणे, मलमपट्टी करणे, आणि अशा काही गोष्टींची आवश्यकता असते. तसेच, काही वरवर दिसणाऱ्या भावनिक जखमा- एक दयाहीन शब्द, एक क्रोधी उत्तर, एक दूरदृष्टी- ताबडतोब ते डंक करण्याकडे वळवतात, पण एक लवकर तपासणी, क्षमेचा शब्द आणि प्रेम व आदर ह्यांची खात्रीपूर्वक पुनरावृत्ती हा योग्य प्रतिसाद आहे. ती बाब लवकर बरी होऊन त्याचा विसर देखील पडतो.

नितीसुत्रे १९:११ योग्य रीतीने सुचवते,
"विवेकाने मनुष्य मंदक्रोध होतो;
अपराधाची गय करणे त्याला भूषण आहे."

पण खोल असलेल्या जखमा इतक्या सहज बर्या होत नसतात- एका जवळच्या मित्राचा विश्वासघात, विश्वस्त सल्लागाराची फसवणूक, एक भग्न अभिवचन, एक न सोडवलेले भांडण जे वादावादी किंवा अन्याय ह्यास जन्मास घालतात. ह्यांना अतिरिक्त लक्ष देणे आवश्यक स्टे. जर त्यावर वेळीच उपचार झाला नाही, ह्या भावनिक जखमा, उपचार न केलेल्या शारीरिक जखमांच्या प्रमाणे, त्या "चिडून" शरीरात सर्वत्र "पसरू" शकतात. एक भावनिक जखम अशा प्रकारे चिडखोर बनते जेव्हा आपण सतत "ती खपली काढण्याचा प्रयत्न" करतो जे काही चुकीचे असते त्यावर सतत लक्ष केंद्रित करत असतो आणि ती बाब सोडवण्यासाठी प्रार्थना करत नाही, किंवा हृदयात कटुत्व जन्मास येण्याची परवानगी देतो (इब्री १२:१५). आपण स्वतःचे समर्थन करतो सिद्ध करून की आपणास केवळ "सत्य" पाहिजे असते आणि टिकाव धरून राहण्याठी "नितीमत्वाची " गरज असते, पण खोलवर

हृदयात अशी एक चिडलेली जखम असते जी विष पेरून आपले हृदय आणि नातेसंबंध ह्यांना कलुषित करण्याचा प्रयत्न करत असते. खऱ्या क्षमेमध्येच आरोग्य आणि स्वातंत्र्य असते. शास्त्रवचन अत्यंत स्पष्ट आहे. ख्रिस्ती व्यक्तीसाठी क्षमा ही पर्यायी नसते. मत्तय ६:१५ मध्ये येशूने म्हंटले, “परंतु जर तुम्ही लोकांना क्षमा केली नाही तर तुमचा पिताही तुमच्या अपराधांची क्षमा करणार नाही.” क्षमेचा अर्थ असा नाही की त्या व्यक्तिने जे काही केले ते दुखदायक नव्हते अथवा ते मान्य आहे व त्याची पुनरावृत्ती होऊ शकते. आणि क्षमेचा अर्थ असा देखील नाही की त्या व्यक्तीसोबत पुन्हा आपले नाते हे पाहिल्यासारखे व्हावे. जर त्यांनी केलेली चूक कबूल केली नाही आणि पुन्हा आपणास इजा पोहचवण्यास तयार असले, तरीही आपण त्यांना क्षमा करू शकतो, आणि दुरून त्यांच्यावर प्रेम करू शकतो. क्षमा ही आपल्यासाठी आहे, जेणेकरून क्षमा न करण्याचे विष आपली इतर नाती नष्ट करत नाहीत किंवा ज्या व्यक्ती ने आपल्याला दुख दिले त्याच्याशी भावनिक रीतीने जोडून ठेवत नाही. म्हणून भूतकाळातील एखादी चूक तिला आपण खरेच क्षमा केले अथवा नाही हे कसे सांगू शकतो? जेव्हा ती घटना आपल्या वर्तमानातील कोणत्याही निर्णयांवर प्रभाव पाडत नाही तेव्हा, आपण तिच्या सत्तेपासून मुक्त झालो हे समजू शकतो. लक्षात ठेवा की क्षमा ही एक प्रक्रिया आहे एकाच वेळी घडणारी गोष्ट नाही. जेव्हा ती इजा मनात येते, क्षमा करण्याचा निर्णय घ्या.

खूप खोलवर “पोटाची शस्तक्रिया” प्रकारच्या भावनिक जखमा असतात ज्या छळ, अपमान अथवा इतर हिंसाचारातून जन्मास येतात ज्या स्वतः सहन केलेल्या असतात अथवा एक साक्षीदार म्हणून बघण्यात येतात. येशू अजूनही हृदये बरे करणारा आणि आरोग्यदाता आहे. कोणतीही परिस्थिती त्याच्या सौम्य प्रेमळ स्पर्श होण्यासाठी

अवघड अशी नाही. शारीरिक जखमांच्या नुसार, भावनिक जखमा ह्या खूप खोलवर असून बाहेरून दिसतात- भग्न नात्यांचा एखादा धागा, एक चिडलेला चेहरा आणि कटू वक्तृत्व, भय आणि असुरक्षेची जाणीव जे सर्व वाढ होण्यात अडखळन आहेत. आणि जसे शारीरिक जखमांचे असते, येशू भावनिक जखमा देखील आतून बाहेर बऱ्या करतो.

स्वातंत्र्याचा अनुभव घेण्यासाठी भूतकाळातील आपल्या कोणत्या भावनिक जखमा आहेत अथवा नाही ज्यांना आपण कृती करण्याची आवश्यकता आहे हे आपण कसे सांगू शकतो? आपल्यातील बऱ्याच लोकांनी अशा समयांचा अनुभव घेतला जेव्हा कोणीतरी काहीतरी बोलले अथवा केले, आणि आपण स्वतः अशी प्रतिक्रिया देतो, की त्या तप्त क्षणात देखील, जी परीस्त्जीती अनुरूप नाही ही पटकन ओळखू शकतो. ते कशामुळे होते? अनेकदा, ती एक बरी न झालेली जखम असते जी शत्रू एक सापळा म्हणून वापरतो जेणेकरून त्याच्या नकारात्मक विचाराकडे आपण धाव घेतो, अनेकदा एक लबाडी असते ज्यावर कठीण समयात आपण त्यावर विश्वास ठेवण्यास भाग होतो. ती लबाडी मग आपणास भावनिक रीतीने बंदिवान म्हणून ठेवते जोपर्यंत ते सत्य आपणास मुक्त करत नाही (योहान ८:३२).

भावनिक स्वातंत्र्य आणि आरोग्य अनुभवण्यासाठी आपण कोणत्या कृती करू शकतो? (टीप: एक विश्वस्त परिपक्व मित्राने तुमच्यासोबत असावे आणि ह्या मार्गांचे जसे तुम्ही अवलंबन करता त्याचे अनुसरण करावे अशी तुमची इच्छा असेल).

अ. तुमच्या स्वर्गीय पित्याच्या समोर शांतपणे या आणि तुम्हाला सहाय्य आणि आरोग्य पाहिजे हे जाणून घ्या.

आ. तुमच्या जखमेच्या मुळाशी जी वास्तविक परिस्थिती आहे ती

पवित्र आत्म्याने तुम्हाला दाखवून द्यावी अशी त्याला याचना करा. भूतकाळातील एखादी घटना तो तुमच्या मनात आणू शकतो, किंवा कदाचित त्याची शांत मंद वाणी तुमच्या हृदयाशी बोलू शकते. तुम्हाला काय मिळते हे पाहून आश्चर्यचकित व्हाल, पण त्याच्या मार्गदर्शनावर विश्वास ठेवा.

इ. त्या परिस्थितीच्या बद्दल तुम्ही काहीतरी जाणून घ्यावे अशी त्याची इच्छा आहे अथवा नाही हे त्यास विचारा आणि परिणामी लबाडीवर विश्वास ठेवावा असे त्याने भाग पाडले आहे की नाही. देवाच्या वचनाच्या विरोधात जे काही आहे ती शत्रूची एक लबाडी असते. उदाहरणार्थ, “माझ्यावर कोणीही प्रेम करत नाही,” ही शत्रूची एक लबाडी असते. “मला स्वतःला ते शोधावे लागेल. माझ्यासाठी ते कोणीही करणार नाही.” शत्रूची ही एक दुसरी लबाडी आहे.

ई. पश्चाताप करा आणि देवाने तुमची क्षमा करावी असे मागा. शत्रूच्या एका लबाडीवर विश्वास ठेवणे एक पाप आहे. अनेक इतर पापे असतील जे तुम्ही केले असतील जे त्या घटनेशी देखील जोडलेले असतील. उदाहरणार्थ, पाखंडात सहभागी होणे एक पाप आहे, आणि स्वेच्छेने अशा प्रकारे सवय लावणाऱ्या वागणुकीत सहभाग घेणे एक पाप आहे.

उ. देवाला मागा की असे कोणीतरी आहे का ज्याची क्षमा तुम्हाला मागायची आहे आणि तो जे काही करायला सांगत आहे त्याच्याप्रती आज्ञापालन करा. तुमच्या हृदयात क्षमा न बाळगणे हे एक पाप आहे.

देवाची क्षमा आणि त्याचे आरोग्यदायी सामर्थ्य ह्यासाठी त्याचे आभार मानण्यासाठी विसरू नका.

कठीण समय जर इतका आवाहनात्मक असेल आणि आपल्या जीवनांवर जर त्याचा नकारात्मक परिणाम पाडत असेल तर, एक प्रेमळ देव आपणास त्या वेदना आणि संघर्ष ह्याप्सून का वाचवत नाही? आपल्यातील बरेच वास्तविकतेशी दुजोरा देऊ शकता की ह्या तरसाच्या कठीण समयातच आपण वाढलो, आपल्या इच्छा त्याच्या स्वाधीन केल्या आणि त्याच्या संपूर्ण प्रक्रियेत त्याच्यावर विसंबून राहिलो.

**पाठांतर करा:**

- योहान ८:३२ - तुम्हांला सत्य समजेल व सत्य तुम्हांला बंधमुक्त करील.

- **२ करिंथकरास पत्र १०:४-५** - ४ कारण आमच्या युद्धाची शस्त्रे दैहिक नाहीत, तर तटबंदी जमीनदोस्त करण्यास ती देवाच्या दृष्टीने समर्थ आहेत. ५ तर्कवितर्क व देवविषयक ज्ञानाविरुद्ध उंच उभारलेले असे सर्वकाही पाडून टाकून आम्ही प्रत्येक कल्पना अंकित करून तिला ख्रिस्तापुढे मान वाकवण्यास लावतो.
- १ **करिंथकरास पत्र** १०:१३ -मनुष्याला सहन करता येत नाही अशी परीक्षा तुमच्यावर गुदरली नाही; आणि देव विश्‍वसनीय आहे, तो तुमची परीक्षा तुमच्या शक्तीपलीकडे होऊ देणार नाही, तर परीक्षेबरोबर तिच्यातून निभावण्याचा उपायही करील, ह्यासाठी की, तुम्ही ती सहन करण्यास समर्थ व्हावे.

**महत्वाचे सत्य:**

आपल्या भूतकाळातील बंदिवानातून आपण मुक्त व्हावे ही देवाची इच्छा आहे, त्याच्या सत्याच्या भिंगातून त्याच्या दृष्टीकोनातून ते पाहण्यास- क्षमा झालेली पापे, शुद्ध झालेला विवेक, बऱ्या झालेल्या जखमा, हरलेला सैतान, विजय मिळवलेले भय, पुनर्स्थापित प्रेम.

**तुमचा प्रतिसाद:**

तुमच्या जीवनातील कोणत्याही क्षेत्रात जर तूनही सातत्याने देवाची क्षमा मागत असाल, काही काळ “एकट्याने” त्याच्यासोबत वेळ घालवा, त्या विशिष्ट क्षेत्रात तुम्हाला विजय का मिळत नाही हे त्याने दाखवावे अशी त्याल विनवणी करा. माझ्यासाठी हे तर गर्वाचे एक पाप होते. एके दिवशी जसे मी पुन्हा ते कबूल केले प्रभू मला ते म्हणत असल्याचे मला आठवते “तुम्हाला ते सोडून द्यायचे आहे का?” प्रामाणिकपणे हा विचार कधीच माझ्या मनात आला नाही की मी मुक्त होऊ शकतो. माझी लगेच प्रतिक्रिया अशी होती, “होय” पुढे पंधरा मिनिटे माझ्यासमोर अशा परिस्थिती आल्या जेव्हा मी इतरांशी स्पर्धा केली (माझी बहिण, मित्र, पती) आणि “जिंकण्यामध्ये” तो अभिमान अनुभवला. मग त्याने मला दाखवले की कशा रीतीने त्या स्पर्धेच्या वृत्तीने माझ्या नात्यांवर परिणाम पाडला आणि त्यामुळे हेव्याचा आत्मा जन्मास आला ज्याने माझ्या मनात मूळ घेतले. ही तर स्वातंत्र्याच्या माझ्या प्रवासाची सुरुवात होती. देवाला तुमच्याशी कशाबद्दल बोलायचे आहे?

**अतिरिक्त अभ्यासासाठी:**

एड. एम. स्मिथ ह्यांचे *थियोफोस्तिक प्रेअर मिनिस्ट्री* (स्मिथ, २००५)

रॉबर्त मॉरीस ह्यांचे *टोटली फ्री* (मॉरीस, २०१५)

बेथ मूर ह्यांचे *ब्रेकिंग फ्री* (मूर, १९९९)

लुवीस स्मिडीस ह्यांचे *फोर्गीव अंड फोर्गेट* (स्मिडीस, १९८४)

www.immanuelapproach.com



## धडा ५ : देवाबरोबर माझे नातेसंबंध जोपासणे

आपली शारीरिक परिस्थिती आणि आरोग्य हे राखण्यासाठी जसे कसरत करणे आवश्यक असते, अध्यात्मिक रीतीने आपले स्नायू ताणून अध्यात्मिक स्वास्थ्य विकसित करणे आवश्यक आहे. ह्याच कारणासाठी बारा अध्यात्मिक कसरती आहेत ज्यांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यापैकी सर्वांचा उपयोग तुम्ही रोज करणार नाही किंवा जीवनाच्या प्रत्येक ऋतूमध्ये देखील नाही, पण ते तर अस्तित्वात आहेत ह्याची जाणीव ठेवा आणि अनेक शतकांसाठी ख्रिस्ती लोक त्याचा उपयोग करत आहेत. येशू स्वतः पृथ्वीवर असताना त्याने ह्या सर्व गोष्टींचा नमुना म्हणून प्रस्तुत केला होता. जेव्हा ह्या शाखांचा सराव करण्याची सुरुवात तुम्ही करता, अध्यात्मिक दृष्टीने तुमची वाढ होण्यास त्याची मदत होते आणि त्या दृष्टीने देवासोबत एक खोलवर स्थित नातेसंबंध तुम्ही विकसित करू शकता. आपल्या संवेदना जशा रीतीने आपणास गोष्टी दाखवतात त्याच नुसार शारीरिक दृष्टीपेक्षा

अध्यात्मिक गोष्टी कशा वेगळ्या आहेत हा फरक पटकन समजू शकतो. सुवार्ता ही आहे की आपण प्रगत धर्मशास्त्रज्ञ होण्याची गरज नाही ह्या सर्व शाखांचा सराव करण्यासाठी; आपल्याला केवळ एक हृदय पाहिजे जे देवासाठी आतुर असते (स्तोत्र ४२:१,२).

हे "सराव" करणे जणूकाही ते धार्मिक कर्तव्ये अथवा अध्यात्मिक रीतीने ती एक "यादी" होती हे ध्येय नव्हते. आपले पाप आणि आत्म-केंद्रितपण ह्याला हाताळणे हे ध्येय आहे. आपण जर ह्या सर्वांना स्वतःची इच्छा आणि जोम ह्याने सामोरे जाण्याचे ठरवले, आपण परुशी लोकांप्रमाणे होणार, ज्यांनी हृदयाच्या बाबी हाताळण्यासाठी बाह्यात्कारी स्वरूपाचा उपयोग केला. आपण अपयशी झालो हे शेवटी स्पष्ट होईल, "कारण अंतःकरणात जे भरून गेले आहे तेच मुखावाटे निघणार." (मत्तय १२:३४). केवळ देव हृदयांचा पालट करू शकतो, पण ह्या शाखा आपली हृदये तयार करून देवाने त्याचे कार्य करावे ह्यासाठी सज्ज करतील. बी पेरनार्याच्या दाखल्यात, येशूने म्हंटले आहे की बीज म्हणजे देवाचे वचन आहे, आणि ती भूमी म्हणजे ते हृद्य आहे. तुम्ही ह्या सर्व "शाखांचा" विचार म्हणजे तुमच्या हृदयाची जमीन तयार करत असल्याचा विचार करू शकता जेणेकरून देवाच्या वचनाचे बीज मूळ घेऊन वाढेल (गलतीकरास पत्र ६:८; लूक ८:५-८). "जे वचन मी तुम्हांला सांगितले त्यामुळे तुम्ही आता शुद्ध झालाच आहात" (योहान १५:३).

## भाग १: आत्म्याच्या शाखा

### १. आराधना

टिपा

येशूने त्या विहिरीकडे असलेल्या स्त्रीला सांगितले की देव प्रभावी रीतीने अशा आराधकांचा शोध घेत आहे जे खरेपणाने आणि आत्म्याने त्याची उपासना करतील (योहान ४:२३). त्याचा अर्थ काय आहे? क्षणभर त्यावर चिंतन करा. माझ्यासाठी त्याचा अर्थ म्हणजे जे लोक त्याच्यासमोर प्रेम आणि साधेपणाने , प्रामाणिकपणे आणि उघडपणे, रिक्त हृदये घेऊन येतील, त्यात काहीच लबाडी अथवा गुप्त पापे नसणार आणि कोणत्याही प्रकारे सुप्त बेत नसतील, आणि त्याच्या योगे जो सन्मान आहे तो त्याला देतील. त्यात भर म्हणजे, स्तोत्र ९५:६ याहो या, परमेश्वर जो आपला उत्पन्नकर्ता त्याच्यापुढे आपण गुडघे टेकू; त्याची उपासना करू, त्याला नमन करू." आपण आपल्या गुढघ्यांवर असो अथवा नाही, जेव्हा आपण प्रभूची आराधना करतो आपल्या हृदयात त्या विनम्रता आणि सन्मानाची भावना असणे आवश्यक आहे. आपण त्याची स्तुती केली पाहिजे "वैभवी नावाचे श्रेय द्या" "त्याच्या चरणी," "पावित्र्याने युक्त होऊन परमेश्वराची आराधना करा." (स्तोत्र २९:२; ९९:५; २४:४).

आपल्या समस्यांना आणि परिस्थितीला त्याचा दृष्टीकोन लाभेल.

देव आपल्या स्वतःहून केलेल्या स्तुती आणि आराधनेची वाट पाहत आहे, ते त्याचा अहं शांत करतात म्हणून नाही, तर आपल्यामध्ये ते काय करतात त्यासाठी असते. त्याच्या गौरवाला आणि सामर्थ्याला जसे आपण कबूल करतो, वैभव आणि पावित्र्य, आणि त्याच्या सान्निध्यात समय घालवतो

आराधना अनेक स्वरूप घेऊ शकते - आराधना संगीत ऐकणे ज्यामुळे आपला आत्मा शांत होतो, सामुदायिक आराधनेत सहभागी होणे, आत्म्यात गीते गाणे, आत्म्यात प्रार्थना करणे, गुढघे टेकणे, उपडे पडणे, त्याच्या स्वाधीन होण्यास आपले हात वर करणे, किंवा त्याच्या सान्निध्यात प्रवेश करण्यासाठी पाहिजे ते करणे. आपले शारीरिक स्वरूप हे कमी महत्वाचे आहे जितके महत्वाचे त्याच्या आत्म्यासोबत प्रेमाने, सन्मानाने, आणि आदराने आपण जोडले जाऊ शकतो. त्याच्या सान्निध्यात अपेक्षेच्या भावनेने या, तुम्ही जे काही आहात ते सर्व त्याला देण्याची तयारी ठेवा.

**२. कबुली**

शुभवर्तमानाचे केंद्रीय सत्य म्हणजे येशू आपल्या पापांसाठी मरण पावला. आपण ज्या शिक्षेस पात्र होतो ती त्याने सहन केली, जेणेकरून आपल्याला ती क्षमा मिळावी, शुद्ध व्हावे, देवासोबत एक पुनर्स्थापित नाते प्रस्थापित व्हावे आणि सनातन जीवन प्राप्त व्हावे. १ योहान १ :९ मध्ये आपण वाचतो “जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील.” सत्य म्हणजे आपला “नव्याने जन्म झाला तरीही,” पाप आपणास चिकटून राहते, आणि रोज आपण अशा गोष्टी करतो ज्यामुळे पवित्र आत्मा खिन्न होतो. त्या पापांच्या सामोरे जाण्यास आपली तयारी नसते, आपली दुर्बलता कबूल करून आणि पुन्हा एकदा देवाची कृपा आपल्याला मिळवायची असते. अध्यात्मिक रीतीने

जर आपल्याला वाढायचे असेल तर, न तपासलेले जीवन आपण जगू शकत नाही. दैनंदिन दृष्टीने देवाने तुम्हाला विशिष्ट रीतीने त्या गोष्टी प्रगट कराव्या अशी मागणी करा ज्यांचा विचार तुम्ही केला अथवा बोलला अथवा केले असेल ज्यामुळे त्याचे हृद्‌य दुखावले गेले, मग त्याचा जो प्रतिसाद आहे तो ऐका. “हे देवा, माझी झडती घेऊन माझे हृदय जाण; मला कसोटीस लावून माझे मनोगत जाण. माझ्या ठायी दुष्टपणाकडे काही प्रवृत्ती असेल तर पाहा; आणि मला सनातन मार्गाने चालव. (स्तोत्रसहिता १३९:२३,२४) त्यात हृदयाच्या पापांचा समावेश आहे (उदा: गर्व, भय, हेवा, क्रोध), देहाची पापे (उदा: आळस, व्यभिचार, अधाशीपणा), ज्या गीष्टी केल्या आणि ज्या केल्या पाहिजे होत्या त्या केल्या नाही, शब्द, हेतू आणि विचार.

पवित्र आत्मा जशा तुम्हाला गोष्टी प्रगट करतो, पश्चाताप करून त्याची क्षमा मागा. त्याचे आरोग्य आणि शुद्‌धीकरण प्राप्त करून घ्या. तुमच्या कबुलीच्या समयाची समाप्ती स्तोत्र ५१:१० च्या शब्दांनी करण्याचा प्रयत्न करा : “हे देवा, माझ्या ठायी शुद्‌ध हृदय उत्पन्न कर; माझ्या ठायी स्थिर असा आत्मा पुन्हा घाल.”

देवासोबत संपूर्ण दिवस “छोटे हिशोब” ठेवण्याची सवय ठेवा. जेव्हा पवित्र आत्मा तुम्हाला ह्या पापाची जाणीव करून देतो, ताबडतोब पश्चाताप करा आणि त्याची क्षमा मागा. तो काही एक पर्याप्त जीवात्मे शोधून काढण्याचा अनुभव नाही. रस्त्यावर गुढघे टेकून किंवा डोके खाली करण्याचा तो काही अनुभव नाही. तुमचा आत्मा त्याच्या आत्म्याशी जोडला जात आहे. लक्षात ठेवा की त्याचे तुमच्यावर प्रेम आहे प्रत्येक क्षणी तो तुमच्यासोबत जवळीक साधण्याचा प्रयत्न करतो, आणि त्याचे सान्निध्य व शांती ह्यांची जाणीव करून देतो (१

थेसलोनीकरास पत्र ५:१७).

असे तुमच्या जीवनात प्रसंग येतील जेव्हा पापाची सत्ता इतकी अधिक असेल किंवा ती वेदना इतकी खोलवर असेल की दोष अथवा कटुत्व ह्यापासून तुमची सुटका होऊ शकत नाही. प्राचीन ख्रिस्ती सवयीपैकी एक म्हणजे एखादा विश्वस्त आणि सुज्ञ विश्वास्णारा शोधून काढणे आणि त्यासाठी मोठ्याने देवाचे क्षमेचे शब्द बोलून दाखवणे (याकोब ५:१६).

### ३. प्रार्थना

देव जर सर्वज्ञ आणि सर्वव्यापी आहे, तर आपण प्रार्थना का करतो? पित्याशी प्रार्थनेच्या द्वारे आपण एक वयक्तिक नाते प्रस्थापित करतो. प्रार्थना करणे म्हणजे बदलणे. जितके अधिक जवळ आपण देव आणि त्याच्या पावित्र्याकडे जातो, तितके अधिक आपल्याला बदलण्याची गरज आहे, आणि ख्रिस्ताशी समरूप होणे आवश्यक आहे. देवाचे विचार आपण विचार करतो, आणि जर वेळ काढून आपण प्रश्न विचारले आणि त्याची उत्तरे ऐकली, तर त्याची वाणी आपण ऐकू शकतो. तुम्ही खारच त्याचे ऐकत आहात अथवा नाही ह्याविषयी जर तुम्हाला खात्री नसेल, तर देवाने त्याच्या वचनात स्वतःला कसे प्रागत केले ते तुम्ही जे काही ऐकत आहात त्याच्याशी सातत्यपूर्ण आहे हे जाणून घ्या. फोनवर एखाद्या मित्राचा आवाज आपण ओळखतो कारण आपण अनेकदा ते ऐकलेले असते. जेव्हा कोणीतरी जाणूनबुजून त्या मित्राची अथवा मैत्रिणीची आठवण करून देते, आपल्याला त्याचे चारित्र्य ठाऊक असते आणि ते उद्गार योग्य आहे अथवा नाही ते आपण सांगू शकतो. तसेच, पुनरावृत्ती केल्याने आपण देवाची वाणी ऐकतो आणि जाणून घेतो. प्रार्थना म्हणजे दुहेरी संधान आहे! देवाची मेंढरे त्याची वाणी ऐकतात. तो तुमच्याशी बोलेल

(योहान १०:२७).

प्रार्थना म्हणजे आपण जे काही शिकू शकतो - येशुकडून, मित्रांकडून जे प्रभावीपणे प्रार्थना करण्यास शिकले, पवित्र शास्त्रातून (पवित्र शास्त्रीय चारीत्र्ये आणि पवित्र शास्त्रीय सूचना, प्रार्थनेवरील पुस्तकांवरून (सूचित वाचने पहा), आणि आचरणात आणल्याने.

प्रार्थना फरक घडवून आणते (याकोब ५:१६; १ करिंथकरास पत्र ३:९). आजारी लोक, विवाह, शासन, पाळक, आणि सुवर्तिक , कुटुंबातील सदस्य आणि मित्र, सुरक्षेसाठी आणि अनोख्या लोकांसाठी देखील प्रार्थना करा जसे देव तुमच्यासमोर त्यांना घेऊन येईल.

**प्रार्थनेसाठी तीन सूचित पद्धती:**

पद्धत १: प्रभूची प्रार्थना - प्रसिद्ध जे शब्द आहेत त्यापेक्षा त्या पद्धतीवर अधिक मनन करा

पद्धत २: कृती: जिव्हाळा, कबुली, उपकारस्तुती, याचना(इतरांसाठी)

पद्धत ३: प्रार्थना : स्तुती, पश्चाताप, मागणे, शरण जाणे, अपेक्षा, स्वीकार

## ४. मनन

मनन म्हणजे सोप्या भाषेत चिंतन करणे, विचार करणे, “पुटपुटने.” चिंता कशी करायची हे जर तुम्हाला माहित असेल, तर मनन कसे करायचे हे निश्चित तुम्हाला ठाऊक आहे.

तुम्ही कशावर मनन करावे? शास्त्रवचन आपणास देवाचे वचन, त्याचे नियमशास्त्र, त्याचे प्रेम, त्याचे कार्य, त्याचे अभिवचने, आणि

त्याची अद्‌भुते ह्यावर मनन करण्यास सांगते (यहोशवा १:८; स्तोत्र ४८:९; स्तोत्र ७७:१२; ११९:२७,४८; १४३:५).

तुम्ही कसे मनन करता? तुम्हाला अडखळण होईल, अशा ठिकाणाहून आणि वेळेपासून वेगळा असा समय काढा. मी माझ्या सकाळच्या फिरण्याच्या वेळी करते. इतर लोक शांतपणे प्रार्थनेच्या खोलीत अथवा अभ्यासाच्या खोलीत असताना करतात. देवाने ते सत्य तुमच्या हृदयाला प्रगट करावे अशी त्याला याचना करा. जर परिस्थिती तुम्हाला त्रास देत असतील, देवाला तुम्ही काहीतरी जाणून घ्यावे असे काही आहे का त्याची म्हणी करा किंवा करा. तुम्ही इतरांसाठी जशी प्रार्थना करता, त्यांच्या वतीने तुम्ही कशी मध्यस्थी करावी हे देवाने तुम्हाला दाखवून द्यावे अशी विनवणी करा. स्वतःहून समस्या सोडवण्याचा प्रयत्न न करता त्याच्या आत्म्याची वाणी काय आहे ते ऐकून घ्या.

मनन केल्याने तुम्ही काय परिणाम मिळण्याची अपेक्षा ठेऊ शकता? शास्त्रवचनाच्या नुसार, पश्चाताप, आज्ञाधारकपणा, सुज्ञान, देवाच्या चारित्र्यात नवीन दृष्टीकोन, त्याचे प्रेम, त्याचे पावित्र्य आणि त्याचे सामर्थ्य ह्यांचा अनुभव घेण्याची तुम्ही अपेक्षा करू शकता (स्तोत्र ११९:९७, १०१, १०२).

जर ही शाखा तुमच्यासाठी नवीन असेल तर शिकत असताना थोडा संयम ठेवा.

## भाग २: जीवात्म्याच्या शाखा (मन, इच्छा, संवेदना)

### ५. अभ्यास

अभ्यास म्हणजे देवाच्या वचनाचे विश्लेषण करणे जेणेकरून मनाचे नूतनीकरण होते आणि त्याला सत्यप्रती तुम्ही खुले करू शकता (रोमकरास पत्र १२:२; फिलीप्पेकरास पत्र ४:८). मनन करण्यासारखे नाही ज्यामध्ये देव हृदयाशी काय बोलत आहे ते बघितले जाते, अभ्यास शास्त्रवचनाकडे वळतो देवाबद्दल, त्याचे चारित्र्य, त्याचे हेतू, आणि जीवनासाठी त्याचे तत्व ह्यात काय प्रगट होते हे जाणून घेण्यासाठी. “सत्याचा शब्द योग्य रीतीने विभागून घेऊन” त्यात एक संघटीत श्रम, विश्लेषण, आणि पवित्र आत्म्याचे सुज्ञान ह्यांची आवश्यकता आहे. इंटरनेटवर अनेक अभ्यासाची साधने येतात, पण टीकात्मक दृष्टीने त्यांच्याकडे पाहणे गरजेचे आहे- उर्वरित शास्त्रवचनाशी ते सातत्यपूर्ण आहे का, देवाचे चारित्र्य आणि हेतू ह्याविषयी काय तुमचा समज आहे? अभ्यासात कोणत्याही पळवाटा नाही; त्यामध्ये वेळ आणि स्वतःला शिस्त लावण्याची आवश्यकता आहे.

सुरुवात करण्यासाठी ज्याचे ज्ञान आणि अध्यात्मिक सुज्ञान तुम्हाला मोलाचे वाटते त्यांच्याशी बोला. एक चांगला पवित्र शास्त्रीय शब्दकोश, सुसंवाद(मूळ भाषेच्या अभ्यासासाठी) आणि अभ्यास करण्यासाठी एक पवित्र शास्त्र हे सुरुवात करण्यासाठी सर्वोत्तम आहेत. इंटरनेट तुम्हाला वापरता येत असेल तर, अनेक संकेतस्थळ आहेत ज्यामध्ये फुकट पवित्र शास्त्रीय साधने आहेत. त्यातील काहींची यादी ह्या धड्याच्या शेवटी देण्यात आलेली आहे.

प्रत्येक अभ्यास सत्राची सुरुवात प्रार्थनेने करा आणि पवित्र आत्म्याने तुम्हाला दूरदृष्टी आणि सुज्ञान द्यावे ह्याची मागणी करा. एक पद्धत म्हणजे शास्त्रवचनाचा एक मोठा भाग सरळ वाचून काढणे

आणि मग तुमचे विचार आणि मत थेट मांडणे. मग अभ्यासाचा पवित्र शास्त्रातून छोटे भाग वाचा आणि संदर्भ पहा आणि त्यातील शास्त्रभाग वाचून काढा. तुमच्या पवित्र शास्त्रात ह्या टिपा लिहून काढा, शास्त्रभाग अधोरेखित करा जे तुमच्यासाठी अर्थपूर्ण आहेत आणि जे काही शिकता ते लिहून काढा.

तुम्हाला समजत नाही असे जर काही वाचले किंवा जयावर विश्वास ठेवता की ते सत्य आहे त्याच्याशी जे जुळत नाही, देवाने तुम्हाला ते सुज्ञान द्यावे म्हणून त्याच्याकडे याचना करा (याकोब १:५), टीकासंग्रह ह्यांचा सल्ला घ्या आणि इतर संदर्भ देणारी साधने हे पाहण्यास तुम्हाला काय मिळाले हे शोधून काढा. एका अध्यात्मिक दृष्टीने परिपक्व विश्वास्नार्याशी बोला ज्यावर तुमचा विश्वास आहे, पण “नवीन” सिद्धांत जे आहेत त्याविषयी दक्षता बाळगा. तुमच्या कल्पना इतरांशी वाटून घ्या हे पाहण्यास की त्या उर्वरित शास्त्रवचनाशी जुळतात अथवा नाही.

### ६. एकांतवास

एकांतवास म्हणजे एकटे राहणे आणि कोणाशी बोलण्याची ओढ न बाळगणे.

टिपा

आपल्याला आवाजाची इतकी सवय होते की शांतता आणि एकांतवास हे आपल्यासाठी अपरिचित आणि आरामदायी वाटत नाहीत. येशू अनेकदा जमावातून वेगळा झाला आणि अगदी त्याच्या शिष्यांपासून देखील वेगळा झाला कारण त्याच्या पित्याचे सान्निध्य त्याला हवे असून त्याची वाणी ऐकण्यास उत्सुक होता (मत्तय ४:१-११, लुक ६:१२, मत्तय १४:१३,२३, मार्क १:३५; मार्क ६:३१, लुक ५:१६). एकटे असणे आपल्याला एकाकी असण्याची भावना देत नाही. आपल्या पित्यासोबत असे "एकांतातील समय" घालवण्यास आपण शिकतो मग ते बिछान्यातून उठण्यापूर्वी सकाळी असेल, किंवा रात्री झोपण्यापूर्वी ती शेवटली गोष्ट असेल, रस्त्यावर रहदारीत असेल किंवा प्रतीक्षा कक्षात असू शकेल, अगदी "अरण्यात" दीर्घ काळ परावृत्त होण्याचा समय असेल. आपण जशी आली हृदये त्याच्यासमोर शांत करतो, कोणत्याच प्रकारे नियोजन न करत अथवा समस्या न सोडवत किंवा भूतकाळातील संभाषणे ह्याविषयी विचार न करत, तो आपल्याशी प्रेम आणि उत्तेजन पूर्ण शब्द बोलत असतो, आपल्या जीवनात त्याची दिशा तो देतो, आणि जे मुद्दे आपल्याला त्रस्त करतात त्याविषयी दूरदृष्टी देतो
(यशया ३०:१५).

एकांतवासाची जशी आपल्याला सवय लागते, आपल्याला आतूनच ती शक्ती आणि शांती प्राप्त होते, अंतर्यामी असणारी समाधानी आणि अनादी वृत्ती जी आपली इतरांच्या प्रती असणारी संवेदनशीलता जागृत करून त्यांच्याप्रती असणारा कळवळा जागृत करते.

### ७. शरण जाणे

नियंत्रणात असण्याची गरज ह्यातून स्वातंत्र्य आणि स्वतःच्या

मार्गाने जाणे म्हणजे शरण जाणे. ते आपले जे काही स्वारस्य आहे त्याला कमी महत्वाचे बनवत नाही, पण आपली इच्छा त्यागून येशूचे अनुसरण करणे, त्याच्या मार्गावर विश्वास ठेवणे ह्यातून अंतिम आनंद आणि परिपूर्णता प्राप्त होतात (मार्क ८:३४,३५). शरण जाणे दोन्ही एक प्रवृत्ती आणि एक कृती आहे.

येशूने आपल्यासाठी ते उदाहरण नेमून दिले, नेहमी त्याच्या अधीन जगण्याने, अगदी जेव्हा त्याला स्वतःच्या जीवनाची किमत मोजावी लागली (फिलीप्पेकरास पत्र २:४-७; योहान ५:३०; ८:२८; मत्तय २६:३९). त्याने परुश्यांच्या अधीन अथवा लोकांच्या मतानुसार जीवन जगले नाही (मार्क १२:१४), जरी रोमी सत्तेच्या अधीन तो जगत होता (मार्क १२:१६).

सुरुवातीच्या मंडळीतील दासांना त्यांच्या मालकांच्या अधीन होण्याची सूचना होती, अगदी जे कडक होते त्यांना देखील त्या सूचना होत्या (१ पेत्र २:१८-२१), जरी असे भासले की त्यांच्याकडे कोणताच पर्याय नव्हता. ख्रिस्ती ह्या नात्याने, पेत्र त्यांना सांगत होता की त्यांच्याकडे एक पर्याय होता आणि त्यांच्यावर जे अधिकारी होते त्यांच्या अधीन होण्याची निवड ते करू शकत होते. पौलाने पत्नींना आपल्या पतीच्या अधीन होण्याची सूचना दिली जसे प्रभूच्या अधीन त्यांनी होणे आवश्यक होते (इफिसकरास पत्र ५:२२,२४).

पेत्राने त्याच्या वाचकांना शासनच्या अधीन होण्याची सूचना दिली, जरी एका कठीण परिस्थितीत, माणसापेक्षा त्याने देवाचे आज्ञापालन करण्याची व्यक्तीशः निवड केली (१ पेत्र २:१३-१५; प्रेषित ५:२९).

शरण जाण्याची शाखा आचरणात आणण्यासाठी, रोज प्रत्येक दिवशी आणि क्षण देवाच्या आणि त्याच्या इछेच्या स्वाधीन होण्याची निवड करा.

माझ्या पतीच्या स्वाधीन होणे, एक अविचारी आणि मागणी करणाऱ्या मालकाच्या स्वाधीन होणे, आणि सत्तेवर असणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी हे अधिक सोपे आणि सरळ होते जेव्हा मी प्रत्येक दिवशी माझ्या स्वर्गीय पित्याच्या अधीन होण्याची निवड करते.

## ८. सेवा

सेवेचे आयुष्य आचरणात आणण्याच्या शाखेचे आचरण करणे हे इतरांची सेवा करण्याच्या निवडीपेक्षा वेगळे आहे. स्वयं- धार्मिकता असणारी सेवा ही मानवी प्रयत्नांनी निष्पन्न होते, ती ओळख आणि कौतुक साधून घेते, कोणाची आणि कधी सेवा करायची ह्याची निवड करतात, आणि तात्पुरत्या भावनांनी ते प्रेरित होते. खरी दैवी सेवा ही पित्याशी असणाऱ्या माझ्या नात्यातून उत्पन्न होते, ते रहस्याने समाधानी आहे, सर्वांची सेवा ती स्थानांची पर्वा न करता होते, आणि ही तर जीवनशैली असते, आपण अजूनही त्या गोष्टींचा ताबा ठेवला आहे; आपण जेव्हा सेवक होण्याची निवड करतो तेव्हा तो हक्क आपण त्यागून देतो (मत्तय २०:२६; २३:११; मार्क १०:४३).

येशूने सेवाच्या वृत्तीच्या जीवनाचा नमुना दिला (मार्क १०:४५), केवळ वधस्तंभावरील त्याच्या मृत्यूने नव्हे किंवा त्याच्या शिष्यांचे पाय धुण्याने नव्हे, पण त्याच्याभोवती जे लोक आहेत त्यांचे ऐकण्यासाठी वेळ घालवण्याने आणि त्यांच्या गरजा संबोधण्याने (लुक ७:१-१७; मार्क ५: १- ४२). त्याने शिष्यांसोबत वेळ घालवला, त्यांच्यासोबत भोजन केले, थोडा आराम केला, त्यांना शिक्षण दिले, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन, त्यांना अधिकार देऊन, आणि परिपूर्ण होण्यापासून ते लांब होते. त्याने सर्वात कमी असणार्याची सेवा केली- लेकरे, स्त्रिया, भूतग्रस्त, आणि समाजातून दूर असणारे लोक, आणि त्याच्या स्वतःच्या प्रसिद्धीची त्याने फिकीर केली

नाही.

एका खऱ्या सेवेचे फायदे म्हणजे विनम्रता, आत्म-त्याग, आणि देवाची मान्यता त्यात असते.

**भाग ३ : शरीराच्या शाखा**

**९. उपवास**

उपवास करण्याची शाखा म्हणजे अन्नापासून दूर राहणे आहे (घन अथवा द्रव्य नाही, पण पाणी नाही) अध्यात्मिक कारणांसाठी. एक अर्धवट उपवास म्हणजे जो आहारावर नियंत्रण ठेवतो (दानियेल १०:३).

यहुदी नियमशास्त्राची आज्ञा होती की वर्षातून एकदा उपवास करावा, आणि तो देखील प्रायश्चिताच्या दिवशी. नवीन करारात उपवास करण्याची काहीच आज्ञा नाही, पण येशूने म्हंटले की देणे, उपवास करणे आणि प्रार्थना ह्या निष्ठेच्या कृती आहेत (मत्तय ६:१-१८). उपवास करण्याचा निर्णय हा खाजगी आहे, जरी काही मंडळया उपवासाचे सामुदायिक काळ किंवा वेळ ह्यासाठी उत्तेजन देतात.

उपवासाचा हेतू म्हणजे आपल्याला देवावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करणे आणि त्याचे आज्ञापालन करणे, गर्व, अधाशीपणा, किंवा आपल्यावर नियंत्रण ठेवणारा राग ह्यासारख्या गोष्टी प्रगट करणे, मार्गदर्शन करण्यात स्पष्टता देणे, आणि लोक व राष्ट्रे ह्यांच्यासाठी मध्यस्थी करण्यात सामर्थ्य देणे. खाण्याच्या ऐवजी, हेतू हा प्रार्थना किंवा आराधना ह्यामध्ये वेळ घालवणे आहे. जेव्हा तुमच्या शरीराला अन्न मिळण्याची गरज असते, आणि तशी मागणी होते तेव्हा प्रार्थना करण्याची आठवण करा आणि तुमच्या आत्म्याने शरीरावर नियंत्रण ठेवावे अशी प्रार्थना करा. माझ्या स्वतःच्या अनुभवातून एक सूचना

टिपा

म्हणजे तुमच्या स्वतःच्या हृदयाच्या परिस्थितीला तपासून घेणे; संतांसारखी भावना ठेवण्याच्या ऐवजी इतरांच्या प्रती तुम्ही चिडखोर अथवा परीक्षेत पडण्यासारखी भावना ठेवणे खूप सोपे आणि सहज आहे. (यशया ५८: ४, ६-८).

त्यांच्या पुस्तकात, “द सेलेब्रेशन ऑफ डिसीप्लिन,” रिचर्ड फॉसटर सूचित करतात की जे लोक ह्याचे आचरण पहिल्यांदा करत आहेत अनेक आठवडे आठवड्यातून एकदा अशी सुरुवात करा आणि तो २४- तासातील अर्धवट उपवास असावा दिवसातून एकदा भोजन घेणे आणि मग दुसऱ्या दिवशी खाणे, फळांचा रस घेणे, आणि ताजी फळे व भाज्या ह्यांचे सेवन दुसऱ्या दिवशी भोजनाच्या वेळी करणे.
मग २४ तासात भरपूर पाणी पिण्याने तो दिवस उपवास करून पहा. दूरवर उपवास करण्यासाठी इतरांचा सल्ला घेणे चांगले किंवा जे नियमितपणे उपवास करतात त्यांच्याशी तुम्ही बोला.

पवित्र शास्त्रीय काही चरित्रे ज्यांनी उपवास केला ते म्हणजे मोशे, दावीद, एलिया, दानियेल, अन्ना, पौल आणि येशू. त्यांनी काय केले ह्याचा अभ्यास करून, हा सराव करण्यासाठी त्यांच्या उपवासाचे परिणाम हे रुचकर ठरतील.

**१०. साधेपणा**

साधेपणा म्हणजे आपल्या जीवनाच्या केंद्रीयस्थानी देवाला स्थान देणे- मालमत्ता, अथवा लोक, कृती ह्या नाही तर स्वतः देवाला ते स्थान देणे. जेव्हा आपण अशा प्रकारे साधेपणाने जगतो आपले वक्तृत्व हे सत्यपूर्ण आणि प्रामाणिक असते. दर्जा मिळवण्यास अथवा लोकांवर प्रभाव पाडण्यासाठी आपल्याला ती रुची नसते. आपल्याकडे जे आहे ते आपण इतरांना उपलब्ध करून देतो, कारण आपले जे काही आहे ते देवाचे आहे असा आपला विश्वास असतो, आणि आपण कारभारी म्हणून त्याने ते कर्ज म्हणून दिलेले असते.
मालमत्ता ह्यांचा आनंद खऱ्या अर्थाने घेतला जातो, लक्ष विचलित होण्यासाठी नाही (उपदेशक ६:१८,१९). आपण आपले निर्णय घेतो ह्यावर विश्वास ठेऊन ज्याची देवाची इच्छा असते आपण ठेवावी आणि त्याचा परिणाम म्हणून, मालमत्ता, मते, भय, आत्म-केंद्रितपणा, चिंता, लोभ आणि हेवा ह्यांचे नियंत्रण ह्यापासून मुक्त व्हायचे असते. आपण आपली सर्व मालमत्ता गरिबांना द्यावी हे आवश्यक नाही; ते आधीच देवाला देण्यात आले आहेत, त्याला पाहिजे तसा त्याने उपयोग करावा ह्यासाठी.

आपली लेकरे आपलाच विस्तारित भाग नसतात किंवा आपल्या अपयशी ठरलेल्या स्वप्नांची पूर्तता करणारे नाहीत, तर देवापासून मिळालेले वरदान आहेत, पोषण व्हावे, प्रेम करावे आणि त्याच्या राज्यासाठी सुपूर्त करण्यासाठी असतात.

साधेपणाची शाखा म्हणजे “प्रथम देवाचे राज्य आणि त्याची धार्मिकता ह्याचा शोध घेणे” (मत्तय ६:२५-३३).

**११. कृतज्ञता**

जरी कृतज्ञता हे “अध्यात्मिक शाखा” ह्याच्या यादीत समाविष्ट नाही, अनेक शास्त्रवचने त्याचा उल्लेख करतात, आणि आपल्या अध्यात्मिक आरोग्यात त्याचे महत्व खूप आहे ह्याची खात्री बहुतांशी लोकांना पटली आहे. आपण “नेहमी आभार मानून सर्व गोष्टींसाठी आभारप्रदर्शन करणे महत्वाचे आहे” (इफिसकरास पत्र ५:२०), “सर्व परिस्थितीत त्याचे आभारप्रदर्शन करणे” (१ थेसलोनीकरास ५:१८, आणि “त्याचे उपकारस्मरण करीत त्याच्या द्वारात स्तवन करीत त्याच्या अंगणात प्रवेश करा” (स्तोत्र १००:४). मागील दिवशी देवाने ज्या तुमच्यासाठी केले त्या पाच गोष्टींसाठी त्याचे आभार मानून दिवस सुरु करण्यापेक्षा अधिक उत्तम काय आहे. कुटुंबातील सदस्याचे ते वरदान असेल, एका पक्ष्याचे गीत असेल, एक उत्तर मिळालेली प्रार्थना असेल, आरोग्य, स्वातंत्र्य, सुरक्षा, एका मित्राचे उत्तेजनार्थ शब्द असतील, त्याच्या शब्दातून दूरदृष्टी असेल किंवा एका अनोख्या व्यक्तीचे दयाळूपण असेल.
संपूर्ण दिवसभर देव कार्यरत आहे हे बघण्याची सवय लावा आणि अशा परिस्थिती अथवा गोष्टी ज्यासाठी तुम्ही आभारी असू शकता.

तुमच्याभोवती जे लोक, कुटुंबाचे सदस्य, सहकारी, शेजारी, व्यापारी, सेवा करणारे आहेत त्यांना ती कृतज्ञता व्यक्त करा.त्यांना उत्तेजन देणारे शब्द किंवा छोटी वरदाने देऊन त्यांचे कार्य तुमच्यासाठी महत्वाचे आहे हे जाणवून घेऊ द्या, आणि त्यांचे आयुष्य इतरांच्या आयुष्यावर फरक पाडत आहेत.

तुमच्या दिवसाची समाप्ती, रात्री जसे झोपी जाता, एका कृतज्ञ हृदयाने करा, तुमच्यासमोर जे कठीण प्रसंग आले त्याच्यासाठी देखील आभार माना, “ख्रिस्तासाठी दुर्बलता, अपमान, अडचणी, पाठलाग,

संकटे ह्यांत मला संतोष आहे; कारण जेव्हा मी अशक्त तेव्हाच मी सशक्त आहे. ” (२ करिंथकरास पत्र १२:१०).

अन्न वोस्कंप त्यांच्या “वन थाऊजंड गिफ्ट्स ” ह्यात स्वतःला देवाकडून मिळालेल्या एक हजार वर्दानांची यादी करण्याचे आवाह्न देतात ज्यासाठी त्या कृतज्ञ होऊ शकतात - एक अद्‌भुत पद्‌धत “कृतज्ञतेची प्रवृत्ती ” जतन करण्यासाठी (वोस्कंप, २०१०).

**१२. उदारता**

“संतोषाने देणारा देवाला प्रिय आहे” (२ करिंथकरास पत्र ९:७). कोणीतरी म्हंटले आहे की जोपर्यंत आपण त्याच्यासारखे देणारे होत नाही तोपर्यंत त्याच्यासारखे होत नाही. तो आपल्या डीएनए चा भाग आहे, कारण तो आपला पिता आहे आणि “देवाने जगावर एवढे प्रेम केले की त्याने दिले” (योहान ३:१६).

जेव्हा देण्याचा विषय येतो तेव्हा पटकन आपण पैशांचा विचार करतो, पण एक उदार आत्मा आपणास आपली पाकिटे उघडून त्याच्या पलीकडे देण्याची प्रेरणा देतात. होय, आपण गरिबांना द्‌यावे अशी देवाची इच्छा आहे. अनुवाद १५:११ आपणास सूचना देते “तुझ्या देशातल्या गरजवंत आणि गरीब बांधवांना सढळ हाताने मदत कर.” यहज्केल १६:४९ मध्ये आपण वाचतो की सोदोमाच्या विरुद्‌ध देवाची तक्रार होती की गरिबांची काळजी घेण्यात ते अपयशी ठरले.

आपला वेळ, कलागुण, उत्तेजन देणारे शब्द, आपली मालमत्ता, आणि आपले सुज्ञान ह्या सर्वांनी आपण उदार असावे अशी देवाची इच्छा आहे. १ तीमथी ६:१८ उत्तम रीतीने त्याचे संक्षिप्त करते,

"परोपकारी व दानशूर असावे."

**पाठांतर करा:**

- स्तोत्र ११९:१०५ - तुझे वचन माझ्या पावलांसाठी दिव्यासारखे व माझ्या मार्गावर प्रकाशासारखे आहे.
- यिर. २९:१३ - तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवेभावे माझ्या शोधास लागाल, तेव्हा मी तुम्हांला पावेन.

**महत्वाचे सत्य:**

देवासोबत असणाऱ्या तुमच्या नात्यात "अडकून" राहण्याची कधीच गरज नाही. तुम्ही संपूर्ण हृदयाने त्याचा धावा करावा म्हणून तो संयमाने तुमची वाट पाहत आहे, ज्या पद्धतीने तुम्ही त्याच्या वचनाचा अभ्यास करता, प्रार्थनेत वेळ घालवता, त्याच्याप्रती कृतज्ञ व्हा, आपला शांत वेळ लिहून काढा, किंवा जसा त्याचा आत्मा तुम्हाला प्रेरित करतो. तो दिशा दाखवत असल्याने रोजचा दिवस त्याच्यासोबत एक उत्तम प्रवास बनवा.

**तुमचा प्रतिसाद:**

१. मनन करण्यावर थोडा पवित्र शास्त्राभ्यास करण्याचा विचार करा, आपण कशावर मनन करतो आणि त्याचे काय परिणाम अपेक्षित आहेत. मग ते अध्यात्मिक मनन स्वतःहून करा आणि जे काही शिकता ते लिहून काढा. तुम्ही कोणते रहस्य शिकला ज्यामुळे तुम्हाला अधिक यशस्वीपणे मनन करण्यास मदत झाली? तुम्हाला कोणत्या अडथळयांवर विजय मिळवावा लागला आणि तुम्ही ते कसे प्राप्त केले?

२. तुमच्या प्रार्थनेच्या वेळेचे वर्णन करा. तुम्ही कोठे व केव्हा प्रार्थना करता? तुमच्या प्रार्थनेची एक पद्धत आहे का? तुमच्या प्रार्थनेच्या

आधी किंवा नंतर असे महत्वाचे मुद्दे तुम्ही लिहून काढता का? प्रार्थनेत वेळ घालवण्यात सर्वात कठीण काय आहे असे तुम्हाला वाटते? इतरांच्या समोर मोठ्याने प्रार्थना करण्यास तुम्हाला कठीण वाटते का?

३. तुमचे जीवन अधिक सोपे करण्यासाठी काय करू शकता ह्याचा विचार करा. उदा.कमीत कमी कर्ज असेल तर ते ठेवा, तुमच्या घरातून सर्व इतरेत्र गोष्टी काढून टाका, तुम्ही जे काही वापरत नाही ते विकून टाका अथवा कोणाला तरी देऊन टाका.
४. तुम्हाला कोणत्या अभ्यास पद्धती सहाय्यक वाटल्या आहेत?
५. अशा "एकांत" समयाची तुम्ही वाट पाहता का किंवा एकटे असण्याचा विचार तुम्हाला भयभीत अथवा चिंताग्रस्त करून टाकतो का? एकांतवासाचा आनंद घेण्यासाठी तुम्ही कोणत्या मार्गांचे अवलंबन करू शकता?
६. इतर लोकांच्या अधीन होण्यास सर्वात कठीण तुम्हाला केव्हा वाटते? एक ख्रिस्ती ह्या नात्याने इतरांच्या अधीन जाणे तुम्हाला सोपे अथवा कठीण वाटते? तुम्ही आता कोठे सेवा करत आहात?
७. आता वर्तमानात तुम्ही कोठे सेवा करत आहात?तुम्ही सेवा करण्यास अथवा सेवक होण्याची निवड करता हे स्वतःला विचारून घ्या.ह्यात फरक म्हणजे तुमचे किती नियंत्रण आहे?

**अतिरिक्त अभ्यासासाठी:**

रिचर्ड फॉसटर ह्यांचे सेलेब्रेशन ऑफ डिसीप्लिन (फॉसटर, १९८८)

रॉबर्ट बॉयड मुंगर ह्यांचे माय हार्ट ख्राईस्ट होम (मुंगर, १९९२)

जॉय डावसन ह्यांचे इंटरसेशन, थ्रिल्लिंग अंड फुलफिलिंग (डावसन, १९९७) जरमेन कोपलंड ह्यांचे प्रेअर्स दाट अवेल मच (कोपलंड , २००५)

हम्मोंड & कामेनेटी ह्यांचे सिक्रेट्स ऑफ पावर्फुल प्रेअर (हम्मोंड & कामेनेटी, २०००)

अन्न वोस्कंप ह्यांचे वन थाऊजंड गिफ्ट्स (वोस्कंप,२०१०) निशुल्क पवित्र शास्त्रीय अभ्यासाच्या इंटरनेट साईट्स:

www.biblegateway.com

www.blueletterbible.com

www.netbible.org

www.e-sword.net

www.lovegodgreatly.com



## धडा ६: सेवकाचे नेतृत्व

माझा वयक्तिक नेतृत्वाचा प्रवास सुरु झाला, जेव्हा मी एका पाळकाची मुलगी म्हणून, मंडळीत विभिन्न क्षेत्रात मी सेवा करण्यास सुरुवात केली, त्या नर्सरी मध्ये मदत करण्यास, लहान लेकरांच्या सेवाकार्यात, गायकवृन्दात, तरुणांच्या सेवेत, शब्बाथ शाळेत शिक्षण देऊन, पियानो वाजवत, चर्च मध्ये भोजन कार्य झाल्यावर स्वच्छता करून. विभिन्न क्षेत्रात काम करण्यात आनंद होता; हे शिकण्यास मला आनंद वाटे, आणि शिक्षण देण्यास मला आवड होती. स्वाभाविकच माझ्या महाविद्यालयाच्या वर्षात ह्या कामगिरी आणि जवाबदार्या वाढणे हे सहज होते. “अध्यक्ष” अथवा “विजन कॅस्टर” बनण्याची गरज मला कधीच वाटली नाही, तर नेतृत्वाला पाठींबा देऊन सेवा करण्याची आवड मात्र होती. दोन लहान मुलांची आई दहा वर्षे बनून मला नेतृत्व

आणि सेवा करणे ह्याविषयी खूप काही शिकवून गेले, पण सामुहिक जगातील माझ्या वीस वर्षात, गट प्रमुख, निरीक्षक आणि व्यवस्थापक ह्या दर्ज्यातून जेव्हा मी वर उठले, तेव्हा माझी नेतृत्वाची शैली उमगली. पुरुषांनी गाजवलेल्या तेलाच्या कारखान्यात मी निश्चित एक वरून खाली आलेल्या नेतृत्व शैलीतील व्यवस्थापक नव्हते, पण मला हे कळले की माझ्या विभागातील लोक अत्यंत प्रभावीपणे काम करतात जेव्हा त्यांना स्पष्ट ध्येय दिले जातात आणि माझ्या अखत्यारीत जे काही होते त्याचा उपयोग करून मी सर्व अडथळे दूर केले आणि त्यांनी हे ध्येय गाठावे ह्यास मदत केली. “सेवक पुढारी” ह्या पदाची मला ओळख झाली आणि मला हे काही माहित होते त्या आधारे मी स्वतःला ते वर्णन दिले असते, पण माझ्या आत कुठेतरी मी स्वतःचे वर्णन एक “दुसऱ्या- दर्जाचा” पुढारी असे बघितले, जिचा जन्म नैसर्गिक रीतीने नेतृत्वाच्या क्षमतांनी झाला नाही, तर त्या क्षमतेत कार्य करण्यास मी शिकलो. मग मी रॉबर्ट ग्रीनलीफ ह्यांचे “सर्वंत लीडरशिप” हे वाचले आणि मग पुढील उतार्याने थक्क झाले:

सेवक पुढारी हा प्रथम सेवक असतो.... त्याची सुरुवात स्वाभाविक भावनेने होते ती म्हणजे एखाद्याला सेवा करायची आहे, आणि त्याने प्रथम ती सेवा करावी. मग जाणीवपूर्वक केलेली निवड एखाद्याला पुढारीपण करण्याची इच्छा जागृत करून देते. ही व्यक्ती जी कोणी पुढारी असते त्यापेक्षा निश्चित वेगळी आहे हा फरक स्वतःहून दिसून येतो सेवकामध्ये- प्रथम खात्री करून घेण्यास की इतर लोकांच्या प्राधान्याने गरजा ह्या अधिक सोडवल्या जातात. उत्तम परीक्षा ही आहे ... : सेवा करून घेतलेले लोक व्यक्ती म्हणून वाढतात का? ते सेवा करून घेताना, अधिक धनवान, सुज्ञ, मुक्त, अधिक स्वायत्त, आणि स्वतः सेवक बनतात का? (ग्रीनलीफ, १९७७, पृ.२७)

ते म्हणत होते की मी, एक सेवक पुढारी ह्या नात्याने, एक “दुय्यम- दर्जाचा” पुढारी नाही ! हा विचार म्हणजे माझ्यासाठी एका “लाईट बल्ब “ प्रमाणे होता. नेतृत्वाची मला अत्यंत विभिन्न दृष्टीने समज झाली.

माझ्यासारख्या, अनेक स्त्रिया, ह्यांनी ही “सेवकाची” भूमिका चांगली शिकली, इतरांच्या गरजा भागवण्यात काय आनंद असतो ते देखील पाहिले. देव आता तुम्हाला ती “जाणीवेने निवड” करण्यास आणि इतरांचे “पुढारीपण करण्यास प्रेरणा” देण्यास पाचारण करत आहे का? विश्वासाची ती उडी तुम्ही घ्यावी असे मी तुम्हाला उत्तेजन देते. एका छोटय गटाचा अथवा समूहाचा प्रमुख बनण्यास स्वयंसेवक म्हणून पुढारीपण करा किंवा पवित्र शास्त्राभ्यास घ्या, एक घटना अथवा संघ एकत्र करून कार्य सिद्ध करा. तुम्हाला जर देव पाचारण करत आहे, तर ते सिद्ध करण्यास तुम्हाला तो सुसज्ज करेल!!

काही लोक वाद घालू शकतात की सेवक आणि पुढारी बनणे ह्या वर्णपटाच्या दोन विरुद्ध बाजू आहेत. एखादी व्यक्ती सेवक आणि पुढारी दोन्ही कसे बनू शकते? येशूचा ह्यासाठी प्रतिसाद आपणास लूक २२: २६ मध्ये दिसून येतो “परंतु तुम्ही तसे नसावे; तर तुमच्यामध्ये जो मोठा तो धाकट्यासारखा व जो पुढारी तो सेवा करणाऱ्यासारखा असावा.” त्याने स्वतःच्या शब्दांनी ह्याची खात्री केली इतकेच नाही, “ह्याप्रमाणे मनुष्याचा पुत्र सेवा करून घेण्यास नाही, तर सेवा करण्यास व पुष्कळांच्या खंडणीसाठी आपला प्राण अर्पण करण्यास आला आहे.” (मत्तय २०:२८), पण पृथ्वीवर असताना त्याच्या जीवनाने एक नमुना म्हणून प्रस्तुत करण्यासाठी दिला.

**१. येशू सेवक पुढारी या रूपाने**

आजच्या व्याख्येच्या नुसार येशू हा खरा "सेवक पुढारी" होता का? "एक सेवक- पुढारी---हा पुढे जाऊन, प्रेरित करून, उत्तम आणि सर्वोच्च विकसित करण्यास लोकांमध्ये धडपड करत असतो" (स्पिअर्स, १९९८, पृ. xii). त्या दर्ज्याच्या नुसार तो निश्चितच तसा होता! इतर सेवक पुढारी ह्याच्या गुणधर्मांच्या बद्दल काय (स्पिअर्स, १९९८, पृ. ४-६)? ह्या ठिकाणी काही उदाहरणे आहेत:

१. ऐकणे: सेवक पुढारी काळजीपूर्वक त्या कल्पना, काळज्या, आणि ज्यांचे पुढारीपण ते करत आहेत त्यांचे मन ऐकतात. येशूकडे जे आले त्यांचे तो ऐकत असे, त्याच्या प्रश्नांची उत्तरे देत, जरी त्याच्यासाठी ते सोयीचे नव्हते (योहान ३:१-२१; योहान ४:७-४२).

२. सहानुभूती (कळवळा): येशूने ज्यांचे पुढारीपण केले त्या सर्वांच्या प्रती त्याला कळवळा होता (मत्तय ९:३६; लूक ७:१३).

३. आरोग्य: सेवक पुढारी ज्यांचे पुढारीपण करतात त्यांना परिपूर्ण बनवतात. "नासोरी येशूला देवाने पवित्र आत्म्याचा व सामर्थ्याचा अभिषेक केला; तो सत्कर्मे करत व सैतानाच्या सत्तेखाली

असलेल्या सर्वांना बरे करत फिरला; कारण देव त्याच्याबरोबर होता” (प्रेषित १०:३८).

४. जागृती: सेवक पुढारी ह्यांची स्वतःची “आंतरिक शांतता” असते. येशूला ठाऊक होते तो कोण आहे आणि कोठे जात होता ; कोणीही त्याची खात्री देण्याची आवश्यकता नव्हती (योहान २:२४-२५).

५. मन वळवणे: सेवक पुढारी स्वतःचे मत इतरांच्यावर लादण्याच्या ऐवजी एक मतऐक्य निर्माण करतात. येशूला ठाऊक होते की यहूदा त्याचा विश्वासघात करणार आहे, पण यहूदाला त्याने त्याचा शिष्य होऊ दिले आणि पैशांची जवाबदारी सोपवली (मत्तय २६:२५; योहान १७:१२).

६. संकल्पनात्मक: सेवक पुढारी दैनंदिन वास्तविक्तांचा समतोल हा ज्या कल्पना दिसतात त्याच्या पलीकडे करतात. येशूने अनेकदा देवाच्या राज्याबद्दल उपदेश दिला.. “नंतर येशू यहूदी लोकांच्या सभास्थानांत सुवार्तेची घोषणा करत व राज्याची सुवार्ता गाजवत आणि लोकांचे सर्व प्रकारचे रोग व सर्व प्रकारची दुखणी बरी करत गालीलभर फिरला.” (मत्तय ४:२३).

७. दूरदृष्टी: सेवक पुढारी भूतकाळातील धडे वर्तमान परिस्थितीला लागू करतात आणि त्या निर्णयांच्या परिणामांची अपेक्षा करतात. येशूने त्याच्या शिष्यांना स्वतःसाठी आणि त्यांच्यासाठी पुढे येणाऱ्या कठीण प्रसंगाचे परिणाम ह्याविषयी आधीच सूचना दिली (लूक ९:४४; मत्तय २४:१-३१)

८. कारभारीपण: सेवक पुढारी त्यांच्या स्रोतांच्या बद्दल सुज्ञ असतात, इतरांची सेवा करतात. येशूने अगदी सुज्ञ रीतीने त्याच्या वेळेचा सदुपयोग केला. तीन वर्षात त्याने जागचे परिवर्तन केले. त्याने गरिबांना दिले, पण धनवांना देण्याची परवानगी दिली (योहान १३:२९; लूक ८:३; मत्तय २६:७-१२)

९. लोकांची वाढ होण्याप्रती समर्पकता: सेवक पुढारी ज्यांचे पुढारीपण करतात त्यांची खाजगी, व्यावसायिक, आणि अध्यात्मिक वाढ होण्याचे उत्तेजन देतात. येशूने व्यक्तीशः त्याचा समय शांतपणे त्याच्या बारा शिष्यांना शिक्षण देण्यास, त्यांची सुधारणा करण्यास, आणि त्यांचे प्रशिक्षण करण्यास, स्वतः त्यात सहभागी होऊन केले (मत्तय १०:१; ११:१; १६:२४; २०:१७).

१०. समाज विकसित करणे: सेवक पुढारी त्यांच्या अनुयायांना एका संघटीत गटात एकत्र करण्यास कार्यरत असतात. येशूने त्याच्या शिष्यांना एकमेकांवर प्रेम करण्यास आणि सेवा करण्यास शिकवले. त्याचा मृत्यू आणि पुनरुत्थान झाल्यावर, ते एकत्र भेटले, हेतुनिशी एकत्र झाले आणि शुभवर्तमान जगाला कळवले (योहान १३: १४-१६; मत्तय २८:१९,२०; प्रेषित २:४४-४७)

त्याच्या सेवक नेतृत्वाचे कोणते इतर उदाहरणे तुमच्या मनात येतात?

## २. आज प्रचलित असणारे सेवक नेतृत्व

१. ऐकणे: तुम्ही पुढारीपण करत असणाऱ्या लोकांमध्ये, त्यांचे कुटुंब, आवड आणि नावड, ह्यात वयक्तिक स्वारस्य घ्या, कोणत्या गोष्टी त्यांच्या आत्म्याला खुश करतात आणि काय त्रास देतात. ते काय बोलतात आणि बोलत नाहीत ह्याकडे लक्ष देऊन ऐका. त्यांच्या सुचना आणि कल्पना समजून घेताना त्यांना स्पष्ट करणारे प्रश्न विचारा. पौल ह्या रीतीने ते मांडतो “तुमच्यामध्ये जे कष्ट करतात त्यांचा आदर करा … त्यांच्या कामामुळे त्यांना प्रेमाने अत्यंत उच्च स्थान द्या” (१ थेसलोनीकरास ५:१२-१३).

२. सहानुभूती (कळवळा): तुम्ही ज्यांचे पुढारीपण करता ते चांगले असते असे गृहीत धरा, जरी त्यांचे शब्द अथवा वागणूक ही मान्य नसते.

हे लक्षात ठेवा की “दुखात असणारे लोक इतरांना दुख पोहचवतात,” कधी आणि कसे क्षमा करायची हे जाणून घेणे आवश्यक आहे. ज्यांना दुख होत आहे किंवा कठीण प्रसंगातून जात आहेत त्यांच्याप्रती खरी सहानुभूती दाखवा. काही वेळा त्याचा अर्थ म्हणजे “सान्निध्याचे सेवाकार्य,” ह्याचे अवलंबन करा म्हणजे ते दुख करत असताना शांत बसून राहा. स्त्रिया ह्या नात्याने आपल्याला “काहीतरी करायचे असते”, “अन्न तयार करणे, लहान लेकरांची काळजी घेणे, घर स्वच्छ करणे, हे करायचे असते पण सर्वात महत्वाचे म्हणजे प्रार्थनापूर्वक भागीदारी. पवित्र आत्म्याचे सुज्ञान आणि मार्गदर्शन आवश्यक असते हे जाणून घेण्यासाठी की कोणत्या परिस्थितीत दयाळू प्रतिसाद हा खरा आहे.

३. आरोग्य: तुम्ही ज्यांचे मार्गदर्शन करत आहात त्यांना अध्यात्मिक, मानसिक, भावनिक, आणि शारीरिक पूर्णता मिळण्याचा शोध करा. दुख सहन करत असणाऱ्या लोकांना शारीरिक आरोग्य देण्याचे कौशल्य आपल्यात नसेल, पण जर आपण “महान वैद्य” ह्याच्याशी परिचित असलो तर त्यांच्या वतीने मध्यस्थी करू शकतो. जे लोक भावनिक, अध्यात्मिक किंवा मानसिक रीतीने जखमी आहेत, सेवक पुढारी आशीर्वाद, उत्तेजन आणि आशेचे शब्द बोलेल.

४. जागृती: प्रार्थनापूर्वक तुमच्या सर्व दुर्बलता, अपूर्तता आणि पापी स्वभाव हे कबूल करा. एक सेवक पुढारी ह्या नात्याने, तुम्ही कोण आहात आणि कोणाचे आहात हे समजून घ्या- तुमचे मूल्य, तुमचे प्राधान्य, आणि तुमचे पाचारण. जेव्हा मोह हा इतरांच्या स्तुतीने गर्वाने फुगून जातो, किंवा स्वतः चांगले दिसण्यासाठी जेव्हा तुम्ही ते सत्य झाकून टाकता, किंवा तुम्ही ज्यांच्याशी सहमत असता त्या लोकांच्या आसपास राहा, देवाचे वचन आणि पवित्र आत्म्याच्या सान्निध्याला तुमचा विवेक जागृत करून पुन्हा त्या सत्याकडे तुम्हाला आणण्यासाठी परवानगी

द्या.

५. मन वळवणे: स्वयंसेवकांना विश्वासुपणे त्यांचा वेळ व कलागुण देण्यास व हेतू सिद्ध करण्यास त्यांचे मन वळवा हे तर अधिक कठीण कार्य आहे तुम्ही नोकरीवर ठेवलेल्या व्यक्तीचे मन वळवण्यापेक्षा. स्वयंसेवकांना सातत्याने उत्तेजन द्यावे लागते. ते जे काही काम करत आहेत त्याचे महत्व त्यांना बघावे लागते. मी हे शिकले आहे की जे लोक स्वयंसेवक म्हणून काम करण्यास प्रेरित आहेत कारण देवाने त्यांना तसे पाचारण केले आहे त्यांचे अधिक समर्पण करण्याचे आणि वाढीव आयुष्यमान असण्याचे काम आहे. दुसरीकडे, कोणाला जर पाचारण झाले पण ते कार्य करण्यास अपुरे आहे, मन वळवणे आणि उत्तेजन देणे आवश्यक आहेत. स्वयंसेवकांच्या सोबत असा हिशोबीपणा देण्याचा पर्याय नसतो!

६. संकल्पनात्मक: देवाने तुम्हाला जो काही दृष्टांत दिला तो प्रत्यक्षात उतरवण्यासाठी स्पष्ट आणि विशिष्ट असा. हे तर तुमचे कार्य आणि सवय ह्यांची मागणी करतील, पण श्रम घेण्यास हे योग्य आहे जर तुम्ही ज्यांचे नेतृत्व करत आहात त्यांना त्याचा परिणाम दिसेल. हा दृष्टांत त्यांच्या

टिपा

सर्जनशील कल्पना आणि उर्जा ह्यांना प्रेरणा देतील, आणि निर्णय घेण्यात त्यांना मदत करतील.

७. दूरदृष्टी/ सुज्ञान: सेवक पुढारी जे भूतकाळातील धडे वर्तमान परिस्थितींना लागू करू शकतात कोणत्याही प्रकारे खाचखळगे टाळण्यासाठी ते सुज्ञ निर्णय घेतात. याकोब १:५ ह्याचे अवलंबन करा, देवाला ते सुज्ञान मागा, आणि इतरांना त्या निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी करा जेणेकरून पर्यायी दृष्टीकोन आणि अनुभव हे घडू शकतात. “मसलत मिळाली नाही म्हणजे बेत निष्फळ होतात.” (नितीसुत्रे १५:२२).

८. कारभारीपण: सेवक पुढारी सर्व स्रोत सुज्ञ रीतीने वापरतात. आर्थिक स्रोत हे ज्या लोकांनी दिले त्यांच्यापासून येतात म्हणून एक विश्वस्त साठा असतात. जे देणारे आहेत त्याच्याशी ते श्रेय आणि पात्रता बनवून ठेवणे, हे स्रोत कसे उपयुक्त ठरले आणि हिशोबी बनतात हे स्पष्टपणे दिसून येते. जो वेळ स्वयंसेवक देत आहेत त्याविषयी सन्मान बाळगा आणि तसे तयार व संघटीत असा. स्वयंसेवकांना त्यांचे कलागुण सुज्ञ रीतीने वापरण्यात जे सामर्थ्य आणि शक्ती लागते ते व्यवस्थितपणे समजून घ्या.

९. लोकांची वाढ होण्याप्रती समर्पकता लोकांना त्यांची ताकत आणि दुर्बलता ओळखण्यास मदत करा आणि त्यांची वरदाने विकसित करा नमुना प्रस्तुत करून (दाखवा), शिक्षण द्या, शिकवा (सुधारणा करून त्यांना आवाहन द्या), आणि त्यांना सुदृढ करा. शिकवण्यात अभिप्राय दिला गेला पाहिजे–त्यांनी काय चांगले केले आणि  आणि त्यांची कशी सुधारणा झाली ते पहा. त्यांची मुल्ये, त्यांचा आवेश आणि पाचारण शोधून काढण्यास त्यांना प्रेरणा द्या. स्वतःहून वाढत राहण्याची आणि शिकण्याची इच्छा ही प्रदर्शित करा, जरी त्यात

मग तुमच्या अकार्यक्षम भावना व्यक्त होते.

१०. समाज विकसित करणे: एक सेवक पुढारी ज्यांचे पुढारीपण करतो त्यांच्याप्रती अमर्यादित प्रेम व्यक्त करतो. समाज बांधण्याचा सर्वात शक्तिशाली मार्ग म्हणजे व्यक्तीशः ते अमर्यादित प्रेम व्यक्त करणे, जसे तुम्ही असे पारदर्शक, सचोटीपूर्ण आणि आनंदाने एकमेकांसोबत जीवन जगता. तुम्ही शाब्दिक रीतीने त्यांना आधार आणि एकमेकांना मदत करण्यास सांगू शकता, आणि तसे तुम्ही करावे, पण हे प्रेम इतरांना तुम्ही स्वतः प्राद्रषित करून खर्या अर्थाने दाखवले पाहिजे. आणि एकत्र मज्जा करण्यास विसरू नका! तुम्ही एकत्र वेळ घालवता हे त्यानं कळवू द्या.

सेवकाचे नेतृत्व ह्याचे तुम्हाला ताबडतोब निकाल दिसत नसतील तर निराश होऊ नका. पुस्तकातील त्याच्या परिचयात “इनसाईट्स ऑन लीडरशिप” स्टीफन कोवी सेवकाचे नेतृत्व ह्याची तुलना चीनच्या बांबूच्या झाडाशी करतात.

तुम्ही ते पेरता आणि त्याचे पुढे काय होते हे तुम्हाला दिसत नाही पण केवळ एक अंकुर आलेले दिसते आणि चार वर्ष ते जमिनीच्या वर दिसते. त्या चार वर्षांच्या दरम्यान जमिनीच्या आत ते मुळाची रचना होत राहते- तरीही तुम्हाला काहीच दिसत नाही. पाचव्या वर्षी चीनचे बांबूचे झाड ८० फूट वाढते. (स्पिअर्स, १९९८, पृ. xviii)

**पाठांतर करा:**

- मार्क १०:४५ - कारण मनुष्याचा पुत्रही सेवा करून घेण्यास नाही, तर सेवा करण्यास व पुष्कळांच्या मुक्तीसाठी आपला जीव खंडणी म्हणून अर्पण करण्यास आला आहे.
- **मत्तय २५:४०-** तेव्हा राजा त्यांना उत्तर देईल, ‘मी तुम्हांला खचीत

सांगतो की, ज्या अर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले, त्या अर्थी ते मला केले आहे.'

**महत्वाचे सत्य:**

सेवक पुढारी हा प्रथम एक सेवक असतो जो पुढारीपण करण्याची जाणीवपूर्वक निवड करतो.

**तुमचा प्रतिसाद:**

१. तुम्ही स्वतःला एक सेवक पुढारी समजता का? का अथवा का नाही? तुमच्याप्रत काय अधिक सोप्या रीतीने येते- सेवा करणे अथवा नेतृत्व करणे?

२. सेवक पुढारीपण करण्याची कोणती तीन तत्वे तुम्हाला अधिक आवाहनात्मक वाटते आणि काय सर्वात सोप्या रीतीने तुमच्याप्रत येते?

३. सेवक नेतृत्व काही संस्कृतीत चांगले कार्य करत नाही असे तुम्हाला वाटते का?

**अतिरिक्त अभ्यासासाठी**:

रॉबर्ट ग्रीनलीफ द्वारे *सरवंट लीडरशिप* (ग्रीनलीफ, १९७७)

लारी स्पिअर्स द्वारे *इनसाईट्स ऑन लीडरशिप* (स्पिअर्स, १९९८)

जाक काह्ल द्वारे *लीडिंग फ्रॉम द हार्ट* (काह्ल & डोनेलन, २००४)



## अध्याय ७: मुल्ये, प्राधान्ये, समतोल

मत्तय २५:१४-३० मधील येशूचा कलागुणांचा दाखला नेहमी मला भीतीदायक वाटतो.आयुष्यात मला लवकरच हे समजले की “कलागुण” जे देवाने मला दिले होते, पण मी जेव्हा हा दाखला वाचायचे तेव्हा हाच प्रश्न माल भेडसवायचा, “देवा, तुझी माझ्याकडून काय अपेक्षा आहे? मला तो दास बनायचे नाही ज्याने आपले कलागुण जमिनीत पुरून ठेवले.” असे दिसते की जीवनाच्या प्रत्येक ऋतूत माझ्या काही क्षमता होत्या ज्यांचा मी उत्तम उपयोग केला, पण आता ते सुप्त अवस्थेत होत्या, किंवा अशी वरदाने जी देवाने माझ्यात ठेवली होती ज्यांचा मी कधीच शोध घेतले अन्ही अथवा विकसित केले नाही. खरेतर केवळ ह्याच जीवनाच्या ऋतूत, देव मला मागे जाऊन परत हे “सुटलेले धागे” उचलण्यास सांगत असल्याचे वाटते, जेणेकरून पूर्ण सुती ताग्यात तो त्याची वीण तयार करू शकतो.

देवाने तुमच्यात असे कोणते कलागुण आणि क्षमता ठेवल्या आहेत

ज्याचा उपयोग त्याच्या राज्याचा विस्तार करण्यासाठी तुम्ही करावा अशी त्याची इच्छा आहे? कदाचित काही वेळा इतक्या गोष्टींनी तुम्हाला ताणले गेल्यासारखे वाटत असेल, आणि हे तर केवळ दैनंदिन काम पूर्ण होण्यासाठी असते. तुम्ही आपले डोळे आणि आत्मा उघड ठेवण्याचे उत्तेजन मी देतो हे पाहण्यास की देव तुमच्याद्वारे काय करू इच्छितो. हा तर वेळेबद्दल एक धडा आहे, प्राधान्ये आणि समतोल ह्याबाबत, आणि देवाच्या द्रुश्तिएन खारच काय मौल्यवान आहे हे शोधून काढण्यास महत्वाचे आहे.

**१. आपली मुल्ये जाणून घेणे**

तुम्ही आयुष्यात कशाला सर्वाधिक मोल देता? तुम्हाला काय आनंदित करून परिपूर्ण बनवते? तीन अथवा चार गोष्टी लिहून काढा, पण अधिक कठीण किंवा क्लिष्ट त्याला बनवू नका. त्यावर अधिक विचार करू नका किंवा तुमच्यासाठी काय महत्वाचे आहे हे इतरांना विचारू नका. तुमच्याशी प्रामाणिक राहा. हे तुमच्या डोळ्यांसाठी आहे, तुमच्या ह्रदयात काय खरे आहे हे जाणून घेण्याची प्रक्रिया तो आहे. सुरुवात कोठे करायची हे तुम्हाला माहित नसले तर, देवाने तुम्हाला स्पष्टता आणि सुज्ञान द्यावे अशी मागणी करा. पहिल्यांदा तुम्हाला ते बरोबर कळले नाही तर काळजी करू नका किंवा जर मध्येच थांबला आणि एकदाच ते संपवले नाही तर विचार करू नका, तर तुमची यादी अशा ठिकाणी ठेवा जिकडे तुम्हाला त्याची उजळणी करता येईल, स्पष्टता येईल, आणि जसा वेळ पुढे जाईल तसे अधिक सोपे करून सांगता येईल. शेवटी तुमची मुल्ये हे सोपे, आणि तुम्हाला काय आवडते ह्या ह्याच्याप्रती सोपे, स्पष्ट विधाने असणे गरजेचे आहे.

उदाहरण देऊन, त्या प्रश्नाचे उत्तर मी नुकतेच कसे दिले ते पहा:

- देव आणि कुटुंबासोबत माझे नाते
- इतरांना सशक्त करणे: प्रेम करणे, शिक्षण देणे, उत्तेजन देणे, आणि कृपा अखंड रूपाने त्यांना देणे
- सिद्ध करता येण्यासारखे आवाहनात्मक कार्य
- प्रामाणिकपणा, सचोटी, न्याय आणि विनम्रता ह्याचे अचार्ण करण्याचे स्वातंत्र्य

आपली मुल्ये का लिहून काढावी? त्यांना स्पष्टपणे मांडता येणे तुम्हाला निर्णय- घेण्यास तसेच तुमच्या रोजच्या वागणुकीत प्रदर्शित करण्यास सहाय्य करेल.

**२. आपली प्राधान्ये स्थापित करून त्याप्रमाणे जगा**

अनेक ख्रिस्ती परिपक्व व्यक्तींसाठी जीवनातील प्रथम पाच प्राधान्ये म्हणजे: देव, पती/पत्नी, लेकरे, काम आणि मंडळी. विशिष्ट रीतीने, इतर प्राधान्ये म्हणजे इतर कुटुंबातील सदस्य, मित्रपरिवार, छंद, शिक्षण इत्य. हे पुढे त्या यादीत येतात, पण तुमच्यासमोर अशा कठोर परिस्थिती येतील जसे एखादे लहान किंवा अपंग मूल किंवा वृद्ध आई वडील जे त्या व्यक्तीला आयुष्यातील एखाद्या रुतुसाठी उंचावू शकतात.

पहिले: देव माझे नंबर एक प्राधान्य आहे ह्याचा अर्थ काय होतो? माझ्या जीवनात त्याच्यासोबत असणारे नाते प्रथम येते. त्याचा अर्थ असा होत नाही की मी माझ्या कौटुंबिक जवाबदार्याकडे दुर्लक्ष करते आणि माझ्या दिवसाचा बहुतांशी भाग माझ्या प्रार्थनेच्या खोलीत घालवते, तर रोज त्याची इच्छा काय आहे हे मी बघते आणि त्याच्या वचनाचे आज्ञापालन करते जेणेकरून माझ्या पतीची मदत अधिक प्रभावीपणे मी करू शकते आणि तसेच माझ्या लेकरांची आई बनू

शकते. थोडक्यात सांगायचे तर, मी एक व्यक्तीच्या श्रोत्यासमोर उभी राहते आणि त्याला संतोषविण्याचा प्रयत्न करते.

द्सुरे: माझे पती हे दुसऱ्या क्रमांकावर आहेत. आयुष्यभरासाठी त्याच्याप्रती माझी वचनबद्धता आहे आणि माझी लेकरे देवाने मला दिलेले कर्ज आहे वीस वर्षे किंवा त्यापेक्षा थोड्या कमी काळासाठी. जर माझ्या लेकरांनी ते दुसरे अथवा पहिले स्थान गाठले, माझे त्यांच्यासोबत असणारे नाते ताणले जाते एका जोरदार वजनाने जे ते सहन करू शकत नाहीत.

तिसरे: एक पालक म्हणून माझे ध्येय हे एक अध्यात्मिक, आर्थिक, भावनिक आणि तत्वज्ञानी दृष्टीने आणि जवाबदार परिपक्व व्यक्ती तयार करण्यात आहे जे देवावर प्रेम करून त्याची सेवा करतात. “बापांनो, तुम्ही आपल्या मुलांना चिडीस आणू नका; तर प्रभूच्या शिस्तीत व शिक्षणात त्यांना वाढवा.” (इफिसकरास पत्र ६:४). ते माझे पारितोषिक नाहीत माझ्यावर ते हक्क परिधान करण्यास, आणि माझ्या उत्तम पालक्तव करण्याच्या कौशल्याचे पुरावे देखील नाहीत (किंवा कमतरता दर्शवणारे) ते तर व्यक्ती आहेत, देवाच्या प्रतीरुपाने घडवण्यात आलेले, जे स्वतःच्या निवडी करतात, स्वतः आपले प्राधान्य प्रस्थापित करतात, आणि प्रार्थनापूर्वक आपल्या पित्याशी स्वतःचे नातेसंबंध स्थापित करतात, जो एकमेव असा आहे ज्याला ते उत्तर देतील.

चौथे आणि पाचवे: माझ्यासाठी व्यक्तीशः, काम आणि चर्च हे तर “समतोलात” असणारे प्राधान्ये आहेत. काही वेळा चर्च ला अधिक

प्राधान्य आहे आणि काही वेळा कामाला अधिक, त्या विशिष्ट वेळी माझी भूमिका आणि जवाबदार्या काय आहेत त्यावर ते ठरते. चर्चसंबंधी, एकत्र भेटण्याकडे आपण दुर्लक्ष देऊ नये असा माझा विश्वास आहे, कारण देवाने आपल्याला समाजात राहण्यासाठी पाचारण केले आहे आणि जे आपल्यासोबत विश्वास वाटून घेतात त्यांच्यासोबत राहण्यास बोलावले आहे (इब्री १०:२५). ख्रिस्ताच्या शरीरात असताना आपले एकमेकांवरील प्रेम आपल्या शिष्यत्वाचा पुरावा आहे, जसे आपल्या कामाचा उत्कृष्टपणा असतो (योहान १३:३५; १ पेत्र २:१८; क्लस्सेकरास पत्र ३:२३).

आपल्या आयुष्यात असे काही ऋतू असतील जेव्हा अशा कठोर परिस्थितीमधून जाण्याची जबरदस्ती आपल्यावर होते किंवा देवाचा आत्मा आपल्याला तात्पुरत्या रीतीने काहीतरी तडजोडी करण्यास सांगतो, पण ह्या तर सामान्य मार्गदर्शिका आहेत ज्या आपले प्राधान्य विकसित करण्यासाठी महत्वाचा सुरुवात करणारा मुद्दा बनू शकतात.

टिपा

एक अधिक कठीण प्रश्न म्हणजे आपण ज्या पद्धतीने आपला वेळ घालवतो त्यातून हे प्राधान्ये दिसून येतात का. प्रत्येक दिवस हा देवाकडून मिळालेले वरदान आहे ज्यासाठी आपण जवाबदार आहोत. तो दिवस आपणास कदापि परत मिळणार नाही. आपण कसा वेळ घालवतो ह्याच्याशी त्याला संबंध आहे (स्तोत्र ९०:१२).

अनेक व्यावसायिक पुस्तके लिहण्यात आली ज्यामध्ये वेळेचा सदुपयोग आपण कसा करावा आणि त्या पद्धती दिल्या आहेत

आणि असे व्यवसाय आहेत जे कागद, तांत्रिक यंत्रे आणि संगणकाचे भाग ह्याच्याशी संबंधित असतात आणि तुमचा वेळ अधिक प्रभावीपणे कसा उपयुक्त करावा ह्यामध्ये मदत करतात, पण शेवटी केवळ इतकेच उरते: काही मुलभूत तत्वे, एक दिनदर्शिका, एक वही, आणि एक हृद्य जे पवित्र आत्म्याशी जोडले गेले आहे.

१. तुमच्या आठवड्यात ज्या समयासाठी तुम्ही तडजोड करू शकत नाही तसे तास लिहून काढण्यासाठी एक सोपा तक्ता अथवा दिनदर्शिका ह्यांचा उपयोग करा.त्यामध्ये खाणे, झोपणे, कसरत करणे, मननाचा समय, चर्चचे कामकाज आणि आठवड्याचे घरगुती कामे, सामान खरेदी करणे, आणि कोणत्याही आठवड्यातील अथवा महिन्याचे वचन दिलेले समय. रविवार म्हणेज एक आरामाचा दिवस म्हणून शक्य असेल तर कुटुंबासोबत वेगळा ठेवा. उरलेली पांढरी रिकामी जागा म्हणजे कोणत्याही “इतरेत्र” कामांसाठी आहे. जेव्हा कोणीतरी तुम्हाला त्यांच्यासाठी अथवा त्यांच्यासोबत काहीतरी काम करायला सांगतील, किंवा तुम्ही “झोपून” जाण्याचे ठरवता, काहीच समस्या नाही. केवळ जाणीव ठेवा की हा समय तुमच्या “नेहमीच्या कामाच्या” वेळेच्या बाहेरचा आहे.

२. पुढे जाऊन अगदी छान सर्जनशील रीतीने वेळेचे नियोजन करा आणि सर्व दैनंदिन कार्ये जसे घरगुती कामे ह्यांची रचना करा आणि त्यावर घालवण्यात येणारा वेळ कमी करा. एक तत्व आहे

ज्यात म्हंटले जाते एखादे काम जितका वेळ तुम्ही त्यासाठी ठेवणार तेवढा वेळ घेईल. सुज्ञान मिळण्यासाठी प्रार्थना करा! जर आधीच आठवड्यात तुम्ही वेळ घालवला असेल, इतर कुटुंबातील सदस्यांसाठी तुम्ही काय देणार मग? कोणती कामे तुम्ही एकत्र करून, सोपी करून अथवा रद्द करू शकता? आपल्या प्रत्येकाचा असा "महत्वाचा समय" असतो जेव्हा प्रभावीपणे आपण काम करतो. काही लोकांसाठी, हा सकाळचा समय असेल काहींसाठी दिवसात नंतरचा काळ असेल अथवा काहींसाठी रात्रीच्या मधील हा समय असेल. कोणत्या तासात तुम्ही सर्वात प्रभावीपणे काम करता हे शोधून काढा आणि काळजीपूर्वक त्या वेळेत तुम्ही काय नियोजन केले हे पहा. दिवसातील तुमचा वेळ "वाया" घालवणारा समय ओळखा–कोणत्याही व्यवस्थेचा अभाव, अडथळे, समस्या, चालढकल आणि नियोजन करण्याचे अपयश.

३. ह्या सरावाचे ध्येय म्हणजे अधिक "रिकामा वेळ" तयार करणे "तातडीच्या नव्हे तर महत्वाच्या कामांसाठी" जे आपण पुढे ढकलत असतो, गोष्टी जसे एखादे पुस्तक वाचने ज्यामुळे तुमचा आत्मा उल्लासित होतो, एखादी खोली स्वच्छ करणे, एका मैत्रिणीसोबत कॉफी घेणे. तुमचा हा "रिकामा वेळ" कसा घालवायचा हे काळजीपूर्वक निवडा आणि तसे करण्यास तुम्ही काय त्यागून देत आहात ते पहा. आता तुम्ही हेतुनिहाय गोष्टी करत आहात (१ करिंथकरास पत्र ९:२४-२७)!

### ३. समतोलाची कृती

आज सर्वात कठीण अशी बाब जी आहे ज्यामध्ये स्त्रिया गुरफटलेल्या आहेत ती म्हणजे एक समतोलीत आयुष्य जगणे, घर, काम आणि चर्च मधील जवाबदार्या पार पाडणे- सर्वकाही चांगले करत राहण्याचा

प्रयत्न करणे आणि प्रामाणिक राहणे, सर्वांना आनंदित ठेवणे. हे तर केवळ त्यांचे देवासोबत असणाऱ्या नात्यामुळे येते. मी त्यांना चांगले भोजन, एक प्रेमळ घर, सांत्वन, उत्तेजन, सुज्ञान, आणि आशा देऊ शकतो, पण मी त्यांना खुश करू शकत नाही. माझ्यासाठी, समतोल लाभला जेव्हा मला कळले की मी माझे आयुष्य एकाच श्रोत्यापुढे जगले, माझ्या स्वतःला अथवा इतरांना संतुष्ट केले नाही तर देवाला केले. काही प्रसंगी त्याचा अर्थ म्हणजे माझ्या मुलाच्या फुटबॉल खेळाला हजर राहणे चर्चच्या प्रार्थना सभेपेक्षा किंवा एक "नाते-प्रस्थापित"करणारा कामावरचा प्रसंग; इतर वेळी त्याचा अर्थ म्हणजे आदल्या रात्री कौटुंबिक भोजनाची तयारी करणे म्हणजे पुढील दिवशी कामाची जी माझी तयारी होती तिकडे पोहोचणे किंवा घरीच पवित्र शास्त्राभ्यास घेणे आणि उशिरापर्यंत काम न करणे. रोजचा दिवस म्हणजे समतोल राखण्याची एक कृती होती, एक प्रार्थनापूर्वक रोमांचक कृती होती. होय, अपयश आणि आवाहने मार्गांवर होते, पण शेवटी मी खर्या अर्थाने म्हणू शकेन त्याने विश्वासुपणे माझे मार्गदर्शन केले आणि माझ्या संपूर्ण प्रवासात माझ्यासोबत होता- त्यात काहीच पश्चाताप नाही.

असे काही प्रसंग होते जेव्हा मी चुका केल्या? निश्चितच! मी शिकले की जेव्हा मला तणावग्रस्त वाटले, माझी लेकरे अथवा कामगार ह्यांच्याविषयी जेव्हा मी अचानक काहीतरी केले, बिछान्यात झोपण्याचा प्रयत्न करत असताना जेव्हा माझ्या मनात अजूनही विचार येत होते, ते तर जेव्हा माझी प्राधान्ये रेषेच्या पलीकडे जात होते तेव्हाची ही गोष्ट होती.

हाच तो समय होता जेव्हा चिंतन, मनन, पश्चाताप आणि जुळवून घेण्याचा होता. "देवा, तुला ठाऊक आहे की दिवसात तर केवळ २४

तास असतात. मी हे सर्व करू शकत नाही. तू ज्यासाठी मला पाचारण केले नाही असे मी काय करता हे का?पुढे करण्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट काय आहे?'' माझे आयुष्य तर समतोलाच्या पलीकडे होते, सामान्य स्वरूपाने मी सर्वात "तातडीच्या" किंवा "कमी महत्वाच्या" गोष्टींना माझ्या प्राधान्ये जे होते आणि मुल्ये ह्यावर स्थानापन्न होण्याची परवानगी दिली.

तुमच्या जीवनात समतोल मिळण्यासाठी जर तुम्ही संघर्ष करत असाल, दिवसाच्या तासांपेक्षा करण्यासाठी अधिक कामे जेव्हा तुमच्याकडे असतात आणि तुम्ही संघर्ष करता ती पूर्ण करण्यास, तुमच्या जीवनात ओंते बदल केले पाहिजे हे बघण्यासाठी प्रार्थनापूर्वक थोडा वेळ घालवा. येशू म्हणतो, " माझे जू सोपे आणि माझे ओझे हलके आहे" (मत्तय ११:३०). तुमच्या जवाबदारीचे जू जर तुम्ही सहन करू शकता त्यापेक्षा अधिक असेल, तर त्याने ज्यासाठी तुम्हाला पाचारण केले त्यापेक्षा तुम्ही अधिक गोष्टी करत आहात. तत्कालीन तुमचे जे कुटुंब आणि विश्वस्त सल्लागार आहेत त्यांचा सल्ला घ्या. ते तुम्हाल एक ताजातवाना दृष्टीकोन देऊ शकतील. तुम्ही जीवात्म्याच्या शत्रूशी युद्ध करण्यात अशा अध्यात्मिक युद्धात सापडले आहात का? देवाच्या योजनेपेक्षा अधिक तुम्ही स्थान अथवा दर्जा स्वीकारत आहात का? त्याची जी इच्छा नाही तुम्ही जवाबदाऱ्या घ्याव्या त्या तुम्ही हाती घेतल्या आहेत का? केवळ देव आणि तुम्ही त्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकता; तुम्ही विचारावे ह्याची वाट तो पाहत आहे!

"आपल्याद्वारे जे कार्य देव करतो ते मोजले जाते, आपण त्यासाठी जे काही करतो ते नाही" (चेम्बर्स, १९९२, पृ. ऑगस्ट ३०)

**पाठांतर करा:**

- स्तोत्र ९०:१२- ह्यासाठी आम्हांला आमचे दिवस असे गणण्यास शिकव की, आम्हांला सुज्ञ अंतःकरण प्राप्त होईल.
- नितीसुत्रे २४:३,४- सुज्ञानाच्या योगे घर बांधता येते; समंजसपणाने ते मजबूत राहते; ज्ञानाच्या योगे त्याच्या खोल्या सर्व प्रकारच्या मोलवान व मनोरम वस्तूंनी भरून जातात.

**महत्वाचे सत्य:**

आपले मुल्ये जाणून आपली प्राधान्ये देवाच्या वचनानुसार प्रस्थापित करणे आवश्यक आहे जर आपण देवाच्या दृष्टीने एक समतोलीत जीवन जगणार आहोत.

**तुमचा प्रतिसाद:**

१. तुमच्या मुल्यांची वर्तमान आवृत्ती लिहून काढा आणि तुम्हाला दिसेल अशा ठिकाणी ठेवा ज्याचा रोज संदर्भ म्हणून तुम्ही उपयोग करू शकता आणि वेळोवेळी त्यात बदल करू शकता.

२. ह्या रुतुमानात देवाची इच्छा आहे ती वरदाने आणि क्षमता तुमच्यात आहेत असा अंदाज जर मांडत असाल, पण तुम्ही ते कधीच विकसित केले नसेल कारण तुमच्याकडे वेळ अथवा स्रोत तसे कार्नाय्साठी नव्हते? तसे असल्यास, ते काय आहेत? तुम्ही कोणती पावले उचलू शकता (प्रार्थनेने सुरुवात करून) हे दरवाजे उघडण्यास?

३. तुम्ही ज्या गोष्टी करण्याची सहमती दर्शवली त्या ओळखा. अशा जवळच्या समर्पक गोष्टी परिपूर्ण करा ज्या एकाच वेळी करण्याच्या घटना आहेत.तुमच्या यादीतील इतर गोष्टी कमी करण्याच्या मागे लागा. तुमची जागा भरण्यास कोणाला तरी आवडत असेल अशी

व्यक्ती तुमच्या समोर येईल, किंवा त्या व्यक्तीसोबत तुम्हाला संभाषण करावे लागेल ज्यांना तुम्ही वचन दिले आणि मग ती वेळ निश्चित करा, किंवा देव तुम्हाला दुसरा सर्जनशील पर्याय देऊ शकतो. आजच त्या सर्जनशील प्रक्रियेची आणि प्रार्थनेची सुरुवात करा!

**अतिरिक्त अभ्यासासाठी:**

स्वेनसन ह्यांचे *मार्जिन* (स्वेनसन & स्वेनसन, २००२)

अलान लॉय मकजिन्नस ह्यांचे *द बलांसद लाईफ* (मकजिन्नस , १९९७)

स्टीवन कोवी ह्यांचे *द सेवेन हबित्स ऑफ हायली इफेकटीव पिपल* (कोवी, १९८९)

जुली मॉरगेनस्टर्न ह्यांचे *टाईम मानेजमेंट फ्रॉम द इनसाईड आउट* (मॉरगेनस्टर्न, २०००)

४. जोआना विवर ह्यांचे *हविंग अ मेरी हार्ट इन अ मार्था वर्ल्ड* (विवर, २०००)



## धडा ८: संधान, व्यक्तिमत्वे, नातेसंबंध

यशस्वी नेतृत्वासाठी प्रभावीपणे बोलता येणे संवाद साधने ह्यापेक्षा इतर काहीच महत्वाचे नाही, आणि प्रभावीपणे संधान साधण्यासाठी तुमच्या श्रोत्यांना ओळखण्यापेक्षा इतर काहीच महत्वाचे नाही. संधान साधने ह्यात बोलण्यापेक्षा अधिक गोष्टी असतात; त्यात शारीरिक हालचाल, आवाज, आणि सर्वात महत्वाचे , स्पष्टता–तुम्ही जे काही बोलता तेच तुमचा श्रोता ऐकत आहे ह्याची खात्री असणे. तुम्ही बोलू शकता, पण ऐकणारा जर तुमची भाषा बोलत नसेल किंवा तुम्ही काय बोलत आहात ते समजत नसेल, तर तुम्ही संधान साधलेला नाही.

ह्या धड्यात आपण हे देखील सुचवणार आहोत की ऐकणार्याची भाषा महत्वाची असते इतकेच नाही, तर त्यांचे व्यक्तिमत्व देखील. दोन लोक एकाच व्यक्तीकडून समान संदेश ऐकू शकतात, पण त्यांच्या व्यक्तिमत्वावर अवलंबून ते त्या संदेशाचा अर्थ वेगळा लावू शकतात. आपण चार विभिन्न व्यक्तिमत्वाचे प्रकार हाताळणार आहोत किंवा

“मानसिकता” जे हिप्पोक्रेत्स ह्यांनी दोन हजार वर्षांपूर्वी शोधल्या, आणि आज देखील त्या तशाच आहेत.

दोन्ही संधान साधण्याचे कौशल्य आणि व्यक्तिमत्वे हे महत्वाचे आहेत, जर आपल्याला असा एक संघ तयार करायचा आहे ज्यामध्ये लोक एकमेकांशी अर्थपूर्ण नातेसंबंध तयार करणार असतील.

**१.संधान**

पुढारी ह्या नात्याने आपण अनेकदा विचार करतो की संधान म्हणजे आपण आपला मुद्दा ऐकणाऱ्याच्या पर्यंत कसा प्रभावीपणे पोहचवू शकतो. हजारो लोकांच्या पुढे प्रेरणादायी वक्तृत्व पोहचवण्यात सामर्थ्य आहे, पण एक एक करून शांतपणे ऐकण्यात देखील जबरदस्त सामर्थ्य आहे. केवळ जेव्हा आपण आपल्या श्रोत्यांचे ऐकणार तेव्हाच आपण स्पष्टपणे प्रत्यक्षात संधान साधत आहोत अथवा नाही हे कळेल.

स्टीवन कोवी हे “द सेवेन हबित्स ऑफ हायली इफेकटीव पिपल” ह्यात त्याच्या पाचव्या सवयीत ऐकण्याला महत्व देतात: “प्रथम समजण्याचा प्रयत्न करा, समजून घेण्यापेक्षा” (कोवी, १९८९). ते दर्शवतात की अनेकदा, इतर लोकांचे ऐकण्यापेक्षा, आपण मानसिक दृष्टीने आपला प्रतिसाद तयार करत असतो. तो सुचवतो की आपण जर काळजीपूर्वक व्यवस्थित ऐकले आणि ते पुन्हा बोलून दाखवले तर अधिक जास्त प्रभावी संधान साधणारे होऊ शकतो. उदाहरणार्थ, आपण म्हणू शकतो, मला असे वाटते तू म्हणत आहेस...

टिपा

मी तुला बरोबर समजून घेतले ना?" जेव्हा मी प्रथम हे तत्व शिकलो लगेच माझ्या दोन्ही मुलांसोबत हे प्रत्यक्षात आचरणात आणण्याची मला संधी लाभली, जे त्या वेळी तरुण होते ज्यांचे दृष्टीकोन आणि व्यक्तिमत्वे विभिन्न होती. एके सायंकाळी जेहा भोजन करताना भावना उफाळून आल्या, मी त्यातील प्रत्येकाला कोवीची पद्धत अवलंबिण्यास सांगितले. ते वेगळ्याच संभाषणाकडे घेऊन गेले!

जे पुढारी नवीन आणि आवाहनात्मक कल्पना प्रस्तुत करतात ते नेहमीच अभिप्रायाची अपेक्षा ठेऊ शकतात- प्रशंसा आणि जे टीका. तुम्ही एक पुढारी ह्या नात्याने दोन्ही प्रकारच्या अभिप्रयांना कसा प्रतिसाद देता त्यातून जे तुमची नेतृत्वाची शैली दिसून येते. तुम्ही हसून मान हलवून काहीच न बोलता राहू शकता (आणि काहीच शिकू शकत नाही) किंवा काळजीपूर्वक ऐकून तुम्ही त्या प्रशंसेमागील विचार समजून घेण्याचा प्रयत्न करू शकता. प्रशंसेच्या बाबतीत, ऐकण्याने तुम्हाला जे काही सहाय्यक होते ते जास्त समजते, आणि नकारार्थी प्रशंसेच्या बाबतीत, त्यात एक रास्त मुद्दा असतो हे तुम्हाला कळेल! ह्याची नोंद घेणे महत्वाचे आहे की जी व्यक्ती तुम्हाला नकारात्मक अभिप्राय देते ती तर एक वरदान देते; ती आपले विचार तुमच्यासोबत बोलून तुम्हाला स्पष्ट करण्याची संधी देऊ शकते किंवा

तिच नकारात्मकता इतर तिच्या वीस मैत्रिणींमध्ये पसरवू शकते. अभिप्रायाचे वरदान नेहमी प्राप्त करून घ्या, दोन्ही प्रकारे, कृतज्ञतेने आणि आकलन दृष्टीने.

संकटात अथवा कठीण प्रसंगात व्यक्तीशः प्रतिसाद देण्यास पुढाऱ्यांना पाचारण होते, पण काय करावे अथवा बोलावे यामध्ये त्यांना कमी प्रशिक्षण मिळते. चुकीची गोष्ट न बोलण्यात किंवा करण्यात, ते तर ती परिस्थिती टाळतात. स्टीफन मिनिस्ट्री नामक एक संस्था ह्या क्षेत्रात उत्तम प्रशिक्षण देतात आणि "सान्निध्याचे सेवाकार्य" ह्याविषयी सोपी सूचना देतात. केवळ हजर राहणे आणि ऐकणे अथवा शांत बसने त्या दुखात असणाऱ्या व्यक्तीसोबत ह्याचे कौतुक होते व ते एक दुर्मिळ वरदान आहे.

ऐकणे तर महत्वाचे आहे, पण त्याच वेळी, देवाने तुमच्या हृदयात काय ठेवले ते स्पष्टपणे बोलण्याचे महत्व मला कमी करायचे नाही. या ठिकाणी काही टिपा आहेत:

अ. तुमची बोलण्याची शैली, ह्यावर जर प्रामाणिक अभिप्राय पाहिजे असेल, तर लहान मुलांना वर्गात शिकवा. ते तुम्हाला सांगतील की तुम्ही कंटाळवाणे, खूप बोलता, अथवा त्यात काहीच आवेश नाही हे बरोबर सांगतील!

ब. सराव, सराव, सराव करा! मी ऐकले आहे की बिली ग्राहम झाडाच्या खोडांना उपदेश करायचे. माझ्या वडिलांनी मला आरशाच्या समोर सराव करण्यास शिकवले जेणेकरून मी माझे हातवारे पाहू शकले किंवा इतर काही वागणूक जी लक्ष विचलित करू शकतात.

क. सोपे ठेवा! त्याचा अर्थ असा नाही की तुम्हाला तयारी करण्याची गरज नाही. खरेतर, त्याचा अर्थ म्हणजे अधिक जास्त तयारी तुम्ही केली पाहिजे, आणि तुमचा संदेश तीन किंवा चार चांगल्या रीतीने स्पष्ट होणाऱ्या मुद्द्यात बसवण्याचा प्रयत्न करा.

ड. तुम्हाला जर भीती वाटत असली तरी घाबरू नका. माझे वडील, जे सुमारे ७० वर्ष पाळक म्हणून काम करत होते ते आठवड्यातून चार किंवा पाच वेळा उपदेश द्यायचे, त्यांनी मला एकदा सांगितले की प्रत्येक वेळी उपदेश देताना त्यांना घाबरलेले वाटायचे. जेव्हा तुम्ही स्वतःच्या क्षमतेबद्दल आत्मविश्वासू असता आणि पवित्र आत्म्याच्या अभिषेकवर अवलंबून होत नाही तेव्हा तुम्ही त्रासात सापडता.

इ. प्रभूने तुम्हाला त्याचे प्रेम आणि सत्य इतरांच्या पर्यंत वाहणारा स्पष्ट प्रवाह बनवावे अशी त्याच्याकडे मागणी करा, एक स्पष्ट काच ज्यातून त्याचा प्रकाश चमकणार. तुमच्या संदेशाच्या शेवटी तुमच्या भावना किंवा श्रोत्यांनी प्रतिसाद न देणे हे संदेश व्यवस्थित लोकांपर्यंत गेला अथवा नाही ह्याची चांगली दर्शके नाहीत. ऐक्णार्यांचा एक पूर्ण शांत गट दाखवतात की कोणत्याही प्रकारे लक्ष विचलित न होता वचन पेरण्यात आले आहे. देवाने त्याचे हेतू सिद्ध करण्यास आणि पवित्र आत्म्याने ऐक्नार्यांसाठी ते सत्य घेऊन येणे ह्यावर विश्वास ठेवा.

## २. व्यक्तिमत्वाचे प्रकार

व्यक्तिमत्वे समजून घेण्याचे ध्येय हे लोकांना चांगल्या डब्ब्यात वाईट किंवा चांगले ह्यात बसवण्यासाठी नाही, पण आपण प्रतिसाद का देतो हे समजण्यासाठी आणि इतर लोक का प्रतिसाद देतात आणि वेगळ्या रीतीने देतात ह्याचा विचार करण्यासाठी ते असते. आपण इतरांच्या बद्दल जसे शिकतो, आपल्याला कळते की आपला मार्ग योग्य मार्ग नसेल, आणि नियोजन करण्यात विभिन्न दृष्टीकोन आणि समस्या सोडवण्यासाठी हे चांगले निकाल देतील जसे आपण एकत्र काम करण्यास सुरुवात करतो.

व्यक्तिमत्वांचे प्रकार करण्यासाठी अनेक दृष्टीकोन आहेत, पण

अनेक लोक चार विभिन्न वर्गवारी सुचवतात. व्यक्तिमत्वांचे वर्गीकरण करण्याच्या तीन सामान्य पद्धती आणि त्यातील प्रत्येक वर्गवारी ह्या पुढीलप्रमाणे आहेत:

- डीआयएससी - वर्चस्व, प्रभाव, अनुपालन, आश्वासक
- हिप्पोक्रेत्स - चिडखोर, खमंग, उदास, निरुत्साही
- रंग- लाल, पिवळा, निळा, हिरवा

ह्या प्रत्येक दिलेल्या पद्धतीत मी त्याच अनुक्रमे त्या वर्गवारी मांडलेल्या आहेत.

खाली दिलेल्या संक्षिप्त स्पष्टीकरणात, मी "रंगांचा" उपयोग करण्याची निवड करते, मुख्यतः कारण मनेजमेंत टेक्नोलॉजीज, इंक ह्यांच्या निरीक्षक कार्यशाळेत मी प्रथमच ते बघितले आणि सामोरे गेलो. आपण सुरुवात करण्यापूर्वी, मला हे सांगू द्या की अनेक लोक ह्या चार प्रकारांची एक सांगड आहे.

- **लाल (वर्चस्व, चिडखोर) -- ध्येयनिहाय**
  - सुगावा: थेट, निर्णयात्मक, धोके पत्करण्यास तयार, जवाबदारी घेण्यास आनंदित, थेट उत्तरे, नियंत्रणापासून मुक्त, ध्येय असणे
  - प्रयत्नाने आणि चुकांनी निर्णय घेणे, निकाल तपासून घेणे
  - जर तुम्ही लाल वर्गात असाल, तर सावध राहा: आवेगपूर्ण निर्णय घेण्यात, कठोर आणि मागणी करणारे, ऐकण्यात अपयशी
  - लाल सोबत संधान साधणे: एका निर्णयाचे मुख्य चुका आणि यश ह्या सुचवा आणि पटकन तात्पर्य काढ, लवकर चिडू नका
  - लाल वर्गात बसणारे लोक नात्यांशी संघर्ष करतात. सूचना:

विचारल्याशिवाय तुमचा सल्ला स्वतःकडे ठेवा, इतरांकडे कमी वृत्तीने बघू नक, लगेच तुमच्या चुका कबूल करा, क्षमा मागण्यास पटकन तयार व्हा

- **पिवळा (प्रभाव, खमंग) -- नात्यानुसार**
  - सुगावे: समाजात मिसळणारे, मज्जा करणारे, लवकर बदल स्वीकारणारे, समूहात कार्य करायला आवडणारे, चांगले गोष्ट सांगणारे आणि प्रशिक्षक
  - मते ऐकून निर्णय घ्या आणि मग एकमत ठरवा
  - तुम्ही जर पिवळ्या वर्गात असला, तर सावध असा: सर्वांना संतोषविण्याचा प्रयत्न, अव्यवस्था, सहज लक्ष विचलित होणे, अतिशयोक्ती, हाताळणी
  - पिवळा रंगासोबत संधान साधणारे:त्यांना ध्येयावर लक्ष केंद्रित करण्यास सहाय्य करणे, त्यांच्या समस्यांमधून बोलणे, गोंधळाची अपेक्षा करणे, उशीर करणे, नातेसंबंध- विकसित करण्याचा समय
  - पिवळ्या रंगाची मानसिकता असणारे लोक खूप बोलतात आणि आत्म-केंद्रित असतात. सूचना: तुमच्या टिप्पणी एकत्र करा, अतिरिक्त बोलू नका, इतरांचे ऐकणे, रचनेचे कौशल्य सुधारण्याप्रत काम करणे
- **निळा (अनुपालन, उदासीनता) – माहिती देण्याने**
  - सुगावे: शोधा आणि माहिती शोषून काढणे, शिकणे, नियोजन, विकास करण्यास, तपासण्यास, सर्जनशील आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प तपासून पाहणे, विचार करणे
  - निर्णय घ्या: माहिती गोळा करणे आणि सर्व पर्याय तपासून घेणे
  - तुम्ही जर ह्या निळ्या वर्गात बसता, ह्यापासून सावध राहा: माहिती अति संकलित करणे, निर्णय घेणे लांबवणे,

अध्यात्मिक गोष्टींवर वैचारिकता आणि वितर्क ह्यांना मोल देणे

- निळ्या रंगाच्या मानसिकतेच्या व्यक्तीशी संधान साधने: त्या पर्यायातून काम करण्यास त्यांना सहाय्य करा, निर्णय घेण्यात संयम बाळगा, त्यांचे तर्क- वितर्क ऐकून घ्या
- निळ्या रंगाच्या मानसिकतेचे लोक निराशा आणि परिपूर्णता ह्यांच्याशी संघर्ष करत असतात: सूचना: कृतज्ञतेची प्रवृत्ती विकसित करा, सकारात्मक गोष्टींकडे पहा, इतरांच्या आणि स्वतःच्या चुकांसाठी दया निष्पन्न करा, देवावर तुमचा विश्वास आणि भरवसा विकसित करा

**हिरवा (आश्वासक, निरुत्साही)पद्धती- वर आधारित**

- सुगावे: राखीव, सावध, तपशीलांवर आधारित, परंपरा अनुसरणे, नियमावली आणि पद्धती, जसे दिशा आणि सूचना
- असे निर्णय घ्या: तपशील एकत्र गोळा करून, समस्येची व्याख्या देणे, ऐतिहासिक माहिती गोळा करणे, पद्धती विकसित करणे, सर्वकाही नमूद करून ठेवणे
- हिरव्या रंगाच्या मानसिकतेचे जर तुम्ही असाल: तर सावध राहा: अति-नियंत्रण, कमी सुपूर्त करणे, लवचिकता नसणे आणि बदलण्याची तयारी नसणे, अधिक जास्त अंदाज लावणे आणि धोके पत्करणे
- हिरव्या रंगाच्या व्यक्तीशी संधान साधने: सर्जनशीलतेला उत्तेजन देणे, त्यांच्यात आत्मविश्वास दाखवणे, कागदपत्रे प्रस्तुत करणे, रचना आणि क्रम

हिरव्या रंगाची मानसिकता असणारे लोक आवेशाचा अभाव आणि बदलास प्रतिकार म्हणून संघर्ष करतात. सूचना: त्यांना नवीन गोष्टी करण्याचे उत्तेजन द्या, ते कशाबद्दल आवेशी आहेत हे शोधून काढणे,

मुद्दे हाताळणे, बदलास जुळवून घेणे लोकांना समजून घेण्यात एक अत्यंत वेगळा मुद्दा आणि दृष्टीकोन म्हणजे ज्याची सुरुवात अरण्यातील वडीलजणांनी झाली, तिसऱ्या शतकात देवाच्या अधिक समीप जाण्यास जे ख्रिस्ती मागे हटले. हा तर एन्नेअग्रम दृष्टीकोन आहे. ह्याची अधिक माहिती तुम्हाला आभासी माध्यमातून मिळेल; जगिक लोकांचा समुदाय देखील हा दृष्टीकोन वापरतात.

**३. नातेसंबंध**

त्याच्या शिकवणीत येशूने नात्यांबद्दल बोलण्यात खूप वेळ घालवला. त्याच्यासाठी ते इतके महत्वाचे का होते? आपले एकमेकांशी असणारे नातेसंबंध हे आपले देवाशी असणाऱ्या नात्याचे प्रतिबिंब आहेत. आपण देवावर प्रेम करतो आणि त्याच वेळी बहिणीचा द्वेष करू शकत नाही (१ योहान २:९). जेव्हा मोठी आज्ञा काय आहे हे विचारले गेले, येशूने दोन आज्ञा सांगून प्रतिसाद दिला: "“तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर प्रीती कर

... आपल्या शेजाऱ्यावर स्वतःसारखी प्रीती कर." (मत्तय २२:३६-३९).

नवीन करार आपल्याला इतर नात्यांच्याबद्दल देखील सूचना देते:

"आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा; जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हांला क्षमा केली आहे तशी तुम्हीही एकमेकांना क्षमा करा" (इफिसकरास पत्र ४:३२).

"तुम्ही रागवा, परंतु पाप करू नका; तुम्ही रागात असताना सूर्य मावळू नये" (इफिसकरास पत्र ४:२६)

“तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, [जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या” (मत्तय ५:४४).

अनेकदा नवीन करारात आपणास इतरांच्या सोबत शांतीत राहण्याची सूचना मिळते (रोमकरास पत्र १२:१८; २ करिंथकरास पत्र १३:११, इब्री १२:१४). पण लोक कठीण असू शकतात, काही वेळा अशक्य! कठीण लोकांना आपण कसे हाताळतो? विशिष्ट रीतीने, आपण तीन पैकी एक मार्ग निवडतो- टाळणे, हल्ला, किंवा शांती प्रस्थापित करणे. शास्त्रवचन स्पष्टपणे शेवटला पर्याय निवडावा असे सांगते.

तुम्ही हाताळत असणारी परिस्थिती वयक्तिक असो, किंवा दोन गटांमधील सदस्यांच्या मध्ये तुम्ही भांडण हाताळत आहात, त्यातील मुलभूत तत्वे सारखेच असतात.

एक पाऊल मागे हटून समस्येचे मूल्यमापन करण्याने सुरुवात करा. समस्या कधी उद्‌भवतात? त्यातील समान दुवा जे असतात ते पहा आणि मग सुज्ञान व फरक करता येण्याची प्रार्थना करा.

अ. हे तर व्यक्तीमत्वांचा एकावर आदळणे

टिपा

नाही ना, मुल्ये, ध्येय अथवा अपेक्षा ह्यात फरक होणे, किंवा कदाचित एक साधा गैरसमज जो वाईट संधान किंवा चुकीची माहिती ह्यावर आधारित असतात? त्या परिस्थितीच्या बद्दल मनन करून प्रार्थना करण्यास थोडा वेळ घालवा. देवाला त्याने तो दृष्टीकोन, दूरदृष्टी आणि वेळ हे मिळावे म्हणून मागा. जर मुद्दा व्यक्तिमत्वे एकमेकांवर आदळणे हा आहे, त्यावर उपाय एका बलवान नातेसंबंध ह्याकडे नेईल जे सर्वांसाठी फायद्याचे आहे, उदा. पौल आणि बर्नबा. जर मूल्यांमध्ये अथवा ध्येयांमध्ये फरक हा मुद्दा असेल, प्रत्येकाने प्रभूचा धावा करावा आणि त्याची इच्छा शोधून काढावी. जर मुद्दा वाईट संधान अथवा चुकीची माहिती आहे, त्याच्यावर बोलणे स्पष्टता घेऊन येतील आणि सहमती जेणेकरून आपण एकत्र त्या प्रकाशात चालत राहू शकतो (१ योहान १:७).

ब. हे अध्यात्मिक युद्ध आहे का? कदाचित फुटीचा आत्मा कार्यरत आहे, किंवा कोणतातरी इतर अध्यात्मिक हल्ला बाहेरून येत आहे, जो शत्रू पेरत आहे जे तुमच्यात वाद निर्माण करून देवाचे कार्य नष्ट करू शकतात.तसे असल्यास, तुमच्या दोघांमधील भिंती नष्ट करा खुल्या आणि प्रामाणिक संभाषणाने आणि शत्रूच्या विरुद्ध एकत्र होऊन प्रार्थना करा (इफिसकरास पत्र ६:१२).

क. हे नातेसंबंध मोडणे पापाचा परिणाम आहे का, तुमच्या किंवा इतर  व्यक्तीच्या? कदाचित पाप आणि भूतकाळातील जखमा हे न्याय निष्पन्न करतात अथवा नकारार्थी भावनिक प्रतिसाद उत्पन्न करतात जे कोणतेही शब्द अथवा कृती ह्याच्याशी जुळत नाहीत. “तुमच्यामध्ये लढाया व भांडणे कशातून उत्पन्न होतात? तुमच्या अवयवांत ज्या वासना लढाई करतात त्यांतून की नाही”

(याकोब ४:१)?

पिसमेकर मिनिस्त्रीज चार पवित्र शास्त्रीय मार्ग सुचवले:

१. देवाचे गौरव करा. विश्वास ठेवा की देव ह्या वादाचा उपयोग चांगल्यासाठी करेल (रोमकरास पत्र ८:२८).
२. तुमच्या स्वतःच्या डोळ्यातील कुसळ काढा (मत्तय ७:५). फिलीप्पेकरास पत्र ४:२-९.
३. सौम्य रीतीने पुनरस्थापित करा. पुनरस्थापनेच शोध करा, दोष नाही (मत्तय १८:१५-१८).
४. जाऊन समेट कर. देवाने जशी क्षमा केली तशी करा (कलस्सेकरास पत्र ३:१२-१४) (सांडे, २०१४).

दुसरी व्यक्ती त्या भांडणात आपली भूमिका स्वीकारते अथवा नाही, आपली क्षमा व्हावी अशी जर इच्छा असेल तर आपण क्षमा करावी अशी देवाची आज्ञा आहे (मत्तय ६:१५). जर तुम्ही ह्या क्षेत्रात संघर्ष करत असाल, ह्या अध्यायाच्या शेवटी सूचना आणि संकेतस्थळे दिलेली आहेत.

ठराविक व्यक्तीमत्वांच्या प्रकारासाठी, अशा प्रकारे सामना टाळण्यासाठी खूप मोह असतो आणि अशी आशा बाळगावी की “वेळेसोबत ते सर्वकाही निघून जाईल.” मी त्या पैकी एक आहे असे मुक्तपणे कबूल करते. त्याच वेळी, अनुभवातून मी शिकले की क्वचितच ही समस्या “निघून जाते.” अनेकदा ती तात्पुरती पुरली जाते, केवळ त्याचा उद्रेक होण्यासाठी, जेव्हा ते सर्वातकमी सोयीचे असते. जर वारंवार ती समस्या तुमच्या मनात आली आणि तुम्ही जर दुसऱ्या व्यक्तीला टाळले तर, ती बाब

हाताळण्याची गरज आहे, प्रार्थनापूर्वक, प्रामाणिकपणे, आणि आदराने दुसऱ्या व्यक्तीशी थेट संधान साधून, शक्यतो समोरासमोर झाले तर बरे.

**पाठांतर करा:**

◐ रोमकरास पत्र १२:१८ - शक्य तर सर्व माणसांबरोबर तुमच्याकडून होईल तितके शांतीने राहा.

◐ इफिसकरास पत्र ४:३२ - आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा; जशी देवाने ख्रिस्ताच्या ठायी तुम्हांला क्षमा केली आहे तशी तुम्हीही एकमेकांना क्षमा करा.

**महत्वाचे सत्य:**

अनेक संधान साधण्याच्या शैली समजून घेणे आणि व्यक्तिमत्वे देखील हे मोठे नातेसंबंध आणि समाज बांधण्यासाठी आवश्यक आहे.

**तुमचा प्रतिसाद:**

१. त्यातील कोणत्या व्यक्तिमत्वाच्या शैलीत तुम्ही बसता आणि स्वतःला व कुटुंबाला त्याची ओळख देऊ शकता ते पहा. जर इंटरनेट हाताळू तुम्ही शकत असाल आणि एक व्यक्तिमत्व चाचणी घेतली असेल, ह्या discpersonalitytesting.com/free-disc-test संकेतस्थळावर भेट देऊन ती परिपूर्ण करा.

२. पुढे येणाऱ्या संभाषणात काळजीपूर्वक ऐकण्याची पद्धत वापरा आणि प्रतिसाद देण्यापूर्वी समजून घेऊन स्पष्टीकरण द्या. हे विचित्र वाटले तर आश्चर्यचकित होऊ नका आणि पहिल्यांदा तुम्हाला ते अवजड वाटेल. जसे अनेक गोष्टींमध्ये होते, सवय होऊन ते पुढे चांगले होत जाईल. तुम्ही ज्यांच्यासोबत काम करता

त्यांना जर सूचना देत असाल, त्यांनी काय ऐकले हे परत तुम्हाला सांगण्याची विनंती करा. ते तुम्हाला आश्चर्यचकित करेल!

३. मागे झालेल्या कोणत्यातरी गैरसमजामुळे तुम्ही कोणालातरी टाळत आहात का? शांती प्रस्थापित करणाऱ्या "४ जी " ह्यांचे अवलंबन करा, वेळेच्या बाबतीत लक्ष देऊन देव कसा मार्गदर्शन करतो हे लक्षात ठेवा.

**अतिरिक्त अभ्यासासाठी:**


*www.peacemaker.net*

*www.stephenministries.org*

*www.enneagram.com*

अलान लॉय मकजिन्नस ह्यांचे द *फ्रेन्डशिप फाक्टर* (मकजिन्नस, १९७९)

कॉक& हौग ह्यांचे *स्पिकिंग द ट्रुथ इन लव* (कॉक& हौग, १९९२)

लुवीस स्मिडीस ह्यांचे *फॉरगीव अंड फॉरगेट* (स्मिडीस, १९८४)

डबोरा स्मिथ पेग्वीस ह्यांचे *मानेजिंग कोन्फ्लीक्त गोद्स वे* (पेग्वीस, १९९७)

मानेजमेंत टेकनोलोजीस *ह्यांचे पर्सोनालायसीस* (नोलंड, २०१५) फ्लोरेंस लीत्तायुर ह्यांचे *पर्सोनालिटी प्लस* (लीत्तायुर, १९८६) किसे, किसे, स्टार्क, हर्ष ह्यांचे *लाईफ कीज* (किसे, सतर्क & हर्ष, १९९६)

स्टीफन आर. कोवी ह्यांचे द *सेवेन बेसिक हबित्स ऑफ हायली इफेक्टिव पिपल* (कोवी, १९८९)



## धडा ९: देवाने जिकडे तुम्हाला ठेवले त्या ठिकाणी पुढारीपण करणे

आपल्यातील काही जण इंग्लंडचे प्रिन्स विलियम ह्यांच्यासारखे नेतृत्वाची स्थाने गाजवण्यास जन्मास आले, आणि काही स्वाभाविकच पुढारी म्हणून जन्मास येतात (जरी काही व्यक्तिमत्वे ते शीर्षक गाजवू शकतात), पण आपल्यातील बहुतांशी लोकांसाठी नेतृत्व हे हळुवारपणे, पद्धतशीर रीतीने उदयास येते आणि ते देखील अनुभव, चिंतन आणि निरीक्षण ह्यांनी जे सुज्ञान आपणास मिळते त्याद्वारे प्राप्त होते. म्हणूनच एखादी व्यक्ती ह्या नेतृत्वाच्या प्रवासाची सुरुवात कशी करते? देवाने तुम्हाला जिकडे ठेवले आहे त्या ठिकाणी पुढारीपण करण्याने सुरुवात करा. जसा मी आधीच उल्लेख केला माझे नेतृत्वातील मागील अनुभव हे चर्च आणि विद्यार्थी म्हणून जे कामकाज स्वयंसेवक म्हणून केले त्याने सुरु झाले, विशिष्टरीतीने माझ्या तारुण्यातील प्रौढ निरीक्षण करण्याच्या वर्षांनी ते झाले. त्या

सुरुवातीच्या काही वर्षात जे धडे नेतृत्वाचे मी घेतले ते खूपच अमोल होते- टीका आणि नकार ह्यांना कसा प्रतिसाद द्यायचा, एक संघ विकसित करण्याचे महत्व, आणि सदैव टिकणारी जी संस्था आहे तिचा पाया कसा उभा करायचा. माझ्या जीवनाची सर्वात महत्वाची नेतृत्वाची भूमिका माझ्या विसाव्या दशकात आली जेव्हा मी आई बनले.

नंतर आयुष्यात, माझ्या सांघिक आणि सामुदायिक कारकिर्दीत एक व्यवस्थापक म्हणून मी माझ्या मालकांना हे सांगताना मला आठवते की मला ह्या नोकरीसाठी जे काही आवश्यक शिकण्याची गरज होती ते सर्वकाही मी दहा वर्षे जेव्हा माझ्या दोन मुलांसोबत घरी होते त्या दरम्यान शिकले." आयुष्यात सुरुवातीला जे नेतृत्वाचे धडे आपण शिकतो त्याला कमी लेखू नका. तुमच्या नेतृत्वाच्या भूमिकेत अधिक हेतुपुरेसर जसे तुम्ही बनता, ह्या पुढील चार तत्वांवर तुम्ही विचार करावा असे मी सुचवते.

**१. एक दृष्टांत ठेवा**

नेतृत्व करत असताना तुम्ही काय सिद्ध करण्याचा प्रयत्न करता? तुम्ही एखादी समस्या सोडवण्याचा प्रयत्न करता, ध्येय निश्चित करण्याचा अथवा दिशा प्राप्त करण्याचा, एखादी संधी उलगडून बघण्याचा, किंवा एखादी नेतृत्वात जी पोकळी निर्माण झाली ती पाहता? लोकांना अनुसरण करण्याची प्रेरणा देऊन, तुम्हाला पुढाकार करण्यास जे प्रेरणा देते ते तुम्ही स्पष्टपणे इतरांना सांगणे गरजेचे आहे. तुम्ही दैवी प्रेरणेला प्रतिसाद देत असाल, तुमचे एखाद्या गरजेच्या प्रती असणारे निरीक्षण, किंवा अधिकारातील व्यक्तीचे एखादे आमंत्रण. मोशेला इस्राएल लोकांना गुलामगिरीतून सोडवण्याचा दृष्टांत होता. दुर्भाग्याने, त्याच्या सुरुवातीच्या प्रयत्नांचा शेवट हा तो आपल्या

आयुष्यासाठी पळ काढून अरण्यात चाळीस वर्षे जे लपला त्याने झाली. जर तुमच्या नेतृत्वाच्या अनुभवांचा शेवट अपयशात झाला तर तुम्ही चांगल्या सहवासात आहात. केवळ हार मात्र मानू नका! जॉन माक्सवेल आपल्याला "पुढे जाण्याचा" आणि आपल्या चुकांमधून शिकण्याचा सल्ला देतात (२०००).

**२. तुमच्या स्वतःला जाणून घ्या**

रोमकरास पत्र १२:३ आपणास उत्तेजन देते की आपण स्वतःबद्दल प्रमाणापेक्षा अधिक विचार करू नये. पण नेतृत्वात आपल्याला आपली शक्ती आणि विशेषकरून आपल्या दुर्बलता जाणून घेणे आवश्यक आहे- आपली शक्ती कारण त्यावर आपण रचना करू शकतो आणि आपल्या दुर्बलता कारण त्याची भरपाई आपण कशी करणार हे त्यातून निश्चित करू शकतो.

अ. आपली शक्ती जाणून घ्या. अध्याय ३ मध्ये आपण आपली वरदाने आणि आवड ह्याविषयी बोललो. तुमच्या शक्तीच्या बद्दल बोलण्यास सुरुवात करण्यास हा उत्कृष्ट मुद्दा आहे. कामावर, मंडळीत, घरी , समाजात आणि विशेषकरून जे लोक तुम्हाला उत्तम ओळखतात त्यांच्यात लोक तुमच्याबद्दल काय सकारात्मक गोष्टी बोलतात? तुम्हाला करायला आवडणाऱ्या ४ ते ५ गोष्टी ज्या तुम्ही चांगल्या करता देखील त्यांचा विचार करा. आता तुम्ही जे नेतृत्वाच्या स्थानाचा विचार करत आहात, त्यामधून ही शक्ती कशी व्यक्त होते?

ब. तुमच्या दुर्बलता जाणून घ्या. जेव्हा तुम्ही अपयशी होता, तेव्हा सामान्यतः त्याचे कारण काय असते? लोक तुमच्याविषयी सामान्यतः कोणत्या नकारात्मक गोष्टी बोलतात? शक्य असेल तर कोणत्या प्रकारच्या परिस्थिती तुम्ही टाळता? तुमच्यासमोर आवाहन म्हणून असणाऱ्या ४ ते ५ गोष्टींचा विचार करा. वर्तमान परिस्थितीत तुमच्या नेतृत्वाच्या प्रभावीपणावर ते कसा अटकाव घालू शकतात? ह्या दुर्बलतांची भरपाई म्हणून तुम्ही काय करू शकता?

क. तुमच्या हृदयाची प्रेरणा जाणून घ्या. जसा तुम्ही “देवाने जिकडे तुम्हाला ठेवले आहे तिकडे नेतृत्व करण्याचा विचार करता”, तुम्हाला त्यामधून मिळणारी प्रेरणा काय आहे? नियंत्रणात राहणे? लोकांची गरज भागवणे? इतरांचे लक्ष अथवा जिव्हाळा साधून घेणे? तुमच्या इच्छेत “देहाची वासना” आणि गर्व, लोभ , हेवा ह्यांची भूमिका काय आहे? देव आणि स्वतःबद्दल प्रामाणिक राहा.

अरण्यातील चाळीस वर्षात मोशेमध्ये बदल झाला. आता मिसर देशाचा तो राजकुमार

टिपा

नव्हता, तर आता मेंढपाळ झाला. एक क्रोधीत सूड घेणारा नव्हे, तर एक विनम्र अरण्यवासी तो बनला. जो पुरुष “त्याच्या शब्दात महान आहे” (प्रेषित ७:२२) असे बनण्याच्या ऐवजी, त्याने स्वतःचे वर्णन “मुखाचा जड व जिभेचाही जड” असे केले. त्याची ताकत त्याची दुर्बलता होऊन बसली, पण आता देवाच्या दृष्टीने, तो पुढाकार घेण्यास तयार होता.

**४. देवाची वाणी ऐकणे**

पवित्र शास्त्राचे महान पुढारी, अब्राहाम, मोशे, यहोशवा, गिदोन, दावीद, पेत्र, पौल, जुना आणि नवीन करार, सर्वांचे एक समान वैशिष्ट्य होते. त्यांच्या जीवनाच्या कुठल्यातरी क्षणी सर्वच देवाच्या पाचारणाला “होय” म्हणाले. त्यातील कोणीही अत्यंत उत्कृष्ट अथवा स्तुत्य असे नव्हते, खरेतर त्यांच्यातील बरेच स्वतःला नेतृत्व करण्यासाठी कमी पात्र असे लेखले जात असे, आणि तरीही देवाच्या पाचारणाप्रती त्यांनी आज्ञापालन केले. जेव्हा देव जसे मोशेला म्हणाला ,”तुझ्या हातात काय आहे?’’ (निर्गम ४:२) तेव्हा आपल्याला म्हणाल्यावर, आपल्याला देखील अपूर्ण वाटते. प्रश्न आहे की आपण आज्ञाधारकपणा दाखवून विश्वासाचे पाउल उचलून आणि आपल्याकडे जे काही आहे त्याचा वापर त्याच्यासाठी करणार की नाही. एक लहान मूल म्हणून माझे आवडते गीत होते, “शामगार कडे बैल होता, दाविदाकडे गोफण, दुर्कस कडे सुई होती, रहाबकडे दोरी होती, शमशोनाच्या हाती एक जबडाचे हाड होते,अहरोनाच्या हाती एक काठी होती, मरीयेकडे एक मलम होता आणि त्यांच्या सर्वांचा उपयोग देवाने केला.” तुमच्या हातात काय आहे?

**५. एक संघ विकसित करा**

नेतृत्व करत असताना करण्यात येणारी सुरुवातीची महत्वाची कामगिरी म्हणजे एक संघ विकसित करणे जे लोक तो प्रवास तुमच्यासोबत वाटून घेण्यास तयार असतील. तुम्ही त्यांची निवड कशी करणार? असे सचोटीपूर्ण लोकांचा शोध घ्या जे सत्य बोलण्यास समर्पित आहेत जेव्हा दुख होते तेव्हा देखील, ज्या लोकांनी तो दृष्टांत पटकवला आणि तो खरा होण्याची वाट पाहण्यास व बघण्यास आवेशी आहेत, तुमच्या लक्षात न येणारे खाचखळगे देखील पाहण्यास जे लोक सुज्ञ आहेत, ज्या लोकांची ताकत तुमच्या दुर्बलतेत आहे, ज्या लोकांच्या न्याय आणि प्रामाणिकपणा ह्यावर तुमचा विश्वास आहे त्यांच्याप्रत हिशेबी असणे, तुम्हाला चुकल्यावर सुधारण्याचा अधिकार ज्या लोकांना तुम्ही देता आणि तशी त्यांची इच्छा असते, ज्या लोकांसोबत तुम्ही आपले मन खुले करू शकता आणि तुमच्या त्रुटींच्या पश्चात ते तुमच्यावर प्रेम करणार अशी तुम्हाला खात्री असते. तुमच्या जवळ असणाऱ्या लोकांची संख्या मोठी असण्याची आवश्यकता नसते. एक रात्र प्रार्थना केल्यावर, येशूने बारा शिष्यांची निवड केली जे त्याचे अनुसरण करत होते, पण त्यातील केवळ तिघांच्याच जवळ तो होता. मोशेने केवळ त्याचा भाऊ अह्रोन ह्याची निवड केली, ज्याला तो क्वचित ओळखत होता, पण देवाने त्याचा जोडीदार म्हणून त्याची निवड केली होती. तुमचा संघ हळुवारपणे आणि प्रार्थनापूर्वक विकसित करा.

प्रेम करण्यास समर्पित व्हा, विकसन करा आणि त्यांची सेवा करा, तुमचे हेतू सिद्ध करण्यासाठी केवळ त्यांचा उपयोग करू नका. अनेकदा संघ स्थापन करण्याची सुरुवात ही एक-एक करून मार्गदर्शक भूमिकेने होते, एकमेकांचे मन आणि आयुष्यातील गोष्टी ऐकत, आणि हळुवारपणे भरवसा आणि आत्मविश्वास विकसित करणे.

देवाने तुम्हाला कोठे ठेवले आहे? तुम्ही सिद्ध करावा असा कोणता

दृष्टांत आहे का? तुम्ही त्याच्या सान्निध्यात वेळ घालवला का आणि तुमची ताकत व दुर्बलता ह्या शोधून काढून, तुमच्या हृदयाच्या प्रेरणा तपासून घेतल्या का? त्याने तुम्हाला पाचारण करून आता त्याच्या पाचारणाला उत्तर देण्याचा समय आहे ह्याची खात्री दिली आहे का? तुमच्या प्रभावाच्या क्षेत्रात त्याने असे विश्वस्त लोक ठेवले आहेत का?

**पाठांतर करा:**

रोमकरास पत्र १२:३-८ - कारण मला प्राप्त झालेल्या कृपादानांवरून मी तुमच्यापैकी प्रत्येक जणाला असे सांगतो की, आपल्या योग्यतेपेक्षा स्वतःला अधिक मानू नका, तर देवाने प्रत्येकाला वाटून दिलेल्या विश्वासाच्या परिमाणानुसार मर्यादेने स्वतःला माना. कारण जसे आपल्याला एक शरीर असून त्यात पुष्कळ अवयव आहेत, तरी त्या सर्व अवयवांचे कार्य एकच नाही,

[५]तसे आपण पुष्कळ जण असून ख्रिस्तामध्ये एक शरीर आणि प्रत्येक जण एकमेकांचे अवयव असे आहोत. [६]आपल्याला प्राप्त झालेल्या कृपादानांप्रमाणे आपल्याला निरनिराळी कृपादाने आहेत, म्हणून ईश्वरी संदेश सांगायचा असल्यास आपण तो आपल्या विश्वासाच्या प्रमाणाने सांगावा; [७]सेवा करताना सेवेत तत्पर असावे, शिकवणाऱ्याने शिक्षण देण्यात, [८]बोध करणाऱ्याने बोध करण्यात तत्पर असावे, दान देणाऱ्याने ते औदार्याने द्यावे, अधिकाऱ्याने आपले काम आस्थेने करावे, दया करणाऱ्याने ती संतोषाने करावी.

१ करिंथकरास पत्र १२:४-११- [४]कृपादानांचे निरनिराळे प्रकार आहेत, तरी आत्मा एकच आहे;[५]सेवा करण्याचे निरनिराळे प्रकार आहेत, तरी प्रभूएकच आहे;[६]आणि कार्यांचे निरनिराळे प्रकार आहेत, तरी सर्वांत सर्व कार्ये करणारा देव एकच आहे. [७]तथापि आत्म्याचे प्रकटीकरण सार्वजनिक हितासाठी एकेकाला

होते.[८]कारण एखाद्याला आत्म्याच्या द्वारे ज्ञानाचे वचन मिळते; एखाद्याला त्याच आत्म्यानुसार विद्येचे वचन;[९]एखाद्याला त्याच आत्म्यात विश्वास; एखाद्याला त्याच एका आत्म्यात निरोगी करण्याची कृपादाने;[१०]एखाद्याला अद्भुत कार्ये करण्याची शक्ती; एखाद्याला संदेश देण्याची शक्ती; एखाद्याला आत्मे ओळखण्याची शक्ती; एखाद्याला विशेष प्रकारच्या भाषा बोलण्याची शक्ती व एखाद्याला भाषांचा अर्थ सांगण्याची शक्ती मिळते;[११]तरी ही सगळी कार्ये तोच एक आत्मा करतो, तो आपल्या इच्छेप्रमाणे एकेकाला ती वाटून देतो.

**महत्वाचे सत्य:**

देव तुम्हाला नेतृत्व करण्यासाठी पाचारण करत आहे असा जर तुमचा विश्वास असेल, त्याची सुरुवात एका चांगल्या पुढाऱ्याचा, विश्वासू, समर्पित, आनंदी अनुयायी बनून करा जो मार्गदर्शन करतो, माहिती इतरांना देतो, आणि जवाबदारी व अधिकार ह्यांचा वाटप करतो. बऱ्याच बाबतीत, नेतृत्व हे स्वाभाविकच मागे येते.

**तुमचा प्रतिसाद:**

१.कामावर, चर्चमध्ये, तुमचा समाज, कुटुंब ह्यामधील पुढारी बघा, अशा कोणाचातरी शोध घेत, जे आसपासच्या लोकांकडून सन्मान आणि जिव्हाळा ह्यांची अपेक्षा करत असतो. जर तुमच्या प्रभावाच्या वर्तुळात अशी कोणतीच व्यक्ती अस्तित्वात नसेल, तुम्ही ज्या चांगल्या पुढाऱ्यांना न्याहाळून बघता त्यांचे आत्मचरित्र वाचण्यास सुरुवात करा. ह्या प्रभावशाली लोकांच्या आयुष्यातून तुम्ही काय शिकता ते लिहून काढा.

२. घरी, चर्च, शाळेत, कामावर, समाजात आणि तुमच्या विस्तारित

कुटुंबात एक पुढारी म्हणून आलेल्या तुमच्या भूतकाळातील अनुभवावर चिंतन करा. तुम्हाला नक्की किती नेतृत्वाचे अनुभव आले हे पाहून तुम्हाला आश्चर्य वाटेल. त्या प्रत्येक अनुभवातून तुम्ही काय शिकला, त्यातील यश आणि अपयश ह्या दोघातून?

३.पुढील वर्गामध्ये तुमच्या नेतृत्वाच्या कौशल्यांना गुण द्या:(१= कमी, ५ = उच्च)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| विश्वासू | १ | २ | ३ | ४ | ५ |
| रास्त | १ | २ | ३ | ४ | ५ |
| विनम्र | १ | २ | ३ | ४ | ५ |
| चांगला ऐकणारा | १ | २ | ३ | ४ | ५ |
| खुल्या-मनाचा | १ | २ | ३ | ४ | ५ |
| कनवाळू | १ | २ | ३ | ४ | ५ |
| सुज्ञ | १ | २ | ३ | ४ | ५ |
| सर्जनशील | १ | २ | ३ | ४ | ५ |
| दूरदर्शी | १ | २ | ३ | ४ | ५ |
| परिवर्तनशील, जुळवून घेणारा | १ | २ | ३ | ४ | ५ |
| इतरांना प्रेरित करणारा | १ | २ | ३ | ४ | ५ |
| चांगले, वेळोवेळी निर्णय घेणारा | १ | २ | ३ | ४ | ५ |

४.एक वास्तविक दृष्टीने तुमचा हा तक्ता जवळच्या मित्राला अथवा मैत्रिणीला हे मूल्यमापन बघण्यास आणि त्यांच्यासोबत चर्चा करा (किंवा अनेकांना निनावीपणे हे मूल्यमापन तुमच्यासाठी करण्यास सांगा). ती क्षेत्रे जिकडे तुम्ही ३ किंवा कमी असे गुण देता, ते वाढवण्यास किंवा तुमच्या संघात जे कोणी आहेत त्यांच्यासमोर ती दुर्बलता कमी करण्यास तुम्ही काय करणार?

**अतिरिक्त अभ्यासासाठी:**

मर्विन बोवर ह्यांचे *द विल टू लिड* (बोवर, १९९७)

जाक काह्ल ह्यांचे *लीडिंग फ्रॉम द हार्ट* (काह्ल & डोनेलन, २००४)

## धडा १०: सांघिक कार्य - नेतृत्वाची गुरुकिल्ली

शास्त्रवचनाचा आणि देवाच्या चारित्र्याचा जसा आपण अभ्यास करतो, देवाला वर्तमानातील छोट्या काळासाठी असणाऱ्या “शोभेच्या” परिणामांसाठी भविष्याचा त्याग करण्यात काहीच स्वारस्य नसते. अब्राहामाच्या दिवसात त्याला त्याचे प्रेम जगाला कळवण्याची एक विशिष्ट पद्धत होती. त्यामध्ये एका मनुष्यासोबत करार होता जो त्याचा विश्वास कुटुंबाप्रत व्यक्त करायचा, आणि त्याचे वंशज जगापर्यंत पोहचायचे (उत्पत्ती १८:१८,१९). त्याने एक छोटे, महत्वाचे राष्ट्र त्याचे लोक म्हणून निवडून ठेवले. त्याने आपल्या सेवेची सुरुवात एका गावकरी समाजात केली आणि हे तर यरुश्लेमाच्या धार्मिक वातावरणापासून लांब होते, आणि त्यामध्ये अवर्णनीय कोळी समाज, जकातदार, आणि समजात जे बहिष्कृत लोक होते त्यांचा समावेश होता. मग त्याने असा संघ कसा विकसित केला

ज्याने जग बदलले आणि अजूनही आज पुढारी आणि अनुयायी ह्यांना तो प्रेरित करत आहे?

**१. प्रार्थनापूर्वक गटातील सदस्यांची निवड करा**

मागील अध्यायात तुम्ही चारित्र्य बघून आपल्या गटातील सदस्यांची निवड करण्यास सुरुवात करा. तुम्ही विश्वास ठेऊ शकता असे ते लोक आहेत का? ते प्रामाणिक, कष्टाळू, सुधारणा करून घेण्यास तयार, शिकण्यास उत्सुक, देवासोबत असणाऱ्या त्यांच्या नात्यात आवेशी, आत्म्यात उल्लासित, जेव्हा सत्य दुख पोहचवते तरीही सत्याला बिलगून राहणारे, त्यांच्या कुटुंबांना आधार देणारे, ज्या सर्वांना ते भेटतात त्यांच्याशी दयाळू आणि आदरणीय, अध्यात्मिक दृष्टीने परिपक्व, क्षमा करणारे, त्यांच्या कृतीत हिशोबी, कृपाळू आणि प्रेमळ आहेत का? ही तर अशक्य अशी पात्रतेची यादी वाटते. ह्या प्रत्येक क्षेत्रात परिपूर्ण होणे हे काही ध्येय नाही, केवळ एक प्रामाणिक मूल्यमापन जे तुम्हाला हे जाणून घेण्यास सहाय्य करेल की अपयशी ठरणारी ती क्षेत्र कोणती आहेत आणि ज्यांच्यातून त्यांना बाहेर ठेवता येऊ शकते.

त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न करा- त्यांची गोष्ट, त्यांची दुर्बलता आणि ताकत, त्यांचे कौशल्य आणि स्वारस्य, ते कसे संधान साधतात, आणि त्यांना सर्वात अधिक आवडणाऱ्या गोष्टी, एकाच मोठ्या असणाऱ्या मुलाखतीत नाही, पण जसा वेळ पुढे जातो जसे त्यांच्याशी असणारे तुमचे नाते विकसित होत जाते.

येशू त्या रस्त्यावर असताना आपल्या शिष्यांच्या सोबत त्याने आपले आयुष्य वाटून घेतले- चालत राहून, खाण्याने, आणि त्यांच्यात

झोप घेऊन, सर्व काळ त्यांना शिकवण देणाऱ्या क्षणाचा फायदा घेत जे त्यांना वाढण्याचे आवाहन देत आणि व्यक्ती म्हणून विकास होण्यास मदत करत, मग ते गालीलच्या समुद्रकिनाऱ्यावर असो, तसेच शोमरोनात देखील, किंवा यरूशलेम मधील मंदिराच्या दरबारात. त्याचा वर्ग म्हणजे संपूर्ण देश होता. ते लोक त्यांच्या स्वर्गीय पित्यासोबत आपले नाते प्रार्थना आणि देवाच्या लिखित वचनाच्या ज्ञानाने कसे खोलवर स्थिरावू शकतात ह्याचा देखील त्याने नमुना दिला.

तुमच्यापेक्षा ज्यांची व्यक्तिमत्वे, शक्ती, दुर्बलता, आणि कौशल्ये हे वेगळे आहेत ह्याचा शोध प्रार्थनापूर्वक करा. ह्याला हेतुपुरेसर काम करण्याची गरज आहे. आपल्यासारखे बोलणारे, विचार करणारे, आणि कृती करणारे ह्यांची निवड करण्याचा आपल्याला इतका मोह होतो, जे लोक त्याचा कार्याचा आनंद घेतात, आणि ज्यांना समान स्वारस्य आणि आपल्यासारखी सांस्कृतिक पार्श्वभूमी असते. पण आपण एक संस्था, एक “शरीर” बांधत आहोत, आणि त्यात विविधतेची आवश्यकता असते (इफिसकरास पत्र ४:१६).

टिपा

शून्यातून तुमचा संघ विकसित करण्याची कदाचित तुम्हाला संधी मिळणार नाही. तुम्हाला असा संघ लाभला असेल जो कोणीतरी एकत्र जोडला होता, पण सुरुवात करण्याचा क्षण समान आहे, एकमेकांच्या समोर असणारे नातेसंबंध.

लूक ६:१२-१६ आपणास सांगते की येशूने त्याच्यासोबत असणाऱ्या बारा शिष्यांची निवड करण्यापूर्वी ती रात्र प्रार्थनेत घालवली. ह्यात काही शंका नाही की ज्यांनी ऐकले त्यात तो त्यांना बघत होता, पण शेवटल्या निवडीसाठी त्याला देवाचे सुज्ञान आणि हेतू ह्यांची गरज होती. हेच ते लोक असतील

ज्यांच्यासोबत तुम्ही आपला नेतृत्वाचा प्रवास करणार आहात. त्यातील काहींना ज्यांना देवाने निवडलेले असते ते पाहून तुम्हाला आश्चर्य वाटेल. देवाच्या यहुदाच्या निवडीबद्दल येशू आश्चर्यचकित झाला असेल का ह्याचे मला नवल वाटते, आणि जरा असेल, मग यहुदाच्या हाती तो बटवा देण्यासाठी त्याला किती विश्वास लागला असावा?

**२.संघाला एकत्र करा**

एकदा संघाचे “आधारस्तंभ” व्यवस्थित रचले गेले तर, एक समान हेतू असणाऱ्या संघटीत गटाचा विकास करण्यास सुरुवात होते. ह्याला प्रथम आवश्यकता असते, की पुढारी म्हणून, देवाने जो दृष्टांत तुम्हाला एकदा संघाचे “आधारस्तंभ” व्यवस्थित रचले गेले तर, एक समान हेतू असणाऱ्या संघटीत गटाचा विकास करण्यास दिला तो व्यवस्थित आकार घेण्यास सुरुवात करा. तो दृष्टांत इतरांना सांगणे अशा रीतीने की प्रत्येकाकडे समान चित्र असेल हे एकदा संघाचे “आधारस्तंभ” व्यवस्थित रचले गेले तर, एक समान हेतू असणाऱ्या संघटीत गटाचा विकास करण्यास आवाहनात्मक आणि आवश्यक आहे. तुम्हाला

तुमच्या गटातील सदस्य त्या आंधळ्या लोकांसारखे नको ज्यांनी व्यक्तीशः हत्तीचे वर्णन एक खांब, एक दोर, एक झाडाची फांदी, एक पंखा, एक भिंत, एक पाईप म्हणून त्यांच्या दृष्टिकोनावर आधारित असे केले. जितक्या सोप्या पदात त्या दृष्टांताचे प्रदर्शन होऊ शकते, तितके अधिक तुमच्या संघातील सदस्यांना ह्याची समज चांगल्या रीतीने होईल, आणि तो हेतू सिद्ध करण्यासाठी त्या गटाला एकवटण्याची शक्यता जास्त असेल. तो दृष्टांत सोपा करणे ही काही सहज बाब नाही आणि छोटी देखील नाही.त्यांना तुमचा दृष्टांत सांगितल्यावर, तुमच्या संघातील सदस्यांना त्याचा अर्थ काय आहे तो विचारा. त्यांना कळते हे गृहीत धरू नका.

दुसरी पायरी म्हणजे तुम्ही एक संघ ह्या नात्याने तो दृष्टांत कसा सिद्ध करू शकता ह्याची व्याख्या देणे. जोपर्यंत देव त्याची योजना तुम्हाला प्रगट करत नाही, त्या पद्धतीवर खूप मोठ्या प्रमाणावर एकत्र होऊन चर्चा करणे हा उत्तम सांघिक सराव होईल ज्यामुळे ऐक्य, स्पष्टता, उत्साह आणि समर्पकता तयार होऊ शकतात. मला तुम्हाला एक उदाहरण देऊ द्या. तुमचा दृष्टांत हा “स्त्रियांचा एक समाज असेल जे देवासोबत असणाऱ्या त्यांच्या चालचलणुकीत एकमेकांवर प्रेम करतात, उत्तेजन देतात आणि एकमेकांना आधार देतात,” आणि “कसे” वेगळे व्हायचे हे “देवाचे वचन, प्रार्थना सहभागीता, सामुदायिक आराधना, आणि एकमेकांची सेवा करणे ह्याने समजले जाते.”

### ३. एकमेकांची सेवा करणे

एक देह, एक संघ, ऐक्याने हेतुनिशी , प्रेमपूर्वक, एकमेकांना उत्तेजन देऊन आपण जेव्हा काम करतो तेव्हाच आपण येशुसारखे बनण्याचा प्रयत्न करतो (योहान १७:२१). मला हे व्यक्तीशः समजले आहे की संघातील सभासदांच्या मध्ये स्पर्धेची भावना तयार करण्यात तात्पुरते

परिणाम मिळतात, पण शेवटी त्याचा परिणाम हेवा, गर्व, अविश्वास, आणि शंका हे उत्पन्न करतात, आणि त्यांना संस्थेचा जो समान दृष्टांत आहे त्यापासून त्यांचे लक्ष विचलित करतात. त्याऐवजी, संघातील सदस्यांना एकमेकांना आधार देण्यास आणि उत्तेजन देण्यास उत्तेजन द्या, जे संघर्ष करत आहेत त्यांना सहाय्य करा, प्रेम, ऐक्य आणि शिक्षण हे एकमेकांमध्ये पसरवा. उदाहरणार्थ तुमच्याकडे जर असंख्य छोटे गट असले, आणि एक टिकाव धरून राहतो तर दुसरा क्षय पावत असतो, जो "टिकाव" धरून राहतो त्याच्या संघ नेत्याला "क्षय" पावणाऱ्या नेत्याशी समोरासमोर येऊन कल्पना वाटून घेण्यास सांगा. दुसरी कल्पना म्हणजे नियमितपणे सांघिक सभा आयोजित करा जिकडे संघाचे पुढारी त्यांचे यश आणि अपयश वाटून घेतात आणि जे मुद्दे त्यांच्यासमोर आहेत त्यावर चर्चा करण्यासाठी उपाय आयोजित करतात. **एकमेकांशी स्पर्धा करण्याच्या ऐवजी, स्वतःसाठी आणि त्यांच्या गटासाठी ध्येय निश्चित करण्याचे त्यांना उत्तेजन द्या, पण ते तर संस्थेशी जुळू शकणारे ध्येय असणे गरजेचे आहे.**

कृती, शब्द, आणि विचार ह्यामध्ये एकमेकांच्या प्रती आदर व्यक्त करण्यात एक नमुना प्रस्तुत करा. येशूकडे व्यक्तीसाठी नेहमी वेळ असायचा, विशेषतः जे दुख करत, आजारी अथवा मानसिक दृष्टीने जखमी होते. सेवेच्या तीन वर्षाच्या कालावधीत त्याच्याकडे अशक्य असे वाटणारे आणि पेलणारे असे मोठे सेवाकार्य होते, पण त्याने कधीच घाई केली नाही. त्याचे रहस्य म्हणजे दैनंदिन, सातत्यपूर्ण, विश्वासू आणि विश्वासाने- युक्त पित्याचे आज्ञापालन करणे (योहान ५:१९).

### ४.एक "सुदृढ" संस्था राखून ठेवणे

अ. वयक्तिक वाढ आणि शिक्षण ह्याला उत्तेजन द्या.

तुम्ही एक पुढारी ह्या नात्याने सर्वात महत्वाची अशी एक गोष्ट जी करू शकता ती म्हणजे तुमच्या संघातील सदस्यांची वयक्तिक वाढ आणि विकास ह्यास उत्तेजन द्या. त्यांच्या जीवनात देवाचे पाचारण काय आहे हे शोधण्यास त्यांची मदत करा त्यामध्ये तुम्ही आपले आयुष्य त्यांच्यासोबत वाटून घ्या, आणि त्यात अशा प्रकारे तुमच्या बाजूने असुरक्षितता, प्रामाणिकपणा, आणि विनम्रता ह्यांचा समावेश असतो. त्यांच्यासाठी विश्वासपूर्वक प्रार्थना करा. त्यांच्या आशा आणि स्वप्न हे काळजीपूर्वक ऐका, आणि त्यांना तुमच्या शक्तीत असेल तेवढे त्यांचे सहाय्य करा अशी व्यक्ती बनण्यास जी देवाची इच्छा आहे त्यांनी बनावे. जर ते विश्वासू आणि जवाबदार असले, त्यांच्यावर अशी कामगिरी सोपवा ज्यामुळे त्यांची क्षमता ताणली जाईल. येशू ज्या गावांमध्ये जात होता तिकडे त्याने बहात्तर शिष्य पाठवले, काय घेऊन जायचे ह्याविषयी विशिष्ट सूचना देऊन, काय बोलावे आणि काय करावे ह्याविषयी स्पष्ट सूचना देऊन. त्यांच्या स्वतःहून जाण्यास ते सुसज्ज होते का, आजारी लोकांना बरे करत आणि सुवार्तेची घोषणा करत? निश्चितच ते तर असे अध्यात्मिक महापुरुष नव्हते, जसे नंतरच्या घटनामध्ये दिसून येते, पण देवाने त्यानं ती शक्ती प्रदान केल्याने, त्यांनी जे काही देवाने करण्यास पाठवले ते केले आणि त्याचे परिणाम पाहिले (लुक १०: १-२०)!

एकदा त्यांना प्रशिक्षण दिल्यावर आणि तुमच्या संघाचा जेव्हा ते अविभाज्य घटक बनतात तेव्हा “तुमच्या आश्रयाखाली ठेवण्याचा” मोह होतोच. ती जी ओढ आहे त्याचा प्रतिकार करा! देवाने जे काम करण्यास त्यांना पाचारण देऊन सुसज्ज केले त्याप्रती त्यांना मोकळे करा, आणि इतरांनी ती जागा भरून काढण्यासाठी देवावर विश्वास ठेवा. त्या “प्रवाहाशिवाय” तुमचा संघ हा बंडखोर किशोरवयीन

मुलांसारखा होऊ शकतो, जे सुसज्ज तयार आहेत पण जाण्यासाठी त्यांच्याकडे ठिकाणच नाही.

ब. सांघिक सभांच्या मोलाला महत्व द्या व मोठे स्वरूप द्या.

सांघिक सभा या हेतुपुरेसर, प्रेमपूर्वक, सर्वांसाठी शिकण्याच्या संधी देणाऱ्या अशा असाव्यात. सभेच्या पूर्वी, आपण अभ्यास करू शकतो अशा काही विषयांची यादी तयार करा. प्रत्येक सभेची सुरुवात आणि शेवट हा प्रार्थनेने करा. सभेच्या सुरुवातीला महत्वाची माहिती संकलित करा जेणेकरून प्रश्न आणि उत्तर ह्यासाठी पुरेसा वेळ मिळेल. प्रत्येक विषयासाठी किती वेळ लागेल त्याचा अंदाज घ्या ज्यामधून तुम्हाला सभा किती काळ चालणार आहे ह्याचा अंदाज येईल जर ते हजर असणाऱ्या लोकांसाठी महत्वाचे असेल तर. जर संघातील सदस्यांचे अहवाल हे त्या योजनेच्या अंतर्गत असतील, प्रत्येक अहवालासाठी किती वेळ लागणार हे सूचित करा, आणि अपेक्षित घटक जो आहे त्याविषयी मार्गदर्शिका तयार करा. कदाचित सभेमध्ये फक्त महत्वाचे मुद्दे जे आले त्यांना हाताळा आणि तपशीलवार अहवाल हे लेखी स्वरुपात द्या.

सांघिक भेट हे मोल्यवान आहे. त्याचा वापर योग्य रीतीने प्रेरणा मिळावी, दिशा अथवा भर देण्यात बदल व्हावा म्हणून, आणि महत्वाची माहिती सर्वांना देण्यासाठी करा. व्यक्तींसाठी सुधारणेचे शब्द नेहमी खाजगी स्वरूपाने हाताळणे आवश्यक आहे. एक पुढारी म्हणून संघातील सदस्यांच्या मध्ये असणाऱ्या आपसातील नात्यातील समस्या ओळखण्यासाठी देखील ह्या सांघिक सभा मोल्यवान आहेत.

अशा काही गटांकडे पहा जे काही संघातील सदस्यांना वगळतात आणि असे काही कार्य करा जे संघातील सदस्यांना त्यांच्यापेक्षा वेगळ्या भूमिका असणाऱ्या लोकांशी नाते ठेवण्यास उत्तेजन देतील.

क. एकत्र वेळ घालवा.

एकमेकांसोबत राहण्यात आनंद माना- वेळ जशी आहे तसे आयुष्य एकमेकांसोबत वाटून घ्या.

तसे करण्यामध्ये देवाने तुम्हाला अधिक सर्जनशील पद्धती दाखवाव्यात ह्याची मागणी करा- घरगुती कामे वाटून घेणे, एकत्र भोजनास अथवा कॉफी पिण्यास जाणे. ह्या ठिकाणी नातेसंबंध अडचणीत येतात. संघ स्थापन करण्यासाठी एकमेकांच्या सोबत सहभागीता घेणे खूप महत्वाचे आहे, कोणतेच काम पूर्ण होत नाही म्हणून वाया घालवलेला वेळ नाही. एकमेकांच्या गोष्टी जशा तुम्ही ऐकता तसे सोबत हसणे व रडणे हे शिका.

ड. दक्ष राहा.

"द्राक्षीच्या मळ्यांची नासधूस करणाऱ्या खोकडांपासून "सावध असा, ते छोटे अंतरखाजगी त्रास जे जसा वेळ सरतो तशा वाढत जातात (गीतरत्न २:१५). पहिल्यांदा प्रार्थना आणि सुज्ञान देऊन त्यांना सांभाळा. त्यांना हाताळण्याची वेळ ही महत्वाची असते, आणि तोच दृष्टीकोन असतो. "L सोन्याचे कर्णभूषण आणि उत्कृष्ट सोन्याचा दागिना, तसा सुज्ञ उपदेशक लक्ष देणाऱ्या कानाला आहे." (नितीसुत्रे २५:१२). तुमचे शब्द दुखावतील अथवा सोन्याची आभूषणे बनतील हे वेळेवर निश्चितच अवलंबून आहे. नितीसुत्रे ह्यात संबंधाविषयी सुज्ञान देणारे सुंदर रत्न आहेत. रोज एक किंवा दोन ह्यावर मनन करण्यास वेळ घालवा आणि तुम्ही एक खोल साठा तयार कराल ज्यामधून तुम्हाला ती दूरदृष्टी प्राप्त होईल.

**६. मानसिक ताणाने भग्न होण्याचे टाळा**

सेवेतील सर्वात एक मोठा खाचखळगा म्हणजे भावनिक आणि अध्यात्मिक दृष्टीने ताण घेऊन भग्न होणे. गरजा ह्या वाढत्या

क्रमाच्या असू शकतात आणि लोकांची मागण्या ह्या व्याप्त करून टाकणाऱ्या आहेत. जर तुम्ही काळजी घेतली नाही तर जगाचे ओझे तुमच्याच खांद्यावर आहे असे तुम्हाला वाटेल आणि तुमचा श्वास तपासून घेण्यास जर तुम्ही थांबला, तुमच्याभोवती ते कोलमडून येईल. ही शत्रूची एक लबाडी असून गर्व आहे. कार्य देवाचे आहे आणि लोक त्याचे आहेत, तुमचे नाहीत. येशूचे आयुष्य तपासून बघा. असे काही प्रसंग होते जेव्हा तो स्वतः मागे हटला, काही प्रसंगी शिष्यांच्या सोबत मागे हटला, आणि असे काही प्रसंग होते जेव्हा लोकसमुदायाने त्याचे लक्ष मिळावे म्हणून भिक मागितली आणि तो तसाच निघून गेला. जर कोणाला ह्या वेळेचा तणाव जाणवला असेल, तो येशूच आहे, ज्याच्याकडे तीन वर्षे होती आणि ह्या समयात त्याला जग बदलून टाकण्यासाठी बारा लोकांना तयार करून सुसज्ज करणे हे काम हाती होते. तरीही तयारी करण्यास, विश्राम घेनास, प्रार्थना व मनन करण्यास, आणि समोरासमोर नातेसंबंध विकसित करण्यास त्याने वेळ घेतला.

**पाठांतर करा:**

**योहान १३:३५** - तुमची एकमेकांवर प्रीती असली म्हणजे त्यावरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहात.

**फिलीप्पेकरास पत्र २:२-४** - [२] तर तुम्ही समचित्त व्हा, म्हणजे एकमेकांवर सारखीच प्रीती करा आणि एकजीव होऊन एकचित्त व्हा; अशा प्रकारे माझा आनंद पूर्ण करा. [३]तट पाडण्याच्या अथवा पोकळ डौल मिरवण्याच्या बुद्धीने काहीही करू नका, तर लीनतेने एकमेकांना आपल्यापेक्षा श्रेष्ठ माना. [४]तुम्ही कोणीही आपलेच हित पाहू नका, तर दुसऱ्यांचेही पाहा

**महत्वाचे सत्य:**

एक संघ तयार करणे, विभिन्न प्रकारचे लोक व त्यांचा “समूह” तयार करणे जो हेतुनिशी एकत्र येऊन प्रेम व्यक्त करतो तेच खऱ्या नेतृत्वाचे सार आहे.

**तुमचा प्रतिसाद:**

१.तुम्ही जर एका “स्वप्नातील संघ” घेऊ शकाल, तुमचा दृष्टांत सिद्ध करण्यासाठी, तुम्ही कोणाची व का निवड कराल?

२.तुम्ही ज्या गटाचे आता भाग आहात त्यात कोणती आवाहने तुम्हाला दिसतात? त्या गटाच्या दुर्बलता आणि शक्ती काय आहेत? तुम्हाला वाटेल की हे प्रश्न अवघड आहेत, पण पुढार्यांनी उत्तर देण्यासाठी ते आवश्यक आहेत.

**अतिरिक्त अभ्यासासाठी:**

जिम कोलींस ह्यांचे *गुड टू ग्रेट* (कोलींस, २००१)

पाटरिक लेनसियोनी ह्यांचे *द फाईव डीसफंकशंस ऑफ अ टीम* (लेनसियोनी, २००२)

पीटर सेंज ह्यांचे *द फिफ्थ डिसिप्लीन* (सेंज, २००६)



## धडा ११: अनुसरण करण्यास पाचारण

“माझे अनुसरण करा.” गालीलच्या समुद्र खडकाळ किनारी, येशूने हे शब्द प्रथम दोन कोळ्याशी बोलले जे आपले जाळे दुरुस्त करत होते; त्यांचा ताबडतोब प्रतिसाद म्हणजे आपली जाळे टाकून देऊन त्याच्या मागे जाणे. आज देखील हे शब्द तो त्याच्या शिष्यांना सांगत आहे. ““भिऊ नको; कारण मी तुला सोडवले आहे; मी तुला तुझ्या नावाने हाक मारली आहे; तू माझा आहेस” (यशया ४३:१). हे तर तुमचे आयुष्यभरासाठी असणारे प्राथमिक स्वरूपाचे पाचारण आहे, विश्वाच्या निर्मात्याच्या सोबत एक जवळीक साधने आणि चालणे ज्याला तुमची काळजी आहे आणि तुमच्या जीवनाच्या परिस्थितीची, तुमचे हृदय तो ऐकतो, तुमच्या डोक्यावरचे केस तो मोजतो, आणि रोज एक सांत्वन, सुज्ञान आणि उत्तेजन देऊ करतो (लूक १२:७).

पण तो आपल्यातील प्रत्येकाला एक दुय्यम, अधिक विशिष्ट पाचारण राज्याच्या हेतूसाठी देतो, एक पाचारण जे आपल्या वयक्तिक वरदाने, व्यक्तिमत्वे आणि परिस्थिती ह्यासाठी तयार करण्यात आलेले असते. काही लोकांसाठी ते पाचारण इतके मजबूत आहे आणि कामगिरी इतकी मोठी, की ती पूर्ण करण्यासाठी आयुष्यभराचा वेळ लागू शकतो. विलियम विलबरफोर्स ज्याने इंग्लंडमधील गुलामगिरीची कायदेशीर बाब हाताळली त्यांना असे आयुष्यभराचे पाचारण होते, जसे प्रेषित पौलाला होते.

माझा अनुभव आहे की बहुतांशी स्त्रियांसाठी हे पाचारण आपल्या जीवनातील विभिन्न ऋतुंमध्ये बदलते. माझ्यासाठी वयक्तिक रीतीने, आयुष्याचे ऋतू हे विशिष्ट होते: विद्यार्थी, तरुण पत्नी, आई, जगिक कारकीर्द, सेवाकार्य, आणि सेवानिवृत्ती. प्रत्येक ऋतूत, मला येशूचे अनुसरण करण्याचे आमंत्रण लाभले, पण ज्या ठिकाणी तो मला घेऊन गेला, आणि मला ज्या कार्यांमध्ये सहभागी होण्यास त्याने दिशा दाखवली ते वेगळे होते. मला काय शिकायचे होते ते म्हणजे रोज, प्रत्येक ऋतूत, माझे प्राथमिक ध्येय हे “ माझा वधस्तंभ उचलून त्याचे अनुसरण करणे हा होता.” (मार्क ८:३४)

त्याचे पाचारण ऐकून व त्यास प्रतिसाद देऊन नेहमी त्याच्या पावलांवर पाऊल ठेवून चालले असे म्हणण्यात मी नाटक करणार नाही. सुरुवातीच्या वर्षात मी लोकांना संतुष्ट करणारी होते, असा विचार करत की मी जर लोकांना संतुष्ट केले, तर मी त्याला संतुष्ट करत आहे. पण ते कठीण बनले जेव्हा मला समजले की एका व्यक्तीला खुश करणे म्हणजे दुसऱ्या व्यक्तीला नाखूष करणे होते!

जेव्हा मला शेवटी हे समजले की एकाच व्यक्तीच्या श्रोत्यासमोर मला संपूर्ण जीवन जगायचे आहे, आयुष्याच्या गाठी आणि क्लिष्टता सुटत गेल्या आणि ज्याने मला अनुसरण करण्यास पाचारण दिले आहे त्यासाठी हे सोपे आज्ञापालन बनले.

**१.पाचारण काय आहे?**

अनेक लोक एक विशिष्ट पाचारण असण्याबाबत अथवा "व्यवसाय" बद्दल बोलतात (लाटिन शब्द "पाचारण असणे" ह्यामधून घेतलेला), पण कबूल करणार नाही की जर "पाचारण" असले तर ते "पाचारण देणारा" पण असतो. आपण ख्रिस्ती ह्या नात्याने त्या विश्वासात खूप वेगळे आणि अलौकिक असे आहोत. त्या "पाचारणात" ऑस गिनीस पाचारणाची व्याख्या अशी देतात "ते सत्य की देव आपल्याला स्वतःच्या प्रती बोलावतो इतक्या ठाम आणि निर्णयात्मक रीतीने की आपण जे काही आहोत, आपण जे काही करतो, आणि जे काही आपल्याकडे आहे ते विशेष भक्तीमध्ये गुंतवलेले आहे आणि हालचाल करण्याच्या प्रयत्नात तो त्याचा उपदेश आणि सभा ह्याप्रती प्रतिसाद असतो"(गिनीज, २००३, पृ. ४). त्याचा अर्थ घरी बसून मी संगणकावर काही सॉफटवेअर तयार करत असेल, घरी असणाऱ्या आजारी लेकराला सांत्वन देत असो, मंडळीमध्ये एका भरकटलेल्या स्त्रीला समुपदेशन करत असो, किंवा माझ्या पतीसोबत बाहेर भोजनास जात असे, ज्याने मला पाचारण केले त्यासाठी मी हे करत आहे. **"**आणि बोलणे किंवा करणे जे काही तुम्ही कराल**,** ते सर्व प्रभू येशूच्या नावाने करा**;** आणि त्याच्या द्वारे देव जो पिता त्याची उपकारस्तुती करा.**"** (कलस्सेकरास पत्र ३:१७). माझ्यासोबत त्याला नेण्यास मला जर वाईट वाटत असेल, तर मी जात नाही. मी जर जे बोलायचे नाही असे जर बोलले असेल, त्याने माझे

ऐकले हे मला ठाऊक आहे, आणि लगेच क्षमा मागण्याची मला गरज असते. ती मला कधीच सोडणार नाही हे म्हणाला आहे, म्हणून तो पाहतो आणि मी जे काही बोलते, करते आणि विचार करते हे त्याला ठाऊक आहे.

अनेक लोक त्या मताखाली असतात की सेवेसाठी झालेले पाचारण हे एक "उच्च" पाचारण आहे एखाद्या व्यक्तीला व्यापारासाठी मिळते त्यापेक्षा अधिक आहे.

माझ्या आयुष्यात दोन्ही पाचारणाचा अनुभव मी घेतला. दोन मुले प्राथमिक शाळेत जाणारी त्यांची "घरी राहणारी" आई ह्या नात्याने,मी माझ्या उद्योगाच्या विश्वात परत जाण्याचे पाचारण देव देत आहे हे जाणवले. माझ्या पतीच्या परवानगीने, मी त्या कल्पनेच्या मागे धावले आणि एका महिन्यातच, दहा वर्षे ह्या कामापासून वेगळे राहून, मी त्याच नोकरीमध्ये त्याच कंपनीमध्ये गेले जे मी दहा वर्षांच्या पूर्वी सोडले होते. तीन महिन्यातच कंपनीने लोकांना कामावर नव्याने घेण्याचे थांबवले, पण देवा माझ्या हृदयाशी योग्य समयी बोलला. मी अठरा वर्षे तिकडे राहिले, आणि मग, अत्यंत स्पष्टपणे, मला ठाऊक होते की जाण्याचा समय आला आहे.
तीताला पत्र २:३,४ द्वारे, मला माहित होते की देव स्त्रियांची सेवा करण्याचे पाचारण मला करत आहे. त्या दरम्यान, मी आमच्या मंडळीत स्त्रियांच्या मंडळीची अध्यक्ष बनले. वयक्तिक अनुभवाने की सेवेसाठी असणारे पाचारण हे उद्योगासाठी असणाऱ्या पाचारणापेक्षा अधिक "अध्यात्मिक" अथवा महत्वाचे नसते. प्रश्न असतो आपण त्याच्या पाचारणाच्या प्रती आज्ञापालन करून त्याचे ऐकतो अथवा नाही.

तुमचे पाचारण तुम्ही कसे शोधून काढता? ह्याचे सोपे उत्तर

म्हणजे ज्याने तुम्हाला पाचारण केले त्याच्याशी एक वयक्तिक नातेसंबंध विकसित करणे. त्यानंतर, मग संयम आणि आज्ञापालन असतात. तुम्ही कोण आहात हे देवाने तुम्हाला प्रगट करावे अशी मागणी करा, तुम्ही का व कसे अलौकिक आहात ते त्याने व्यक्त करावे. त्याला उत्तर देण्यास आवडणारा हा प्रश्न आहे!

**२.येशूचे अनुसरण करण्यातील अडखळणे**

अनेकांसाठी, तुम्ही काय करावे हे जाणून घ्यावे हा काही मुद्दा नाही, तर तसे करणे हा मुद्दा आहे! जेव्हा येशू पाचारण देतो तेव्हा त्याचे अनुसरण करण्या तुम्हाला काय थांबवते?

अ. काही म्हणतात की तो जे काही करण्यास सांगतो त्याचा काहीच अर्थ नसतो; ते वैचारिक आणि ग्राह्य देखील नसते. देव हा सुसंगतीचा देव आहे, पण तो दिसणाऱ्या भौतिक जगाच्या पलीकडे पाहतो आणि आता ज्यातून आपल्याला काहीच अर्थ अवगत होत नाही तो आपल्या मर्यादित दृष्टांताचा परिणाम आहे. देवाने अब्राहामाला त्याचा देश सोडून अशा ठिकाणी जाण्यास सांगितले ज्याला अजून नाव देखील प्राप्त नव्हते (उत्पत्ती १२:१). त्याने गिदोनाला हजारो सैनिक घरी पाठवण्यास सांगितले आणि एका मोठ्या बलाढ्य सेनेशी केवळ तीनशे पुरुषांसोबत लढा देण्यास सांगितले (शास्ते ७:१-२५). येशूने लाजारला मरण सहन करू दिले, केवळ तीन दिवसांच्या नंतर त्याला मेलेल्यातून उठवण्यासाठी (योहान ११:१-४३). देवाने अशा मनुष्याची निवड केली ज्याने ख्रिस्ती लोकांचा छळ करून त्यांना ठार मारले परराष्ट्रीय लोकांच्याप्रत त्याला हा सुवार्तेचा प्रयत्न घेऊन जायचा होता (प्रेषित ९:१५). तो शक्ती

असलेल्यांना नव्हे, तर दुर्बलांची निवड त्याचे हेतू सिद्ध करण्यासाठी करतो(१ करिंथकरास पत्र १:२७). शेवटी, विश्वासाची ही बाब असते. तो मला खरच पाचारण देत आहे ह्यावर माझा विश्वास आहे का, आणि ज्याने “[माझ्यामध्ये] चांगल्या कामाची सुरुवात केली, तो येशूच्या येण्याच्या दिवशी ते पूर्णतेस नेईल का?” (फिलीप्पेकरास पत्र १:६)

ब. काही लोक म्हणतात तो जे काही करण्यास सांगतो ते खूप कठीण असते. ते बरोबर आहेत. शिष्यत्व पत्करण्यासाठी ती किमत मोजावी लागते. सोप्या प्रसंगी तुम्ही स्वतःच्या दृष्टीने निवड करण्याचा अधिकार ते देतात. कठीण समयी तुम्हाला सर्व गोष्टींची किमत मोजावी लागेल, कदाचित तुमचे आयुष्य देखील, पण शेवटी, सनातन प्रतिफळ त्या किमतीच्या मोलाचे ठरेल (इब्री ११:६).

क. मी जे काही विचार करते ते देवापासून आहे अथवा माझी स्वतःची कल्पना शक्ती आहे

टिपा

टिपा

हे मी कसे ओळखू शकते? एक परीक्षा म्हणजे देवाचा दृष्टांत त्याचे गौरव करेल आणि तय्च्या राज्याची बढती व्हावी ह्याप्रती प्रयत्न करेल; तुमच्या स्वतःच्या कल्पना अधिक दृष्टीने तुमच्या स्वतःचे गौरव करतील (इब्री ११).

डदेवाची वाणी कशी ऐकावी व ओळखावी हे मला ठाऊक नाही. मी जे काही करतो ते परिस्थितीच्या अधीन करावे हे सोपे नाही का? योहान १०:२७ मध्ये येशूने म्हंटले,"माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात" तुम्ही जर त्याचे मेंढरू असाल, तर त्याची वाणी ऐकाल. ज्या अनेक वाण्या तुमच्या कानी पडत असतात त्यामधून त्याची वाणी तुम्ही ऐकू शकाल त्यात फरक करू शकाल किंवा नाही हा प्रश्न आहे जसे एखादे बालक आपल्या आईचा आवाज ओळखते कारण तो त्याच्यासाठी ओळखीचा असतो, आपण देखील आपल्या पित्याची वाणी ओळखू शकतो त्याच्यासोबत वेळ घालावण्याने, त्याच्या वचनाचे वाचन करून जेणेकरून त्याचे चारित्र्य आपणास समजते, आणि त्याच्यासोबत आपण नातेसंबंध विकसित करू शकतो. जेव्हा आपण अशी वाणी ऐकतो जी देवाच्या वचनाच्या विरुद्ध असते, तेव्हा त्याची वाणी ती नाही हे आपणास समजते.

[11]परमेश्वर म्हणतो, तुमच्याविषयी माझ्या

मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हांला तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत. [१२]तेव्हा तुम्ही माझा धावा कराल, तुम्ही जाऊन माझी प्रार्थना कराल व मी तुमचे ऐकेन. [१३] तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवेभावे माझ्या शोधास लागाल, तेव्हा मी तुम्हांला पावेन.

[१४] परमेश्वर म्हणतो, मी तुम्हांला पावल्यावर तुमचा बंदिवास उलटवीन आणि सर्व लोकांत व ज्या स्थळी मी तुम्हांला हाकून लावले आहे तेथून तुम्हांला एकत्र करीन, असे परमेश्वर म्हणतो; आणि ज्या स्थळाहून मी तुम्हांला पकडून न्यायला लावले त्या स्थळी तुम्हांला परत आणीन. (यिर्मया २९:११-१४).

माझा विश्वास आहे की देवाचे पाचारण हे अचूक असते आणि त्याकडे सहज दुर्लक्ष करता येत नाही. त्याची अभिवचने हस्तगत करा की तुम्ही त्याची मेंढरे आहात आणि तुम्हाला त्याची वाणी ऐकू येईल.

**३. पाचारणाला उत्तर देणे**

अ.येशूचे अनुसरण करणे ही आयुष्यभराची निवड आणि दैनंदिन घेण्यात येणारा निश्चय आहे. रोज सकाळी त्याचे अनुसरण करण्याची निवड मला करायचची आहे. त्या दिवशी मी कोणतेच आवाहन सहन करणार नाही ज्यासाठी त्याने मला तयार केले नाही ह्यासाठी मला त्याचे आभार मानायचे आहेत, आणि दिवसभर त्याचे सान्निध्य माझ्यासोबत आहे ह्याची जाणीव त्याने मला करून द्यावी असे मी त्याला विनंती करतो. मग जसा दिवस पुढे जातो त्याची इच्छा त्याने मला प्रगट करावी ह्यासाठी मी त्याच्यावर भरवसा ठेवतो.

ब. येशूच्या पाचारणाचे अनुसरण करणे आणि त्याने मला जी वरदाने दिली त्याचा वापर करणे त्याच्या राज्यासाठी हे कधीच कंटाळवाणे वाटत नाही. ती कामगिरी स्वतः विचार न करण्यासारखी वाटेल,

पण त्याचे महत्व आहे कारण मी ते त्याच्यासाठी करत आहे. "[२३]आणि जे काही तुम्ही करता ते माणसांसाठी म्हणून करू नका तर प्रभूसाठी म्हणून जिवेभावे करा. [२४]प्रभूपासून वतनरूप प्रतिफळ तुम्हांला मिळेल हे तुम्हांला माहीत आहे. प्रभू ख्रिस्ताची चाकरी करत जा." (कलस्सेकरास पत्र ३:२३-२४). मला बंधू लावरेंस ह्यांची आठवण होते  जे डिश धुवत असताना "देवाचे सान्निध्य" कसे आचरणात आणायचे हे ते शिकले. आपण जे काही काम करतो त्याद्वारे कोणीतरी ख्रिस्ताकडे येते अथवा किंवा आपण केवळ तो समतोल राखत आहोत, जर ते त्याच्याप्रती असणार्या आज्ञापालनाने होते, दोघांना त्याचे प्रतिफळ मिळते. ती कामगिरी काहीही असो त्याची फिकीर नसते.

क. येशूचे अनुसरण करण्यात वेळ महत्वाचा असतो. जेव्हा येशू आपणास त्याचे अनुसरण करण्याचे पाचारण देतो, आपण लगेच आज्ञापालन करावे अशा सूचना तो देऊ शकतो किंवा भविष्यात आपण काय करावे ह्यासाठी आपली हृदये खुली करू शकतो. आता काहीतरी करण्यास तो सांगत आहे हे गृहीत धरु नका, तर त्याचा समय जो आहे त्याची वाट पाहून कृती करा (योहान ७:३-१०).अनेकदा मला वाटते की मी इस्राएल लोकांप्रमाणे असावे जे दिवसा मेघस्तंभ आणि रात्री अग्निस्तंभ ह्यांचे अनुसरण करत होते. ते इतके स्पष्ट आणि सोपे वाटते, पण मग मी स्वतःला ह्याची आठवण करून देते की माझ्या मध्ये पवित्र आत्मा आहे जो मला दिशा दाखवतो व मार्गदर्शन करतो.

ड. येशूचे अनुसरण करणे ह्याचा अर्थ आपल्याभोवती जे लोक आहेत त्यांच्या गरजा आणि मागण्या ह्यांना प्रतिसाद देणे असा होत नाही.आपण जर विश्वास ठेवत असू तर प्रत्येक गरज आणि मागणी

ह्याला प्रतिसाद आपण दिला पाहिजे, आपण स्वतःला सतत जाणवणाऱ्या तणावाखाली बघू, कारण अनेक गरजा भागवायच्या हा दबाव आपल्यावर असेल. पण जर आपण आपल्या पाचारणाला प्रतिसाद दिला, देवाने ज्यासाठी आपणास पाचारण दिले ते मुद्दे आपण हाताळू, आणि इतरांनी येऊन त्या गरजा भागवाव्यात ज्यांना आपण स्पर्श करू शकत नाही ह्यासाठी त्याच्यावर भरवसा ठेऊ. आपण केवळ गरजेला प्रतिसाद दिला, तर जेव्हा लोक कृतघ्न असतात तेव्हा आपण भस्म होणार किंवा जे काही देऊ करतो त्याला लोक प्रतिसाद देत नाहीत.

इ. येशू जेव्हा आपणास अनुसरण करण्याचे पाचारण देतो, आपल्या प्रवासाचा निश्चित आणि स्पष्ट दृष्टांत तो देईल अथवा नाही, पण आपण पुढे काय करावे हे तो निश्चित सांगतो. अब्राहामाला त्याचे ध्येय माहित नव्हते, पण पुढे काय करावे हे तो आपणास सांगणार. अब्राहामाला त्याचे ध्येय माहित नव्हते, पण प्रवासाला सुरुवात करणे त्याला ठाऊक होते, नोहाला तर निश्चित सूचना दिल्या गेल्या होत्या. तसे का झाले? तो देव आहे. “कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नाहीत; माझे मार्ग तुमचे मार्ग नाहीत, असे परमेश्वर म्हणतो. कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत.” (यशया ५५:८-९).

फ. जेव्हा येशू आपणास पाचारण देतो तेव्हा त्याचे कार्य वाटून घेण्याचे सौभाग्य मिळाले म्हणून आपण नेहमी कृतज्ञ असावे. आपल्याशिवाय त्याचे कार्य सिद्ध तो करू शकला असता; त्याऐवजी त्याने आपल्याला त्याचे जोडीदार बनवले आहे.

ग. त्याच्या पाचारणाचे अनुसरण करणे आयुष्यभराची वचनबद्धता आहे. परिस्थिती ध्येय आणि घटना वेळेसोबत बदलू शकतात पण आपल्या पाचारणापासून काही निवृत्ती नाही. मदर टेरेसा कोलकत्ता ह्या ठिकाणी हायस्कूल मध्ये शिकवत होत्या जेव्हा त्यांना क्षयरोग झाला आणि आरामासाठी त्यांना दार्जीलिंग येथे पाठवण्यात आले. त्या ठिकाणी ट्रेनमध्ये जात असताना, त्यांना “गरिबांमध्ये काम करण्याचे, आणि राहण्याचे” पाचारण लाभले. त्यांनी त्या पाचारणाचे वर्णन एक “आदेश” म्हणून केले. त्याच आदेशाने त्यांना कोलकत्ताच्या गरिबांवर आयुष्यभर लक्ष केंद्रित करण्यास सहाय्य केले. (www.ewtn.com - सुरुवातीची वर्षे).

**४.पाचारणाचे मोह**

अ. गर्व: काही ज्यांना देवाचे पाचारण लाभले ते असे मत प्रस्तुत करतात की देवाने त्यानं निवडले कारण ते अधिक अध्यात्मिक, पवित्र, इतरांच्यापेक्षा अधिक धार्मिक आहेत, पण पौल म्हणतो, “[२७]तरी ज्ञान्यांस लाजवावे म्हणून देवाने जगातील जे मूर्खपणाचे ते निवडले, आणि जे बलवान ते लाजवावे म्हणून देवाने जगातील जे दुर्बळ ते निवडले; “जेणेकरून ख्रिस्ताचे सामर्थ्य माझ्यावर असावे” (१ करिंथकरास पत्र १:२७; २ करिंथकरास पत्र १२:९). गर्व झाला की नाश ठेवलेला; मनाचा ताठा अध:पाताचे मूळ होय. (नितीसुत्रे १६:१८; १ पेत्र ५:५).

ब. मत्सर: जेव्हा आपण कोणाला आपल्यापेक्षा अधिक आनंदी अथवा स्वतःपेक्षा यशस्वी समजतो, विशेषकरून समान वरदाने आणि पाचारण असणारे ते आपणास दुख देतात का? जर असेल तर, मत्सर असतो. नितीसुत्रे १४:३० सांगते की “शांत अंत:करण देहाचे जीवन आहे, पण मत्सराने हाडे कुजतात.”

क. लोभ: तुम्हाला जे करण्याचे पाचारण लाभले त्यासाठी ती गोष्ट तुम्ही करता, अथवा तुम्हाला ते धनवान बनवते म्हणून? “Yकोणीही दोन धन्यांची चाकरी करू शकत नाही” (मत्तय ६:२४).

**पाठांतर करा:**

- **नितीसुत्रे ३:५-६** - [५]तू आपल्या अगदी मनापासून परमेश्वरावर भाव ठेव**,** आपल्याच बुद्धीवर अवलंबून राहू नकोस**;** [६]तू आपल्या सर्व मार्गांत त्याचा आदर कर**,** म्हणजे तो तुझा मार्गदर्शक होईल.
- **स्तोत्रसहिता ३२:८** -मी तुला बोध करीन; ज्या मार्गाने तुला गेले पाहिजे त्याचे शिक्षण तुला देईन; मी आपली दृष्टी तुझ्यावर ठेवून तुला बुद्धिवाद सांगेन.

**महत्वाचे सत्य:**

जेव्हा येशू तुम्हाला त्याचे अनुसरण करण्याचे पाचारण देतो, त्या प्रवासातील सर्व स्तर पुढे आपणास ठाऊक नसतील, पण तो आपल्याला पुढे घेऊ शकणारे पाऊल दाखवेल आणि आपले अंतिम ध्येय, आणि हे पुरेसे आहे.

**तुमचा प्रतिसाद:**

१. आयुष्याच्या ह्या ऋतूमध्ये तुमचे पाचारण काय आहे?

२. आज देव तुम्हाला काय करण्याचे पाचारण देत आहे?

**अधिक अभ्यासासाठी:**

ऑस गिनीज ह्यांचे द कॅल (गिनीज, २००३)

रोबेर्त मॉरीस ह्यांच्या उपदेशाची मालिका “व्हाय आम आय हियर?’’ www.gatewaypeople.com

## धडा १२: चिंतन करणे, उत्सव साजरा करणे, कामगिरीवर मार्गस्थ करणे

### १.चिंतन करणे

ह्या पुस्तिकेत जसे तुम्ही सर्व धडे बघितले, तुम्ही कधीच विसरणार नाही अशा कोणत्या तीन गोष्टी आहेत?

अ.

ब.

क.

**२. उत्सव साजरा करणे**

ह्या कार्यक्रमाच्या संपूर्ण कालावधीत गटातील इतर लोकांचे जे योगदान आहे त्यावर विचार करा. संपूर्ण कोर्समध्ये प्रत्येकाने जे योगदान दिले त्यावर मनन करा, आणि त्यातील प्रत्येकासाठी देवाने तुम्हाला उत्तेजन देणारा कोणता शब्द दिला ते सांगा.

१. ______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

२. ______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

३. ______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

४. ______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

५.

३. **कामगिरीवर मार्गस्थ करणे**

आपली कामगिरीवर मार्गस्थ करण्यापूर्वीची प्रार्थना:

"पित्या, मी तुझे आभार मानतो की तुझ्या शब्दांच्या प्रवेशाने मला प्रकाश मिळतो. मी तुझे आभार मानतो की तुझा शब्द...... हा जिवंत आणि सामर्थ्यशाली आहे... मी तुझे आभार मानतो, पित्या, की तू मला [एक आत्मा दिला आहे] सामर्थ्याचा आणि प्रीतीचा आणि एक शांत मन व शिस्तबद्ध राहणी आणि आत्म-नियंत्रणासाठी. माझ्याकडे तुझे सामर्थ्य आणि क्षमता आहे,.... कारण तू मला पात्र केले आहे...एक सेवक आणि नवीन कराराचा वाहक ह्या नात्याने [ख्रिस्ताच्या द्वारे तारण].

ज्या गोष्टी माझ्या मागे आहेत त्यांचा विसर मला पडतो आणि माझ्यापुढे ज्या गोष्टी आहेत त्यांच्याकडे धाव घेतो. ख्रिस्तासोबत मी वधस्तंभावर खिळला गेलो आहे; तरीही मी जगतो; मी नाही, तर ख्रिस्त माझ्यामध्ये राहतो. आणि जे जीवन मी आता देहात जगतो देवाच्या पुत्राच्या विश्वासाने जगतो, ज्याने माझ्यावर प्रेम केले आणि माझ्यास्दाठी स्वतःचा प्राण दिला.

आज मी देवाच्या वचनाकडे लक्ष देतो. पित्या, तुझ्या शब्दांशी मी सहमती दर्शवून समर्पित होतो. तुझे शब्द माझ्या दृष्टीपुढून जात नाही;

मी माझ्या हृदयात ते साठवून ठेवतो. ते माझ्यासाठी जीवन आहेत, आरोग्य आणि माझ्या देहासाठी आरोग्यदायी आहे. सर्व दक्षता बाळगून मी माझ्या हृद्‌याचे रक्षण करतो,... कारण त्यामधून जीवनाचे झरे बाहेर पडतात.

आज दया आणि कृपा व सत्य ह्यांनी माझा त्याग करण्याची परवानगी मी देत नाही: मी माझ्या हृद्‌य पटलावर ते कोरून ठेवतो. म्हणूनच मला कृपा मिळेल, चांगली समजबुद्‌धी आणि देवाच्य व मनुष्याच्या दृष्टीने उच्च स्तरावर बघितले जाईल.

आज माझा आनंद आणि इच्छा हे देवाच्या नियमशास्त्रात आहेत, आणि त्याच्या नियमशास्त्रावर मी दिवस अंड रात्र मनन करतो. म्हणूनच पाण्याच्या प्रवाहाच्या जवळ जे झाड लावलेले असते त्यासारखा मी आहे, जे त्याच्या हंगामी फळ देते; माझी पाने देखील सरणार नाहीत अथवा जीर्ण होणार नाहीत, आणि मी जे काही करेल ते समृद्‌ध होईल.

आता देवाचे मी आभार मानते, जो नेहमी मला ख्रिस्तामध्ये विजयी करतो!

त्याच्या नावाने मी प्रार्थना करते, आमेन." (कोपलंड, २००५, पीपी. १३५, १३६)

# टिपा

# टिपा

# BIBLIOGRAPHY

Bock, D. H., George; Hendricks, Bill. (2015). Discovering Your Giftedness. *The Table Podcast.* Retrieved fromhttps://youtu.be/ frro6eLa-JY

Bower, M. (1997). *The will to lead : running a business with a network of leaders*. Boston, Mass.: Harvard Business School Press. Chambers, O. (1992). *My utmost for His Highest : an updated edition in today's language : the golden book of Oswald Chambers*. Grand Rapids, Mich.: Discovery House Publishers.

Collins, J. C. (2001). *Good to great : why some companies make the leap--and others don't* (1st ed.). New York, NY: HarperBusiness.

Copeland, G. (2005). *Prayers that avail much* (25th anniversary commemorative ed.). Tulsa, OK: Harrison House.

Covey, S. R. (1989). *The seven habits of highly effective people : restoring the character ethic*. New York: Simon and Schuster.

Dawson, J. (1997). *Intercession, Thrilling and Fulfilling*. Seattle, WA: YWAM Publishing.

Fortune, D., & Fortune, K. (1987). *Discover your God-given gifts*. Old Tappan, NJ: F.H. Revell Co.

Foster, R. J. (1988). *Celebration of discipline : the path to spiritual*

*growth* (Rev. 1st ed.). San Francisco: Harper & Row.
Gilbert, L. (2015). Free Spiritual Gifts Analysis.
Retrieved from
https://gifts.churchgrowth.org/cgi-cg/gifts.cgi?intro=1

Greenleaf, R. (1977). *Servant Leadership* (25th Anniversary ed.). Mahwah: Paulist Press.

Guinness, O. (2003). *The call : finding and fulfilling the central*

*purpose of your life*. Nashville, Tenn.: W Pub. Group.

Hammond, L., & Cameneti, P. (2000). *Secrets to powerful prayer*

*: discovering the languages of the heart*. Tulsa, Okla.: Harrison House.

Hendricks, B. (2013). What is your Giftedness? *Giftedness.*
Retrieved from www.youtube.com/watch?v=sXLvI3LJHUw

Jacobsen, W. (2000). *He loves me*. Tulsa, OK: Insight Publishing Group.

Kahl, J., & Donelan, T. (2004). *Leading from the heart : choosing to be a servant leader* (1st ed.). Westlake, OH: Jack Kahl and Associates.

Kise, J. A. G., Stark, D., & Hirsh, S. K. (1996). *Lifekeys : discovering who you are, why you're here, what you do best*. Minneapolis, Minn.: Bethany House Publishers.

Koch, R. N., & Haugk, K. C. (1992). *Speaking the truth in love : how*

*to be an assertive Christian*. St. Louis, Mo.: Stephen Ministries. Lencioni, P. (2002). *The five dysfunctions of a team : a leadership fable* (1st ed.). San Francisco: Jossey-Bass.

Littauer, F. (1986). *Your personality tree : discover the real you by uncovering the roots of*. Waco, Tex.: Word Books.

Maxwell, J. C. (1993). *The winning attitude*. Nashville, TN: T. Nelson Publishers.

Maxwell, J. C. (2000). *Failing forward : turning mistakes into stepping-stones for success*. Nashville, TN: Thomas Nelson Publishers.

McGinnis, A. L. (1979). *The friendship factor : how to get closer to the people you care for*. Minneapolis: Augsburg Pub. House.

McGinnis, A. L. (1997). *The balanced life : achieving success in work and love*. Minneapolis: Augsburg.

Meyer, J. (1995). *Battlefield of the mind : how to win the war in your*

*mind*. Tulsa, Okla.: Harrison House.

Ministries, C. S. (1999). *Cleansing Seminar Workbook*. Paper presented at the Cleansing Seminar, Colorado Springs, CO. www. cleansingstream.org

Moore, B. (1999). *Breaking free : making liberty in Christ a reality in*

*life*. Nashville, Tenn.: LifeWay Press.

Moore, B. (2004). *Believing God*. Nashville, Tenn.: Broadman & Holman.

Morgenstern, J. (2000). *Time management from the inside out : the foolproof system for taking control of your schedule--and your life* (1st ed.). New York: Henry Holt.

Morris, R. (2015). *Truly free : breaking the snares that so easily entangle*. Nashville, Tennessee: W Publishing Group, an imprint of Thomas Nelson.

Munger, R. B. (1992). *My heart--Christ's home : a story for old &*

*young* (2nd rev. ed.). Downers Grove, Ill.: InterVarsity Press.

Noland, J. R. (2015). The Personalysis Profile. Retrieved from http://www2.personalysis.com/assessment/

Pegues, D. S. (1997). *Managing conflict God's way*. New Kensington, PA: Whitaker House.

Rath, T. (2014). *Strengthsfinder 2.0* (Spanish edition. ed.). New York: Gallup Press.

Sande, K. (2014). The Four G's. *Christian Conciliation, Foundational Principles.* Retrieved from www.peacemaker.net

Senge, P. M. (2006). *The fifth discipline : the art and practice of the learning organization* (Rev. and updated. ed.). New York: Doubleday/Currency.

Smalley, G., & Trent, J. (1986). *The blessing*. Nashville: T. Nelson. Smedes, L. B. (1984). *Forgive and forget : healing the hurts we don't deserve* (1st ed.). San Francisco: Harper & Row.

Smith, E. M. (2005). *Theophostic Prayer Ministry*. Paper presented at the Theophostic Prayer Ministry, Basic

Seminar, Irving, TX. Spears, L. C. (1998). *Insights on leadership : service, stewardship, spirit, and servant-leadership*. New York: Wiley.

Swenson, R. A., & Swenson, R. A. (2002). *Margin : restoring, emotional, physical, financial, and time reserves to overloaded lives ; The overload syndrome : learning to live within your limits*. Colorado Springs, Colo.: NavPress.

Voskamp, A. (2010). *One thousand gifts : a dare to live fully right*

*where you are*. Grand Rapids, Mich.: Zondervan.

Wagner, C. P. (1994). *Your spiritual gifts can help your church grow*

(15th anniversary ed.). Ventura, Calif.: Regal Books.
Weaver, J. (2000). *Having a Mary heart in a Martha world : finding intimacy with God in the busyness of life* (1st ed.). Colorado Springs, Colo.: WaterBrook Press.

एस्तेर

# पुढाकार